CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २८६ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जे विद्यार्थी कार्यकर्ते आहेत त्यांनी उत्तम विद्यार्थी बनण्याचा प्रयत्न करायचाच पण त्याचबरोबर संघाच्या कामासाठी पुरेसा वेळ देऊन चांगला कार्यकर्ताही बनले पाहिजे. आपल्या विद्यालयाच्या, महाविद्यालयाच्या क्षेत्रातही स्नेहपूर्ण वागणुकीने तसेच कामाच्या कौशल्याने अधिकाधिक विद्यार्थ्यांना आणि अध्यापकांना संघाशी जोडण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. तारुण्याचे असामान्य महत्त्व लक्षात घेऊन, एका तपश्चर्येच्या भावनेने आपला शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकास आपण करून घेतला पाहिजे. आपल्या जीवनात सर्वांत मूल्यवान वस्तू काय असेल तर वेळ; थोडासुद्धा वेळ वाया जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# युक्रेनचा रशियाच्या अणुऊर्जा प्रकल्पावर हल्ला

## स्वातंत्र्यदिनी युक्रेनने ९५ ड्रोन डागल्याचा रशियाचा आरोप

**कीव/मॉस्को**

रशियन माध्यमांनुसार, शनिवारी रात्री उशिरा रशियाच्या कुर्स्क प्रदेशातील अणुऊर्जा प्रकल्पावर युक्रेनने ड्रोन हल्ला केला. युक्रेन आपला ३४ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत असताना ही घटना घडली. रशियाने आरोप केला आहे की, या हल्ल्याने अणुऊर्जा प्रकल्पात आग लागली.

रशियन अधिकाऱ्यांनी सांगितले की, रात्री अनेक वीज आणि ऊर्जा प्रकल्पांवरही हल्ला करण्यात आला. तथापि, अणुऊर्जा प्रकल्पातील आग लवकर विझवण्यात आली आणि कोणीही जखमी झाले नाही. हल्ल्यात फक्त एका ट्रान्सफॉर्मरचे नुकसान झाले. रशियन संरक्षण मंत्रालयाने दावा केला की, रात्री ९५ हून अधिक युक्रेनियन ड्रोन नष्ट करण्यात आले. दुसरीकडे, युक्रेनने सांगितले की रशियाने रात्री ७२ ड्रोन आणि एक क्रूझ क्षेपणास्त्र डागले, त्यापैकी ४८ ड्रोन नष्ट करण्यात आले.

रशियावरील हा हल्ला युक्रेनच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त झाला आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी स्वातंत्र्यदिनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले आहे की, शांततेसाठी केलेले आवाहन ऐकले जाईपर्यंत युक्रेन आपल्या स्वातंत्र्यासाठी लढत राहील.झेलेन्स्की यांनी देशाची ताकद आणि शांततेची इच्छा यावर भर दिला. ते म्हणाले, 'आम्ही सुरक्षित आणि शांततापूर्ण युक्रेन बांधत आहोत. आमचे भविष्य आमच्या हातात आहे.' ते पुढे म्हणाले, 'युक्रेन अद्याप जिंकलेले नाही, पण ते हरलेलेही नाही.'अलिकडच्या अमेरिका-रशिया शिखर परिषदेचा संदर्भ देत झेलेन्स्की म्हणाले की, जग युक्रेनचा आदर करते आणि त्याला समान दर्जा देते. आज युक्रेन आणि रशियाने प्रत्येकी १४६ कैद्यांची देवाणघेवाण केली.



**सोलापूर : अक्कलकोट रोडवरील वीर तपस्वी होटगी मठात रविवारी मोठ्या भक्तीमय वातावरणात गंगा आरती संपन्न झाली. याप्रसंगी भाविकांना काशीनगरीत असल्याचा अनुभव आला.**
**(छायाचित्र केवल तिवारी)**

# उद्धव ठाकरेंनी मृतांच्या टाळूवरचे लोणी खायचे काम केले

## गिरीश महाजन यांचा गंभीर आरोप

## दगाबाजी करत अडीच वर्ष सत्तेत

**चाळीसगाव, दि.२४ ऑगस्ट -**

उद्धव ठाकरेंनी बडबड करण्यापेक्षा लोकांमध्ये जाऊन बोलावले, कार्यकर्त्यांना कामाला लावावे. याला त्याला बोगस म्हणण्यापेक्षा तुमचे काय? तुम्हाला लोकांनी अडीच वर्ष दिले होते. खरेतर लोकांनी तुम्हाला दिले नाही, तुम्ही दगाबाजी करून ते घेतल्याची टीका मंत्री गिरीश महाजन यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे.

गिरीश महाजन म्हणाले, अडीच वर्षांमध्ये तुम्ही काय दिवे लावले तुम्ही घराच्या खाली उतरले नाही. डेड बॉडीमध्ये तुम्ही किती पैसे खाल्ले किती लोक त्यामध्ये जेलमध्ये आहेत. कोरोना काळात मराठी माणसासाठी तुम्ही काय केले? मृतांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे काम उद्धव ठाकरेंनी केल्याचा गंभीर आरोप महाजन यांनी केला आहे. मराठा समाजाला न्याय देण्याचे काम सर्वात पहिले देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. असे असताना कोणीही काहीही बोलावे, आपण कोणाबद्दल बोलतोय याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे, असे गिरीश महाजन म्हणाले. तसेच इतक्या वर्षापासून आपल्या आरक्षणाची मागणी असताना कुठल्याही सरकारने आपल्या पदरात काही टाकलं नाही. ते फक्त देवेंद्र फडणवीस होते ज्यांनी आरक्षणाबाबत वाचा फोडली आणि आमच्या समाजाच्या पदरात काहीतरी दिले. दुर्दैवाने कोर्टात ते टिकले नाही हा भाग वेगळा आहे. आणि दुर्दैवाने आमचे सरकार बदलले त्यामुळे ते कोर्टात तत्कालीन काँग्रेसचे सरकार टिकवू शकले नाही, त्यात आमचा दोष नाही.





मनोज जरांगे यांच्यावर प्रतिक्रिया देताना गिरीश महाजन म्हणाले, फडणवीस हे खुणशी आहेत असे म्हणण्याला काही अर्थ नाही, या वक्तव्याला कोणीही साथ देणार नाही असे महाजन म्हणाले. जरांगे पाटील काय बोलत आहेत हे आपण अनेक दिवसापासून ऐकत आहोत. जरांगे पाटील कुठल्या थराला जाऊन बोलत आहेत. आपल्या मागण्या आहेत त्या असू द्या रास्त मार्गाने मागितल्या पाहिजे. कोणाविषयी काही बोलावं मागच्या वेळी त्यांचा बोलण्याचा स्तर इतका खाली गेला होता की लोकांनाही कंटाळा आला होता. आपल्या जिभेवर संयम ठेवला पाहिजे, असा सल्ला महाजनांनी दिला आहे. राज ठाकरेंवर टीका करताना गिरीश महाजन म्हणाले, बेस्ट निवडणुकीमध्ये ठप्पे मारले गेले. तुम्ही जो मराठी माणूस मराठी माणूस सांगावा करत आहात त्याला कोणी मतदान केलं? शून्य सुद्धा फोडता आला नाही, तुम्हाला कोणी मतदान सुद्धा केलं नाही. कधी मतपेट्या खराब झाल्या, कधी बॅलेट पेपर तर कधी मतदार याद्या खराब झाल्या असं तुम्ही म्हणायचे. लोक तुम्हाला स्वीकारत नाही आणि मग तुम्ही प्रत्येक वेळी नवीन नवीन कारण शोधायचे, असे म्हणत नाचता येईना अंगण वाकडे असा टोला राज ठाकरेंना लगावला आहे.

### राहुल गांधींना आता काम नाही

जनता जनार्दन सर्वात मोठा आहे तुम्ही निवडणुकीला समोर जा आता महापालिकेच्या निवडणुका आहेत मग कशाला रडत बसताय. राहुल गांधींना आता काही काम दिसत नाही, लोकसभेपर्यंत सर्व गोड वाटले. लोकसभेच्या वेळी तुम्हाला मोठे मताधिक्य महाराष्ट्रात मिळाले तेव्हा आम्ही रडलो का? असा सवाल गिरीश महाजन यांनी उपस्थित केला. तुमचे सरकार त्यावेळी होते त्यावेळी मतपेट्या मतदान याद्या खराब केल्या असे आम्ही रडलो नाही. आम्ही पुन्हा तयारीला लागलो लोकांमध्ये गेलो जागृती केली म्हणून ही तुमची परिस्थिती झाली. आधी म्हणतात मशीन खराब आहे आता म्हणतात याद्या खराब आहेत. लोकसभेच्या याद्याच विधानसभेमध्ये होत्या. हे नाटक बंद करा लोक तुम्हाला आता स्वीकारायला तयार नाहीत असे महाजन म्हणाले.

### आकाशात 'पोलादी कवच'

**नवी दिल्ली** : ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने सोडलेले शेकडो ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतल्या हवेत नष्ट करीत पाकिस्तानचे मनसुबे उधळून लावले. हवाई संरक्षण यंत्रणेचे महत्त्व अधोरेखित झाल्यानंतर डीआरडीओ आणि इस्त्रोने सुदर्शन चक्र ही अत्याधुनिक हवाई संरक्षण यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेतला. या बहुस्तरीय हवाई संरक्षण शस्त्रप्रणालीची भारताने यशस्वी चाचणी घेतली आहे.



72198 21111
BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans
*नियम आणि अटी लागू. *एक्स–शोरुम किंमत पल्सर बेस वेरिएंट्ससाठी. **पल्सर 125 निऑनसाठी डाउन–पेमेंट हे मार्जिन मनी आहे. मार्जिन मनीमधून डीसीसी शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत. फायनान्स पूर्णपणे फायनान्शिअरच्या विवेकानुसार. नियम आणि अटी लागू. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सने, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी रहदारीचे आणि सुरक्षिततेचे नियम पाळा. एमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून पुरवली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.
**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### देशातील अनेक भागांत एअरटेल सेवा बंद

**नवी दिल्ली** : देशातील अनेक भागात एअरटेलच्या सेवा पुन्हा एकदा बंद पडल्या आहेत. बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आणि कोलकातासह अनेक मोठ्या शहरांमध्ये एअरटेल वापरकर्त्यांना नेटवर्क सिग्नल मिळत नाहीत. एका आठवड्यात दुसऱ्यांदा एअरटेलच्या सेवा बंद पडल्या आहेत. वेबसाइट्स आणि ऑनलाइन सेवांची रिअल-टाइम स्थिती प्रदान करणाऱ्या प्लॅटफॉर्म डाउन डिटेक्टरनुसार, सकाळी ११ वाजल्यापासून एअरटेलच्या सेवा इंटरनेट, कॉल आणि मेसेजिंग सेवांमुळे प्रभावित झाल्या आहेत. दुपारी १२:०५ वाजता सर्वाधिक तक्रारी, सुमारे ७००० नोंदल्या गेल्या. समस्येचा सामना करणाऱ्या सुमारे ५२ टक्के लोकांना मोबाईल सिग्नलची समस्या येत आहे. ३१ टक्के लोकांना मोबाईल इंटरनेटची समस्या येत आहे. त्याच वेळी, १७ टक्के लोकांनी संपूर्ण ब्लॅकआउटची तक्रार केली आहे.

### अश्लील साहित्य ब्लॉक करणारा पहिला स्मार्टफोन लाँच

**नवी दिल्ली** : फिनलंडची टेक कंपनी एचएमडी ग्लोबलने फ्यूज हा नवीन स्मार्टफोन लाँच केला आहे. कंपनीचा दावा आहे की, हा जगातील पहिला फोन आहे जो थेट न्यूड कंटेंट ब्लॉक करतो. यासाठी एचएमडीने फोनमध्ये ब्रिटिश सायबर सिक्युरिटी फर्म सेफ टू नेटचे एआय मॉडेल हार्मब्लॉक एआय इनबिल्ट केले आहे. हे फोनमध्ये नग्न सामग्री रेकॉर्ड करण्यापासून आणि ती कोणालाही पाठवण्यापासून प्रतिबंधित करते. हे इंटरनेटवर नग्न फोटो पाहण्यापासून आणि ते फोनमध्ये सेव्ह करण्यापासून देखील प्रतिबंधित करते. याशिवाय, ते लाईव्ह स्ट्रीमिंग दरम्यान आक्षेपार्ह हालचालींना त्वरित ब्लॉक करेल.

### शिपकी-ला मार्गे व्यवसायासाठी चीनची तत्त्वतः मान्यता

**शिमला** : चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांच्या अलीकडील भारत दौऱ्यादरम्यान त्यांनी हिमाचल प्रदेशातील कुन्नूर जिल्ह्यातल्या शिपकी-ला येथून व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी तत्त्वतः मान्यता दिली, अशी माहिती राज्य सरकारने रविवारी निवेदनात दिली. कोरोना महामारीमुळे येथून २०२० मध्ये व्यापार रोखण्यात आला होता. भारत सरकारने शिपकी-ला (हिमाचल प्रदेश), लिपुलेख (उत्तराखंड) आणि नाथू-ला (सिक्कीम) या तीनही नियुक्त बिंदूंद्वारे सीमा व्यापार पुन्हा सुरू करण्यासाठी चीनशी चर्चा सुरू केली आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी राज्य सरकारला दिली असल्याचे राज्य सरकारने निवदेनात म्हटले. शिपकी-ला मार्गे चीनशी व्यापार पुन्हा सुरू करण्याच्या हिमाचल सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना प्रोत्साहनदायक निकाल मिळाले आहेत. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्या अलीकडच्या भारत भेटीदरम्यान चीन सरकारने या प्रस्तावाला तत्त्वतः सहमती दर्शवली आहे, असे यात म्हटले आहे.



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. ९९,५०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु.१,१५,००० |

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.६ | २१.८ |
| अमरावती | २९.२ | २.० |
| भंडारा | २९.० | १.० |
| बुलडाणा | २८.२ | ०.० |
| चंद्रपूर | ३१.० | ०.० |
| गडचिरोली | २९.८ | ०.० |
| गोंदिया | २८.० | ६.० |
| नागपूर | २९.६ | ०.० |
| वर्धा | २९.० | १.० |
| वाशीम | २९.२ | ०.० |
| यवतमाळ | ३०.६ | ०.० |

# ७० टक्के श्वानांची नसबंदी करा

## ● केंद्राचा राज्यांना आदेश ● रॅबीजविरोधी लस अनिवार्य



◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

कुत्र्यांच्या वाढलेल्या समस्येवर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या आदेशानंतर केंद्र सरकार सक्रिय झाले. किमान ७० टक्के कुत्र्यांची नसबंदी करण्यात यावी तसेच त्यांना रॅबीजविरोधी लस द्यावी, असे स्पष्ट निर्देश केंद्र सरकारने राज्यांना आणि केंद्र शासित प्रदेशांना दिला आहे.

यापूर्वी केंद्राची भूमिका केवळ सूचनेपर्यंत मर्यादित होती. मात्र, आता यास अनिवार्य करीत राज्यांना याची जबाबदारी दिली आहे. या प्रकरणातील कृती केवळ कागदावर राहू नये यासाठी प्रत्येक राज्याला याबाबतचा अहवाल दर महिन्याला पाठवावा लागणार आहे.

नसबंदी आणि लसीकरणानंतर कुत्र्यांना त्यांच्या मूळ जागी सोडण्यात यावे. या निर्देशानुसार केंद्राने आपले धोरणही बदलले आहे. या कार्यक्रमात कोणतेही राज्य मागे पडल्यास, त्याची जबाबदारी संबंधित राज्यावर असेल, असे पशुपालन मंत्रालाने सर्वच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

नसबंदी आणि लसीकरणासाठी प्रती कुत्रा ८०० रुपये आणि प्रती मांजर ६०० रुपये दिले जाणार आहेत. महानगरांमध्ये फिडिंग झोन आणि रॅबीजन नियंत्रण कक्ष बनवण्यासाठी तसेच आश्रयस्थळ उभारण्यासाठी वेगळा निधी दिला जाणार आहे. रुग्णालये तसेच आश्रयगृहांसाठी दोन कोटी रुपयांचे अनुदान एकरकमी दिले जाईल. लहान आश्रयगृहांना १५ लाख रुपये आणि मोठ्यांसाठी २७ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाणार आहे.

सुधारित पशू जन्म नियंत्रण मॉडेल मानक संचालन प्रक्रिया म्हणून वापरावे, असेही केंद्राने राज्यांना सांगितले आहे. महानगरांमध्ये कुत्र्यांसाठी आहार उपलब्ध करणे, चोवीस तासांसाठी हेल्पलाईन सुरू करणे, रॅबीज नियंत्रण कक्ष सुरू करण्यावर केंद्राने भर दिला आहे. नसबंदी आणि लसीकरणाचे काम विना अडथळा सुरू राहावे, यासाठी हा भर देण्यात आला. यामुळे अनियंत्रित प्रजनन दरावर अंकुश लागेल आणि नागरिक सुरक्षेत सुधारणा होईल. (वृत्तसंस्था)

### आशा कार्यकर्त्यांची भागीदारी आवश्यक

योजना प्रत्यक्ष उतरवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि आशा कार्यकर्त्यांची भागीदारी आवश्यक मानली गेली आहे. मोहल्ला पातळीवर यांच्याच मदतीने कुत्र्यांची ओळख पटवणे, त्यांना मानवीय पद्धतीने पकडणे, उपचार, लसीकरण आणि त्यांना परत सोडण्याचे काम वेगाने होईल. समुदायाची भागीदारीमुळे वाद कमी होतील आणि नजर ठेवणे सहजशक्य होणार आहे.

### केवळ संख्या नव्हे, आजारही चिंतेचा विषय

आव्हान केवळ कुत्र्यांच्या संख्येचे नाही, तर त्यांच्या चाव्यामुळे होणारे आजारही चिंतेचा विषय असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले. रॅबीज हा जीवघेणा आजार आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लसीकरण आवश्यक आहे. त्यामुळे तपशीलवार मासिक अहवाल पशू कल्याण मंडळाला पाठवला जावा, असे केंद्राने म्हटले आहे. कोणत्या राज्याने नियम आणि न्यायालयाच्या आदेशाचे पालन किती गांभीर्याने केले, हे याच अहवालांवरून स्पष्ट होणार आहे.



श्री गुरु ग्रंथसाहिब प्रकाश पर्व रविवारी साजरा करण्यात आला. यानिमित्त अमृतसर येथील सुवर्णमंदिरात हजारो भाविक जमले होते. मंदिर परिसरात गरुड पक्ष्याला हाताळताना बालक

### झारखंडमध्ये माओवाद्यांनी जाळली वाहने

◆ **हजारीबाग, २४ ऑगस्ट**

कोळसा खाणीत वापरली जाणारी सहा वाहने झारखंडच्या हजारीबाग येथे माओवाद्यांनी रविवारी जाळली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

शनिवारी रात्री चऱ्ही पोलिस ठाणे हद्दीतील सेंट्रल कोलफिल्ड्स लि.च्या तापिन नॉर्थ कोळसा खाण प्रकल्पाच्या ठिकाणी ही घटना घडली. या कृत्यात तृतीय प्रस्तुती कमिटीचे माओवादी गुंतले असल्याचे पोलिसांनी घटनास्थळी सापडलेल्या पत्रकाच्या आधारे सांगितले. नऊ ते दहा जणांनी तीन जेसीबींसह सहा वाहनांना आग लावली. घटनास्थळापासून काही अंतरावर टीपीसीचे पत्रक सापडले. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे, असे विष्णुगडचे उपविभागीय पोलिस अधिकारी बी. एन. प्रसाद यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### झुकेरबर्गच्या सुरक्षेवर २२१ कोटी खर्च

◆ **न्यूयॉर्क, २४ ऑगस्ट**

जगातील सर्वात मोठ्या टेक कंपन्यांचे प्रमुख आता केवळ व्यावसायिक चेहरे राहिलेले नाहीत तर राजकारण, समाज आणि सार्वजनिक भावनांचे थेट लक्ष्य आहेत. म्हणूनच त्यांच्या वैयक्तिक सुरक्षेवरील खर्च आश्चर्यकारक पातळीवर पोहोचला आहे.

२०२४ मध्ये, १० मोठ्या टेक कंपन्यांनी त्यांच्या सीईओंच्या सुरक्षेवर ३६९ कोटी (४५ दशलक्ष) पेक्षा जास्त खर्च केला. यातील सर्वात मोठा भाग मेटा प्रमुख मार्क झुकेरबर्ग आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेचा होता, ज्यावर सुमारे २२१ कोटी (२७ दशलक्ष) खर्च करण्यात आला. (वृत्तसंस्था)

# रा. स्व. संघाची अखिल भारतीय समन्वय बैठक ५ सप्टेंबरपासून

◆ **जोधपूर, २४ ऑगस्ट**

यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय समन्वय बैठक येत्या ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान राजस्थानातील जोधपूर येथे होणार आहे.

रा. स्व. संघाची तीन दिवसीय अखिल भारतीय बैठक दरवर्षी होते. मागील वर्षी ही बैठक केरळमधील पलक्कड येथे झाली होती. या बैठकीत संघाशी संबंधित ३२ संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. बैठकीत राष्ट्रीय एकात्मता, सुरक्षा आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण विषयांवर व्यापक चर्चा केली जाईल. सोबतच विविध विषयांवर कार्यरत राहण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यावरही भर दिला जाईल.

बैठकीत विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आपली माहिती सादर करतील आणि उपलब्धींविषयीदेखील सांगतील. संघ शताब्दीशी संबंधित कार्यात सहभागितेवरही या बैठकीत विचारमंथन अपेक्षित आहे.

बैठकीला सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्यासह सहा सह सरकार्यवाहदेखील उपस्थित राहतील. बैठकीला राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता पार्टी, भारतीय किसान संघ, विद्या भारती, भारतीय मजदूर संघासह विविध संघ प्रेरित संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, संघटन मंत्री आणि प्रमुख पदाधिकारी सहभागी होतील, अशी माहिती अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दिली आहे. (वृत्तसंस्था)

# 'चलो मुंबई'; ही शेवटची लढाई : जरांगे

◆ **बीड, २४ ऑगस्ट**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. तत्पूर्वी, मनोज जरांगे यांनी बीड येथील भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला. बीडमध्ये मराठा समाजाच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, यावर प्रतिक्रिया देताना बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. पण, सत्ता येते आणि जाते हे लक्षात ठेवा, असा इशारा जरांगे यांनी दिला.

मनोज जरांगे म्हणाले, आपल्याला बीडच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, ठीक आहे. पण आमचा डीजे वाजवू दिला नाही, यापुढे बीडमध्ये कोणाचाही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. देवेंद्र फडणवीस यांनी जरा पोलिसांना आदेश दिले असतील आणि पोलिस जर चुकीचे काम करीत असतील तर तसे करू नका. एवढी विनंती करूनही जर एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला काही करायचे असेल, तर त्या महादेव मुंडेंच्या मारेकऱ्यांना शोधा, असे आवाहन देखील जरांगे यांनी केले.

बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचे ते करा, असे थेट आव्हान जरांगे यांनी शासनाला दिले. (वृत्तसंस्था)

# समृद्धी महामार्गावरील दरोडा प्रकरणातील आरोपीस अटक

## १५ लाखांचे सोने हस्तगत; मुख्य आरोपी अद्याप फरार | ४ कोटी ६० लाखांचे सोने केले होते लंपास

◆ **मेहकर, २४ ऑगस्ट**

समृद्धी महामार्गावर मुंबईतील सोन्याच्या व्यापाऱ्यावर घातलेल्या दरोडा प्रकरणातील एका आरोपीस अटक करण्यात पोलिसांना यश आले. त्याच्याकडून १५ लाखांचे सोने हस्तगत करण्यात आले. मात्र, या प्रकरणाला दोन दिवस उलटूनही मुख्य आरोपींचा शोध लागलेला नाही. दरोडेखोरांना घेण्यासाठी आलेल्या दोन इनोव्हा पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. सर्व आरोपींची ओळख पोलिसांना पटली आहे.

या दरोडेखोरांनी व्यापाऱ्यावर चाकूने हल्ला करून मिरची पूड फेकली. या गोंधळात दरोडेखोरांनी व्यापाऱ्याच्या गाडीतील २२ कॅरेटचे ५ किलो सोने असलेली बॅग उचलून मालेगावच्या दिशेने भरधाव वेगाने पसार झाले. या सोन्याची किंमत ४ कोटी ६० लाख रुपये आहे.

२२ ऑगस्टच्या रात्री सव्वा सातच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. सोन्याचे व्यापारी अनिल चौधरी हे खामगाव येथील व्यवहार आटोपून मुंबईकडे निघाले होते. मेहकर जवळील फरदापूर टोलनाक्यापासून काही अंतरावर त्यांचे वाहन चालकाने थांबवले. ही संधी साधून दरोडेखोर व त्यांच्या चालकाने त्यांच्यावर हल्ला केला होता. मेहकर शहर व समृद्धी महामार्गावरील हा इतिहासातील सर्वांत मोठा दरोडा आहे. त्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी घटनास्थळावरून पळून जाण्यासाठी वापरलेले चारचाकी वाहन मेडशी परिसरात सोडून दिले. तर, आरोपींना घेण्यासाठी आलेले दुसरे चारचाकी वाहन पातूरजवळ पकडून चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी सुरू आहे. (वृत्तसंस्था)

# ज्येष्ठ वकील तपासणार जलवाहिनीची गुणवत्ता

### तीन आठवड्यांत सादर करणार अहवाल

### यवतमाळ अमृत योजना प्रकरण



संग्रहित छायाचित्र

◆ **नागपूर, २४ ऑगस्ट**

यवतमाळ शहरातील अमृत योजनेंतर्गत जलवाहिनीच्या कामात झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात दाखल जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी जलवाहिनी दुरुस्तीच्या कामामुळे खराब झालेल्या रस्त्यांकडे नगरपालिका करीत असलेल्या दुर्लक्षाकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने दोन ज्येष्ठ वकिलांची समिती नेमली आहे. ही समिती पाहणी करून तीन आठवड्यांच्या आत अहवाल सादर करेल, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

या कामासाठी नगरपालिकेला ९ कोटी रुपयांचा निधी मिळाला असूनही अद्याप रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, अशी माहिती याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयात सादर करण्यात आली. याचिकाकर्त्यांनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (एमजेपी) २०१७-२०१८ मध्ये पी. एल. आडके कन्स्ट्रक्शन कंपनीला बेंबळा धरणापासून यवतमाळ शहरापर्यंत २८ किलोमीटरची जलवाहिनी टाकण्याचे कंत्राट दिले होते. परंतु, कमी वेळेत पाईप उपलब्ध न झाल्याने मजीप्राने कोलकात्याच्या बालाजी इंडस्ट्रीज लिमिटेडला १५० कोटी रुपयांमध्ये १३.५ मिमी जाडीचे पाईप पुरवण्याचे कंत्राट दिले. (तभा वृत्तसेवा)

### चाचणी न करता टाकली पाईपलाईन

कंत्राटदाराने कोणतीही हायड्रोलिक चाचणी न करता टाकळी फिल्टरपर्यंत १८ किलोमीटरची पाईपलाईन टाकली. त्यानंतर चाचणी केली असता, अनेक ठिकाणी पाईप फुटल्याचे निदर्शनास आले. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे परिसरातील शेतीचे मोठे नुकसान झाले. याप्रकरणी पोलिस चौकशीची मागणी याचिकाकर्त्यांचे न्यायालयीन मित्र ॲड. फिरदोस मिर्झा यांनी न्यायालयाकडे केली.

# विद्या भारती विदर्भ प्रांत अध्यक्षपदी सचिन जोशी

◆ **नागपूर, २४ ऑगस्ट**

विद्या भारती विदर्भ प्रांताच्या २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठी नवे कार्यकारिणी मंडळ जाहीर झाले असून, अध्यक्षपदी अकोल्याचे सचिन केशव जोशी यांची निवड करण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रिया निवडणूक अधिकारी सुधाकर रानडे यांच्या मार्गदर्शनात पार पडली. या बैठकीत विद्या भारतीचे अखिल भारतीय सह संघटन मंत्री श्रीराम आरावकर उपस्थित होते. तसेच विद्या भारतीच्या संलग्न शाळांचे मुख्याध्यापक व विद्या भारतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सचिन जोशी यांचा शाल देऊन सत्कार करताना मान्यवर

नूतन कार्यकारिणीत उपाध्यक्ष म्हणून बळीराम रामदास चव्हाण, ॲड. सत्यानंद भीमराव कांबळे, प्रांजली जोशी यांची निवड झाली. मंत्रिपदाची जबाबदारी नागपूरचे रोशन मधुकरराव आगरकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. सहमंत्री म्हणून दिलीप जोशी वाशीम, समीर थोडगे अकोला, उल्हास इटानकर रामटेक, नागपूर, रणदीप बिसने हिंगणघाट, वर्धा यांची नियुक्ती झाली आहे. कोषाध्यक्ष म्हणून नागपूरचे अमित भालेराव कार्य पाहणार आहेत.

कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. मंगेश पाठक, नागपूर, मंगेश वानखेडे, अकोला, डॉ. शुभ्रा रॉय, नागपूर आणि आनंद देशपांडे, नागपूर यांचा समावेश करण्यात आला. प्रांत संघटन मंत्री म्हणून शैलेश श्रीराम जोशी यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली.

**विदर्भातील संस्कारक्षम कार्याला गती मिळेल**

विद्या भारती ही अखिल भारतीय स्तरावर कार्य करणारी संघटना असून, देशभरात तिच्या २० हजारांहून अधिक शाळा कार्यरत आहेत.

विदर्भातील विद्या भारती संलग्नित शाळांमध्ये राष्ट्रभावना, संस्कार व सर्वांगीण शिक्षण यांचा संगम साधला जातो. या कार्यकाळात विदर्भातील शैक्षणिक व संस्कारक्षम कार्याला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. (तभा वृत्तसेवा)

### येस बँकेतील हिस्सा खरेदी करणार जपानी बँक

**मुंबई** : जपानची सुमितोमो मित्सुई बँकिंग कॉर्पोरेशन मुंबईतील खाजगी क्षेत्रातील बँक येस बँकेतील २४.९९ टक्क्यांपर्यंत हिस्सा खरेदी करणार आहे.

एसएमबीसीला या खरेदीसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून मंजुरी मिळाली आहे. येस बँकेने स्टॉक एक्सचेंज फाइलिंगमध्ये ही माहिती दिली आहे. आरबीआयने २२ ऑगस्ट २०२५ रोजी ही मंजुरी दिली आहे, जी एक वर्षासाठी वैध असेल.

श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव जि. बुलढाणा
(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)
श्रींचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव
दरवर्षी प्रमाणे यावर्षी श्रींचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव दि.२४/०८/२०२५ ते २८/०८/२०२५ पावेतो परंपरेनुसार कार्यक्रम होऊन संपन्न होईल. आपण सर्वांनी उत्सवात सर्वतोपरी सहभागी व्हावे, ही विनंती.
श्री मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला आहे. त्यात श्रींची समाधि दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप इत्यादी व्यवस्था केलेली आहे.
श्री संस्थानच्या शेगांव व शाखांसह भक्तनिवासातील खोल्या अगोदरच ऑनलाईन बुकींग करण्याची कोणतीही पध्दती प्रचलित /अस्तित्वात नाही.
अनधिकृत वेबसाईटचे माध्यमातून भक्तनिवासातील खोल्या ऑनलाईन बुकींग करण्याचे नांवाखाली भक्तांची फसवणूक होण्याचे प्रकार समोर येत आहेत. कृपया भक्तांनी याची नोंद घेऊन सावधगिरी बाळगावी, ही विनंती.
व्यवस्थापकीय विश्वस्त

# भारत-जर्मनी करणार पाणबुड्यांची निर्मिती

## ७० हजार कोटींच्या निधीला मंजुरी, हिंदी महासागरात करणार तैनात



◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

केंद्र सरकारने संरक्षण मंत्रालय आणि माझगाव डॉकयार्ड्स लिमिटेडला प्रोजेक्ट ७५ इंडिया अंतर्गत ७० हजार कोटी रुपयांच्या खर्चातून सहा पाणबुड्यांच्या निर्मितीस मान्यता दिली. या अंतर्गत भारत आणि जर्मनी संयुक्तपणे सहा प्राणघातक पाणबुड्या बांधतील. संरक्षण मंत्रालयाने जानेवारीमध्ये जर्मन कंपनी थायसेनक्रुप मरीन सिस्टम्ससह एअर इंडिपेंडेंट प्रोपल्शन सिस्टमसह सहा पाणबुड्या बांधण्यासाठी माझगाव डॉकयार्डची भागीदार म्हणून निवड केली होती.

संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारताने हिंदी महासागरात आपली ताकद अनेक पटींनी वाढवण्यासाठी माझगाव डॉकयाड्र्स लिमिटेडला जर्मनी कंपनीसोबत सहा पानबुड्यांची निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. पारंपरिक डिझेल-इलेक्ट्रिक पाणबुड्या जास्त काळ पाण्याखाली राहू शकत नाहीत. त्यांना दर काही दिवसांनी पृष्ठभागावर यावे लागते आणि त्यांच्या बॅटरी चार्ज कराव्या लागतात. त्या मर्यादित काळासाठीच टिकतात. जेव्हा त्या पृष्ठभागावर येतात तेव्हा त्या शत्रूच्या रडारवर सहजपणे येऊ शकतात. त्यामुळे या समस्येवर मात करण्यासाठी, एअर इंडिपेंडेंट प्रोपल्शन प्रणाली विकसित करण्यात आली आणि या प्रणालीवर आधारित सहा पानबुड्यांची निर्मिती भारत-जर्मनी करणार आहे. एआयपी प्रणालीने सुसज्ज असलेल्या पाणबुड्या ३ आठवडे पाण्याखाली राहू शकतील. याशिवाय भारत इस्रायली रॅम्पेज एअर-टू-ग्राउंड क्षेपणास्त्रांचा मोठा साठा खरेदी करणार आहे. पाकिस्तानमधील मुरीदके आणि बहावलपूर येथील दहशतवादी मुख्यालयांवर अचूक हल्ल्यांमध्ये रॅम्पेज क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला होता. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रशिया-युक्रेन इरेला पेटले

## ● एकमेकांवर क्षेपणास्त्रे, ड्रोन्सचा मारा ● डोनेत्स्कमधील दोन गावांवर ताबा

◆ **कीव्ह, २४ ऑगस्ट**

रशियाच्या लष्कराने युक्रेनच्या १४३ भागात जमिनी आणि हवाई मार्गाने शनिवारी भीषण हल्ले केले, यात डोनेत्स्क प्रदेशातील दोन गावे स्रेडने आणि क्लेबानवर ताबा मिळविला. प्रत्युत्तरात युक्रेनच्या लष्कराने क्षेपणास्त्र आणि ड्रोनने रशियाच्या विविध भागावर मारा केला. यातील सर्व क्षेपणास्त्र आणि ड्रोन हवेतच उधळून लावण्याचा दावा रशियाने केला आहे. रशियाच्या हल्ल्यात युक्रेनमधील पायाभूत सुविधा आणि शस्त्रनिर्मिती कारखान्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

रशियन संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, त्यांच्या लष्कराने युक्रेनच्या दक्षिण आणि पश्चिम भागात १४३ ठिकाणी हवाई आणि जमिनी मार्गाने हल्ले केले. या कारवाईत युक्रेनच्या डोनेत्स्क प्रदेशातील दोन गावांवर ताबा मिळविण्यात आला.

रशियन सैन्याने केलेल्या हल्ल्यात युक्रेनियन लष्करी औद्योगिक परिसर आणि सशस्त्र दलाच्या तथा परदेशी सैनिकांची अस्थायी तळे उद्ध्वस्त झाली. युक्रेनियन हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर देत, रशियन हवाई संरक्षण प्रणालीने त्यांचे चार मार्गदर्शित हवाई बॉम्ब, क्षेपणास्त्रे आणि १६० ड्रोन उधळून लावले. याशिवाय पायाभूत सुविधा, रेल्वे रुळ आणि काही पूल नष्ट करण्यात आले. रशियाच्या हल्ल्यात निवासी इमारती आणि सैन्याचे तळे उद्ध्वस्त झाल्याचे युक्रेनने म्हटले आहे. हल्ल्यात तीन नागरिकांचा मृत्यू झाला असून ६५ जण जखमी आहे. ◂(वृत्तसंस्था)



### सिरिल रामफोसा यांच्यासोबत झेलेन्स्कींची चर्चा

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमिर झेलेन्स्की यांनी दक्षिण आफ्रीकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामफोसा यांच्याशी चर्चा केली आणि युद्धबंदीसाठी तयार असल्याचे त्यांनी सांगितले. झेलेन्स्की यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, मी रामफोसा यांच्यासोबत चर्चा केली असून यावेळी रशियन राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासोबत कुठल्याही प्रकारच्या बैठकीसाठी तयार असल्याचेही स्पष्ट केले. ■

### युद्धबंदी करा अन्यथा निर्बंध लादू



दोन आठवड्यात युक्रेनविरोधात सुरू असलेल्या युद्धात शांततापूर्ण तोडगा काढा अन्यथा कठोर निर्बंधासाठी तयार राहा असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला दिला आहे. पुतिन यांनी आमच्या संयमाची परीक्षा पाहू नये, करार करण्यास नकार दिल्यास त्यांना भयंकर परिणामांना सामोरे जावे लागेल असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे. ■

### भारताने मध्यस्थी करावी



भारतातील युक्रेनचे राजदूत अलेक्झांडर पोलिशचुक म्हणाले की, रशिया-युक्रेन संघर्ष संपवण्यासाठी भारताने मध्यस्थी करण्यासाठी पुढाकार घ्यावा. रशियासोबत शांतता चर्चा करण्यासाठी युक्रेन भारताला एक महत्त्वाचा देश मानतो. युक्रेनमधील शांतता निर्माण प्रक्रियेत भारताचा अधिक सहभाग अपेक्षित आहे. ■



राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. गडकरी यांनी राधाकृष्णन् यांचे स्वागत करीत त्यांना शुभेच्छा दिल्या

# रशियन तेलावरील ट्रम्प यांचे म्हणणे गांभीर्याने घ्या

## निक्की हेली यांनी भूमिका बदलली

◆ **न्यू यॉर्क, २४ ऑगस्ट**

भारतावर लादलेल्या शुल्काच्या मुद्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर टीका करणाऱ्या रिपब्लिकन नेत्या निक्की हेली यांनी आता भूमिका बदलली आहे. रशियन तेलाबाबत ट्रम्प यांचे म्हणणे गांभीर्याने घ्या आणि या मुद्यावर लवकर तोडगा काढण्यासाठी अमेरिकेसोबत काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

व्यापार मतभेद आणि रशियन तेल आयातीसारख्या मुद्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कठोर संवादाची आवश्यकता आहे, अशी पोस्ट हेली यांनी समाज माध्यमावर शनिवारी केली. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर ५० टक्के कर लादल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला असताना, त्यांनी मागील आठवड्यात न्यूजवीकसाठी



लिहिलेल्या लेखाचा भाग 'एक्स'वर पोस्ट केला.

दोन्ही देशांमधील टॅरिफच्या तणावाच्या काळात भारताची बाजू घेतल्याबद्दल हेली यांच्यावर त्यांच्या पक्षातून टीका होत आहे. ट्रम्प यांनी भारताच्या मोठ्या प्रमाणातील रशियन तेल खरेदीला लक्ष्य करणे योग्य आहे. या माध्यमातून व्लादिमिर पुतिन यांच्या युक्रेनविरुद्धच्या युद्धाला निधी देण्यात मदत होत आहे, असे हेली यांनी लेखात म्हटले आहे. भारत हा चीनसारखा शत्रू नसून, तो एक मौल्यवान मुक्त आणि लोकशाही भागीदार आहे, असेही त्यांनी लेखात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### चीनचा सामना करण्यासाठी अमेरिका महत्त्वाचा

» जगातील दोन सर्वांत मोठ्या लोकशाही असलेल्या भारत आणि अमेरिका यांच्यातील दशकांपूर्वीच्या 'मैत्री आणि सद्भावनां'वर हेली यांनी प्रकाश टाकला. सध्याच्या अशांततेतून बाहेर पडण्यासाठी हे एक भक्कम आधार प्रदान करतो, असे त्या म्हणाल्या. अमेरिकी आणि भारताने सर्वांत महत्त्वाचे काय आहे, ते विसरू नये. आपली सामायिक उद्दिष्टे सर्वांत महत्वाची आहेत. चीनचा सामना करण्यासाठी अमेरिकेचा भारतासारखा मित्र असणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या. ■

# देशातील ४० टक्के मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले

## एडीआरचा अहवाल, रेवंत रेड्डी यांच्याविरुद्ध सर्वाधिक ८९ गुन्हे दाखल

◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

देशातील ३० मुख्यमंत्र्यांपैकी १२ म्हणजे ४० टक्के मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. त्यापैकी १० म्हणजे ३३ टक्के मुख्यमंत्र्यांवर खून करण्याचा प्रयत्न, अपहरण आणि लाचखोरी असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्याविरुद्ध सर्वाधिक ८९ गुन्हे दाखल आहेत.

निवडणूक सुधारणांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स अर्थात् एडीआरच्या अहवालातून ही माहिती समोर आली. हा अहवाल अशा वेळी आला आहे जेव्हा सरकारने तीन विधेयके आणली, ज्यामध्ये गंभीर गुन्हेगारी आरोपांवर ३० दिवसांसाठी अटक केलेल्या पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद आहे. एडीआरने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सर्व ३० विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करून हा अहवाल तयार केला आहे. गेल्या निवडणूक लढण्यापूर्वी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून हा डेटा घेण्यात आला आहे. अहवालानुसार तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी ४७ खटले घोषित केले आहेत. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी १९, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी १३ आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी पाच खटले घोषित केले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हिमाचलचे सुखविंदर सिंग सुखू यांनी प्रत्येकी चार, केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी दोन आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी एक खटला घोषित केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### खुनाचा प्रयत्न, अपहरण, लाचखोरीचे खटले प्रलंबित

» निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात १० म्हणजेच ३३ टक्के मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याविरुद्ध गंभीर गुन्हेगारीचे खटले प्रलंबित असल्याचे जाहीर केले, ज्यात खून करण्याचा प्रयत्न, अपहरण, लाचखोरी आणि गुन्हेगारी धमकी देण्याशी संबंधित प्रकरणांचा समावेश आहे. एडीआरने म्हटले की त्यांनी राज्य विधानसभा आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सर्व ३० विद्यमान मुख्यमंत्र्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले आहे. ही माहिती त्यांनी गेल्या निवडणुका लढवण्यापूर्वी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांवरून घेण्यात आली. ■

# भारताने स्थगित केली अमेरिकेसाठीची टपाल सेवा

### सीमाशुल्काबाबत संभ्रम

◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

अमेरिकेच्या सीमाशुल्क विभागाने जारी केलेल्या नवीन नियमांमध्ये पुरेशी स्पष्टता नसल्यामुळे भारतातून अमेरिकेला टपाल नेण्यास विमान कंपन्यांनी नकार दिला आहे. त्यामुळे अमेरिकेसाठीची टपाल सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली असल्याची माहिती केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाने दिली. मात्र, पत्रे, दस्तऐवज, १०० अमेरिकी डॉलरपर्यंतच्या भेटवस्तू भारतातून अमेरिकेला पाठविण्याची सेवा सुरू राहणार आहे.

३० जुलै रोजी अमेरिकन प्रशासनाने जारी केलेल्या कार्यकारी आदेशानुसार २९ ऑगस्टपासून १०० डॉलर्सपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर सीमाशुल्क लागू होणार आहे. पत्रे, कागदपत्रे व १०० डॉलर्सपर्यंतच्या भेटवस्तूंना मात्र सूट राहणार आहे. ◂(वृत्तसंस्था)



कठुआ जिल्हयात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे नदीनाले ओसडून वाहत आहेत. रहिवासी भागात पाणी घुसले असून नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. नाल्यात वाहून गेलेली कार जेसीबीच्या मदतीने बाहेर काढावी लागली

# गुजरातच्या कोरी खाडीत १५ पाकिस्तानी मासेमार पकडले

## बीएसएफची कारवाई, नौका केल्या जप्त

◆ **कच्छ, २४ ऑगस्ट**

गुजराच्या समुद्रात गस्तीवर असलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या १७६ आणि ६८ बटालियनने केलेल्या संयुक्त कारवाईत १५ पाकिस्तानी मच्छिमारांना पकडले आणि त्यांच्या ताब्यातील इंजिन फिटेड कंट्री नौका जप्त केली. भारतीय हद्दीत प्रवेश करणारे पाकिस्तानी मच्छिमार बीएसएफ पथकाला पाहून नौकेतून पळून जात होते, त्यांचा पाठलाग करून ही कारवाई करण्यात आली.

बीएसएफने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पाकिस्तानी मच्छिमारांनी मासे पकडण्यासाठी भारतीय हद्दीत प्रवेश केला होता. यावेळी बीएसएफचे पथक कोरी खाडीत गस्तीवर होते. बीएसएफच्या पथकाला पाहून मच्छिमार पळून जाण्याच्या प्रयत्नात होते. जवानांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून दोन नौका जप्त करण्यात आल्या. दुसऱ्या एका कारवाईत पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यात भारतीय हद्दीत बेकायदेशीरपणे प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असताना बीएसएफने एका वरिष्ठ बांगलादेश पोलिस अधिकाऱ्याला अटक केली. नियमित गस्त घालत असताना जवानांनी त्या अधिकाऱ्याला थांबवले. त्याची झडती घेतली असता, बीएसएफला बांगलादेशातील काही ओळखपत्रे सापडली. ◂(वृत्तसंस्था)

# माजी मुख्यमंत्री चम्पाई सोरेन नजरकैदेत

◆ **रांची, २४ ऑगस्ट**

कोट्यवधी रुपयांच्या सरकारी आरोग्य संस्थेसाठी भूसंपादनाविरोधात आदिवासी संघटनांनी केलेल्या निषेधाच्या पृष्ठभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते चम्पाई सोरेन यांना रविवारी नजरकैदेत ठेवण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले.

रांचीच्या नागरी भागात प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणाहून त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्याचा आरोप निदर्शकांनी केला. तथापि, दाव्याची पडताळणी करण्यासाठी पोलिसांशी संपर्क होऊ शकला नाही. चम्पाई सोरेन यांचा मुलगा बाबूलाल आणि रांचीला जाणाऱ्या समर्थकांनाही पोलिस ठाण्यात ताब्यात घेण्यात आले आहे, असे पोलिसांनी सांगितले.

आदिवासी संघटनांच्या निषेधाच्या पृष्ठभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून चम्पाई सोरेन यांनी नजरकैदेत ठेवण्यात आले आहे, असे रांची शहराचे पोलिस उपअधीक्षक के. व्ही. रमन यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# क्षुल्लक राजकीय फायद्यासाठी अधिवेशन वेठीस धरणे अयोग्य

## अमित शाह यांची विरोधकांवर टीका

◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

संसद आणि विधानसभा ही वादविवाद आणि चर्चेची ठिकाणे आहेत. पण, क्षुल्लक राजकीय फायद्यासाठी विरोधाच्या नावाखाली सभागृहांची एकामागून एक सत्र चालवू दिले जात नसेल, तर ते चांगले नाही, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी विरोधकांवर केली.

संसदेचे पावसाळी अधिवेशन संपल्यावर तीन दिवसांनी विरोधकांच्या निदर्शनांमुळे वारंवार व्यत्यय आणि तहकूब झाल्यामुळे कामकाज कमी झाले, असे अखिल भारतीय वक्ता परिषदेला संबोधित करताना शाह यांनी सांगितले. संसदेत जेव्हा मर्यादित चर्चा होते तेव्हा राष्ट्रउभारणीत सहागृहाचे योगदान प्रभावित होते.

लोकशाहीमध्ये चर्चा व्हायलाच हवी. पण, एखाद्याच्या राजकीय फायद्यासाठी विरोधाच्या नावाखाली सभागृहाचे कामकाज चालू दिले जात नसेल, तर ते चांगले नाही. विरोधकांना नेहमीच आवर घालायला



पाहिजे. पण, विरोधाच्या नावाखाली जर सभागृहाला दिवसेंदिवस किंवा सत्रामागून एक सत्र चालू दिले जात नसेल, तर ते चांगले नाही. देशाने आणि नागरिकांनी यावर विचार केला पाहिजे आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनी त्यावर विचार केला पाहिजे, असे अमित शाह म्हणाले.

सर्व चर्चेत काही अर्थ असला पाहिजे आणि प्रत्येकाने सभापती पदाची प्रतिष्ठा आणि आदर वाढवण्याचे काम केले पाहिजे. लोकांचे प्रश्न उपस्थित करण्यासाठी आपण निष्पक्ष व्यासपीठ उलब्ध करून देण्यासाठी काम केले पाहिजे. तिजोरी आणि विरोधी पक्ष दोघांचेही युक्तिवाद निष्पक्ष असले पाहिजेत. सभागृहाचे कामकाज संबंधित सभागृहाच्या नियमांनुसार चालते, याची आपण खात्री केली पाहिजे, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# इस्रोकडून भारतीय अंतराळ स्थानकाचे मॉड्यूल लाँच

## २०२८ पर्यंत पहिल्या तर २०३५ पर्यंत पाच मॉड्यूल पाठवणार

◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

भारतीय अंतराळ संशोधन संघटना अर्थात् इस्रोने शुक्रवारी राजधानी दिल्लीतील भारत मंडपम येथे भारतीय अंतराळ स्थानक अर्थात् बीएएसचे मॉडेल लाँच केले. भारत २०२८ पर्यंत बीएएसचे पहिले मॉड्यूल प्रक्षेपित करण्याची योजना आखत आहे.




भारताचे २०३५ पर्यंत बीएएसचे एकूण ५ मॉड्यूल अवकाशात पाठवण्याचे उद्दिष्ट आहे. पहिले मॉड्यूल बीएएस-०१ सुमारे १० टन वजनाचे असेल. ते पृथ्वीपासून ४५० किलोमीटर उंचीवर कमी पृथ्वीच्या कक्षेत स्थापित केले जाईल. बीएएसमुळे अंतराळवीरांना पर्यावरण आणि जीवन समर्थन प्रणाली श्वास घेण्यास आणि अंतराळात राहण्यास मदत होईल. भारतीय डॉकिंग आणि बर्थिंग सिस्टीममुळे मॉड्यूलसला अंतराळात सहजपणे जोडता येईल. स्वयंचलित हॅच सिस्टम सुरक्षित आणि सोपी हालचाल सुनिश्चित करेल.

मायक्रोग्रॅव्हिटी रिसर्च प्लॅटफॉर्म वैज्ञानिक प्रयोग करेल आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करेल. भारतीय अंतराळ स्टेशन भारताचे स्वदेशी अंतराळ स्टेशन असेल, जे पृथ्वीपासून ४५० किमी अंतरावर लो अर्थ ऑर्बिटवर बसवले जाईल. आतापर्यंत जगात केवळ दोन अंतराळ स्टेशन आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशन हे अमेरिका, रशिया, यूरोप, जपान, कॅनडा यांच्या अंतराळ स्टेशन मिळून संचलित करतात तर तियांगोंग अंतराळ स्टेशन हे चीनचे आहे. ◂(वृत्तसंस्था)

### मॉड्यूलचे वजन १० टन

» भारताचे अंतराळ स्टेशन पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित केले जाईल. २०३५ पर्यंत अंतराळात बसवले जातील. बीएएस ०१ भारतीय अंतराळ स्टेशनचे पहिले मॉड्यूल असेल, ज्याला २०२८ मध्ये लॉन्च करण्यात येईल. या मॉड्यूलचे वजन १० टन इतके आहे. ते आकाराने ३.८ मीटर रूंद आणि ८ मीटर लांबीचे आहे. त्यात डॉकिंग सिस्टिम, भारत बर्थिंग मॅकेनिज्म आणि स्वयंचलित हॅच सिस्टम बसवली आहे. यात अंतराळवीरांना श्वास घेण्यायोग्य हवा, पाणी आणि तापमान प्रदान करेल. ■

### अंतराळ पर्यटनाला चालना मिळेल

» हे अंतराळ स्थानक अंतराळ पर्यटनाला चालना देईल. या कक्षीय प्रयोगशाळेच्या संसाधनांचा फायदा घेऊन भारत व्यावसायिक अंतराळ क्षेत्रात प्रवेश करेल. बीएएस चालू आंतरराष्ट्रीय सहकार्यात योगदान देईल आणि वैज्ञानिक संशोधनाचे केंद्र म्हणून काम करेल. ते तरुण पिढीला अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानात करिअर करण्यासाठी प्रेरित करेल. ■

# ही शेवटची लढाई; प्रत्येकाने मुंबईला या

## मनोज जरांगे-पाटलांचे बीडच्या सभेत आवाहन

**बीड :**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. तत्पूर्वी मनोज जरांगे यांनी बीड येथील भाषणात बोलताना सरकारला इशारा दिला आहे. तसेच बीडमध्ये मराठा समाजाच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, यावर प्रतिक्रिया देताना बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. सत्ता येत असते, ती बदलत असते हे लक्षात ठेवा, असा इशारा जरांगे पाटलांनी दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले, आपल्याला बीडच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, ठीक आहे. पण आमचा डीजे वाजवू दिला नाही, यापुढे बीडमध्ये कोणाचाही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. देवेंद्र फडणवीस यांनी जरा पोलिसांना आदेश दिले असतील आणि पोलिस जर चुकीचे काम करत असतील तर तसे करू नका. एवढी विनंती करूनही जर एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला काही करायचे असेल तर त्या महादेव मुंडेंच्या मारेकऱ्यांना शोधा, असे आवाहन देखील जरांगे यांनी केले. बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचे ते करा असे थेट आव्हान मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले. आम्ही शांततेत मुंबईला जाणार आणि शांततेत मराठा आरक्षण घेणार, मराठा समाजावर आलेले संकट मोडून काढणार. सरकारने जर मराठ्यांना आरक्षण दिले, आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही मुंबईला कशाला येऊ? इथूनच मंत्रालयावर गुलाल उधळतो.

मनोज जरांगे म्हणाले, गडबड घोटाळा करु नका. त्यामुळे मराठा सम ाजावर संकट घोंघावत आहे. ते संकट आता मोडून काढायचे आहे. तुमच्या आणि माझ्या भावनांचा सत्ताधाऱ्यांनी वापर करुन घेतला. मराठ्यांची ताकद मोठी आहे, पण आपण विचारांनी चाललो नाही. त्यामुळे आपल्या मुलांचे नुकसान झाले. प्रत्येकाने आपला वापर केला. उभ्या पिढ्यांचे वाटोळे झाले. यापुढे आपण विचारांनी चालायचे.

### आता ही शेवटची लढाई

तुमच्या जातीचा आमदार, खासदार आहे म्हणून तुमच्या पोराबाळांची फी माफ होणार नाही, त्याला नोकरी मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने मुंबईला यावे. कुणा राजकीय नेत्याचे ऐकून गावात थांबू नका. तुमच्या आमदार, खासदारांना मुंबईला यायला सांगा. सरपंचापासून सगळ्या नेत्यांना मुंबईला यायला सांगा. आता ही शेवटची लढाई असेल, असेही यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले.

बीडमधील मराठा समाज आता एक झाला आहे, गर्व वाटेल असे काम करतोय. आज बीडची गर्दी पाहून सत्ताधारी बेजार झालेत. आता असेच मुंबईला जायचे. मुख्यमंत्र्यांनी नुकतेच २९ जाती या ओबीसी आरक्षणामध्ये घेतल्या, त्यांची मागणी नसतानाही त्यांना दिले. पण मराठ्यांची मागणी असतानाही मराठ्यांना आरक्षण दिले जात नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# संपादकीय

## अग्रलेख...

# ‘भाई-भाई’चा मोह नको

१९व्या शतकात अमेरिका, रशिया आणि युरोपातील काही बडे देश वगळता ऑस्ट्रेलिया, आशिया, लॅटिन अमेरिका आणि आफ्रिका खंडातील जवळजवळ सर्वच देश युरोपियन देशांच्या गुलामगिरीत होते. ब्रिटिश, डच, पोर्तुगीज, फ्रेंचांनी सुमारे दोनशेपेक्षा जास्त वर्षे गरीब देशांचे रक्तशोषण करून तिजोऱ्या भरल्या. आज जे युरोपियन देश मानवतेच्या नावाने गळा काढत असतात त्यांच्याच पूर्वजांनी नाना तऱ्हेचे अत्याचार नागरिकांवर केले आहेत. जगाला लोकशाही मूल्ये, मानवतेचे धडे देण्याचा दावा करणाऱ्या ब्रिटिशांनी तर जवळपास ६५ देशांना गुलाम बनविले होते.

१८५७ पासूनच्या उठावानंतर भारतीयांनी गुलामगिरीचे जोखड झुगारण्यासाठी संघर्ष सुरू केला. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले पण जाता जाता ब्रिटिशांनी हिंदुस्थानच्या विभाजनाची बीजे पेरून ठेवली. तिबेट आणि ब्रह्मदेश (आताचा म्यानमार) हिंद भूमीपासून वेगळे केले. १८५७ च्या उठावात काडतुसाला गाय आणि डुकराची चरबी लावून देशाची हिंदू-मुस्लिमांमध्ये विभाजनाची सोय करून ठेवली होती. भारताचे जेवढे तुकडे होतील ते करण्याचे प्रयत्न केले. अगदी भारतातून काढता पाय घेत असताना विलियम ब्राऊन या लष्करी अधिकाऱ्याने जम्मू-काश्मीरचे तत्कालीन संस्थानिक महाराजा हरिसिंग यांच्याविरोधात उठाव करीत गिलगिट-बाल्टिस्तान पाकिस्तानात विलीन केले. म्हणजेच ज्या पाताळयंत्री, दृष्ट आणि कृतघ्न इंग्रजांनी ज्या ताटात खाल्ले त्या ताटालाच लाथ मारली. कारण, भविष्यात हिंदुस्थान चारही दिशांनी समस्यांनी घेरलेला असेल, याची काळजी घेतली. आज, जर गिलगिट-बाल्टिस्तान हा सामरिक आणि युद्धनीतीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा भूभाग प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या ताब्यात असता तर आज सिल्क रूटवरून होणाऱ्या व्यापारात आपला वाटा सर्वाधिक असता. हिंदुस्थानचा माल, रेल्वे अथवा रस्तामार्गे थेट युरोपात पोहोचला असता. त्यामुळे आज अमेरिका, रशिया अथवा चीन नव्हे तर हिंदुस्थान जागतिक महासत्ता असता. इंग्रजांनी जे नुकसान करायचे होते ते तर केलेच पण आपल्या तत्कालीन नेतृत्वानेही घोडचुका केल्या, ज्याचे परिणाम आज आपण भोगतो आहोत. तिबेट, म्यानमार गमावून आपण पूर्वोत्तर तर गिलगिट-बाल्टिस्तानवर पाणी सोडून पश्चिमेचा मार्ग गमावला आहे. स्वातंत्र्यानंतर आपण ज्या परराष्ट्रनीतीचा अवलंब केला त्यामध्ये केवळ एकच मित्रदेश गवसला तो म्हणजे रशिया. याची प्रचीती आपल्याला पदोपदी येत आहे. जगातील सर्वांत मोठी आणि दीर्घकाळ चालणारी लोकशाही व्यवस्था असलेल्या हिंदुस्थानला अडचणीत आणण्याचे प्रयत्न अमेरिका, युरोपीय देश आणि चीन करीत आले आहेत. त्याला आपले शेजारी पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, बांगलादेश आणि श्रीलंका हे देश हातभार लावत असतात. यावरून एक बाब सिद्ध होते की व्यवहारी जगात सहिष्णुता, शांतता, मित्रता आदी मूल्यांना काडीचीही किंमत नाही. तसे नसते तर पाकिस्तानने पाचवेळा आक्रमण केलेच नसते.

कारगिल आणि पहलगामच्या घटना युद्धापेक्षा कमी नाहीत. भूभाग, लोकसंख्या, नैसर्गिक संसाधने आणि आर्थिक शक्तीचा विचार करता आसपासही नसणारा दरिद्री असलेला पाकिस्तान जर आपल्यावर पाचवेळा युद्ध लादत असेल तर यामध्ये चूक ही पाकिस्तानची नव्हे तर हिंदुस्थानचीच आहे. वारंवार दंश करून घायाळ करणाऱ्या पाकिस्तान नावाच्या विषारी नागाचा फणा ठेचून टाकण्याऐवजी आपण त्याला तसेच सोडून देण्याच्या चुका वारंवार केल्या आहेत. स्वातंत्र्य मिळून जवळपास आठ दशके होत आली आहेत. या काळात असे एकही दशक हिंदुस्थानच्या नशिबात आले नाही जिथे जनतेला सुख, शांती अनुभवायला मिळाली असेल. कदाचित प्रत्येकच दशकात बाह्य धोक्यांचा सामना करावा लागला नसेल पण अंतर्गत शत्रूंनी हिंदुस्थानला त्रासून सोडले. काश्मिरातील दहशतवाद, अतिपूर्वेतील सात राज्यांमधील बंडखोरी आणि धर्मांतरण, नक्षलवाद या अंतर्गत धोक्यांचा सामना करता करता देशाची शक्ती खर्ची पडली आणि आता अर्बन नक्षलवादाच्या रूपात उघडपणे न दिसणारा धोका पुढ्यात उभा ठाकला आहे. देशाच्या मुळावर घाव घालण्याचे कुटिल मनसुबे उघड उघड आखले जात आहेत. २०१४ नंतर केंद्रातील मोदी सरकारने अंतर्गत धोक्यांचा समर्थपणे सामना करीत देश आज जगातील तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून पुढे आला आहे. पण, हिंदुस्थानची ही प्रगती अमेरिका आणि युरोपियन देशांच्या डोळ्यात सलते आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा आधार घेत आशियातील चीननंतर दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याच्या उद्देशाने अमेरिका आणि युरोपियन देशांनी ५० टक्के व्यापार शुल्क लादले. रशियाकडून कच्चे तेल खरेदी न करण्याच्या धमक्या देत हिंदुस्थानला दबावात ठेवण्याची खेळी खेळली जात आहे. पण, एकीकडे रशिया अमेरिकेसह युरोपियन देशांच्या दबावाला ठोकरून लावत असल्याने डोनाल्ड ट्रम्प यांची इज्जत पार धुळीस मिळत आहे. रशियाकडून हिंदुस्थानपेक्षा अधिक तेल चीन खरेदी करतो पण ट्रम्प यांनी चीनला सूट दिली. कोरोना महामारीत जगातील अनेक देश आर्थिक संकटात सापडले असताना मोदी सरकारच्या आर्थिक धोरणामुळे हिंदुस्थानची अर्थव्यवस्था स्थिर राहिली. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे दीर्घकालीन हित लक्षात ठेवून नरेंद्र मोदी यांनी अमेरिका आणि युरोपियन देशांचा दबाव झुगारून लावला. हिंदुस्थान आणि अमेरिका यांच्यातील संबंध २००८ पासून सुरळीत होण्यास प्रारंभ झाला. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील यूपीए सरकारच्या काळात दोन्ही देशांमध्ये नागरी आण्विक करार झाला. व्यापारही सुरळीत झाला. सामरिक संबंध वाढले. बिल क्लिंटन, बराक ओबामा, डोनाल्ड ट्रम्प (पहिली कारकीर्द), ज्यो बायडेन या अध्यक्षांच्या कार्यकाळात दोन्ही देशांतील संबंध सर्वंकष दृष्टीने दृढ आणि मजबूत झाले. कठीण काळ हा खऱ्या मित्राची ओळख करून देत असतो. काही प्रसंगी मित्रालाही संतुलित धोरणाचा स्वीकार करावा लागतो. चीनसोबत २०१७ मधील डोकलाम आणि २०२० मधील गलवान संघर्षात अमेरिका आणि युरोपियन देशांनी उघडपणे हिंदुस्थानची बाजू घेतली तर चीनने तटस्थतेचे धोरण स्वीकारले होते. तर रशियन-युक्रेन युद्धात चीनने थेट रशियाच्या पाठीशी उभे असताना आपण कुणाचीही बाजू घेतली नाही. रशिया-युक्रेन युद्ध लांबत असल्याने आणि पुतिन यांच्या फौजांनी नाटो सदस्य देश हंगेरीच्या सीमेजवळ हल्ले चढवून थेट अमेरिका आणि युरोपियन देशांना आव्हान दिले. आर्थिक आणि संरक्षण मदत देऊनही गेल्या अडीच वर्षांपासून रशियाचे हल्ले सुरूच असल्याने नाटो देश आणि अमेरिका हतबल ठरले आहेत. आणि याचा ठपका हिंदुस्थान आणि चीनवर ठेवत डोनाल्ड ट्रम्प यांनी जबर व्यापारशुल्क आकारले. चीनची उत्पादन पुरवठा साखळी मजबूत आणि थेट अमेरिकन आणि युरोपियन नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारी असल्याने अमेरिकन अध्यक्षांनी चीनवर ३४ टक्के तर भारतावर सर्वाधिक ५० टक्के व्यापार शुल्क आकारले.

भारतीय अर्थव्यवस्था आणि जीवनाचा कणा असलेल्या कृषी आणि दुग्धोत्पादन बाजारपेठा खुल्या करण्यास नकार दिल्याने ट्रम्प यांनी पहिल्या टप्प्यात २५ तर रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवल्याने आणखी अतिरिक्त २५ टक्के व्यापारशुल्क लावले. पण, वर्तमान सरकारने ट्रम्प यांचा दबाव झुगारून लावला आणि देशाचे हित आणि ऊर्जाविषयक गरजा लक्षात ठेवून जेथे परवडणाऱ्या दरात उपलब्ध असलेले कच्चे तेल खरेदी करण्याची भूमिका घेतली. दुसरीकडे अमेरिकेच्या धोरणामुळे व्यापारात होणारी तूट भरून काढण्याचा प्रयत्न म्हणून चीनसोबतही व्यापाराला चालना देणे सुरू केले आहे. चीन आणि अमेरिका हे बेभरवशाचे सहकारी असले तरी काळाची गरज म्हणून हिंदुस्थानला चीनसोबत व्यापारी संबंध सुधारावे लागणार आहेत. तसे दोघेही अत्यंत घातकी, व्यवहारी आणि युद्धखोर आहेत. पण, शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, या धोरणानुसार दिल्ली आणि बीजिंग यांना पावले टाकावी लागणार आहेत. सोबतच मोदी सरकारला ‘हिंदी-चिनी भाई भाई’चा मोह टाळावा लागणार आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# आधार आता ‘निराधार’?

निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदारयाद्यांची तपासणी, छाननी करण्याचे काम चालविले आहे, जो आयोगाचा अधिकार आहे. आणि यात आधार कार्ड फक्त ओळखपत्र आहे, तो नागरिकत्वाचा पुरावा नाही असा युक्तिवाद आयोगाने केला तर सर्वोच्च न्यायालयाने आधार कार्डला महत्त्व देत, त्याचा स्वीकार आयोगाने करावा असे सुचविले. भारतात नागरिकांना अनेक प्रकारचे कार्ड दिले जात आहेत. यात निवडणूक आयोगाचे स्वतंत्र ओळखपत्र आहे, आयकर विभागाचे स्वतंत्र कार्ड आहे, काही वर्षांपासून त्यात आधारची भर पडली आहे. मात्र, प्रत्येक भारतीयासाठी नागरिकत्व कार्ड नाही. असे ओळखपत्र अस्तित्वातच नसल्याने बिहारची समस्या उभी ठाकली आहे.

**जन्म तारीख :** जगातील अनेक देशांमध्ये सर्वांत महत्त्वाचे व खात्रीशीर मानले जाणारे ओळखपत्र म्हणजे जन्मतारखेचा दाखला. आणि हा दाखला जन्माच्या दिवशीच तयार केला जातो. मुलाचा जन्म होताच, त्या दिवशी त्याचा वा तिचा जन्म दाखला तयार केला जातो, त्याला एक क्रमांक दिला जातो आणि हा क्रमांक संबंधिताचा मृत्यू होईपर्यंत कायम राहतो आणि त्याच्या नागरिकत्वाचा तो सर्वांत प्रमुख पुरावा मानला जातो. भारतात आजवर जन्मदाखला त्याच दिवशी तयार करण्याची सक्ती झालेली नाही आणि याचा परिणाम म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे बनावट दाखले तयार केले जात आहेत आणि केले जाणार आहेत.

**आधार की निराधार? :** बिहारमध्ये ६५ लाख मतदारांची नावे मतदारयाद्यांमधून वगळण्यात आली आहेत. यातील काही लाख मतदार कायमस्वरूपी दुसऱ्या राज्यात राहावयास गेले आहेत, काहींची नावे एकापेक्षा जास्त मतदारसंघात नोंदविली गेलेली आहेत तर काही लाख मतदार मृत झालेले आहेत. राज्यातील विधानसभा जागांचा विचार करता सरासरी २५ हजारावर मतदार एका मतदारसंघातून कमी करण्यात आले आहेत. नंतर यावर राजकीय वादंग सुरू झाले. संसदेचे कामकाज ठप्प झाले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. येथे झालेल्या सुनावणीत आयोगाने आधार- नागरिकत्वासाठी ‘निराधार’ ठरविले. ते फक्त ओळखपत्र आहे अशी भूमिका आयोगाने घेतली आहे, जी सर्वोच्च न्यायालयाने अद्याप तरी स्वीकारलेली नाही. आधार नागरिकत्वाचा आधार नाही, आयकर विभागाचे पॅन कार्ड नागरिकत्वाचा आधार होऊ शकत नाही. निवडणूक आयोगाच्या यादीत नाव असणे हेही नागरिकत्वाचा पुरावा मानला जात नाही. अन्यथा एका राज्यातून ६५ लाख मतदार कमी करण्यात आले नसते. निवडणूक आयोगाने कमी केलेले ६५ लाख मतदार बोगस आहेत हे मान्य केले तर मग लोकसभा निवडणुकीत यातील




अनेकांनी मतदान केले हे मान्य करावे लागेल आणि ही बाब एका राज्यातील आहे. अनेक राज्यांत निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांची छाननी सुरू केल्यास आणि त्यात लाखो मतदारांचे नाव कमी केल्यास हे सारे अवैध नागरिक आहेत हेही मान्य करावे लागेल. अशा नागरिकांचे भारत सरकार काय करणार?

**एकच कार्ड? :** भारत सरकारने वेगवेगळ्या प्रकारची ओळखपत्रे जारी करण्याऐवजी एकच नागरिकत्व ओळखपत्र जारी करण्याबाबत विचार केला पाहिजे. आणि हे ओळखपत्र जन्माच्या दिवशीच जारी करण्यात आले पाहिजे. अनेक देशांत यासंदर्भात अतिशय कडक प्रक्रिया ठरविण्यात आली आहे. एकदा असे कार्ड तयार झाले की मग तेच नागरिकत्वाचे कार्ड मानले जाईल. काही देशांमध्ये तर जन्मतारखेचे प्रमाणपत्र हेच नागरिकत्वाचे ओळखपत्र मानले जाते. भारतात पूर्वी पुरेशी रुग्णालये नव्हते. मुला-मुलीचा जन्म घरीच होत असे. आता ती स्थिती जवळपास संपलेली आहे. काही अपवाद वगळता बहुतेक जन्म हे रुग्णालयातच होत असतात. त्याच दिवशी त्या मुलाचे-मुलीचे नागरिकत्व कार्ड का तयार केले जाऊ शकत नाही?

**पैसा वाचेल :** आधार, निवडणूक आयोग, आयकर विभाग, रेशन कार्ड असे वेगवेगळे दस्तावेज तयार करण्यासाठी करोडो रुपये खर्च केले जातात आणि यानंतरही बोगस नागरिकत्वाचा मुद्दा आहे तो आहेच. याऐवजी सरकारने एक मास्टर कार्ड तयार करावे, त्यात सारा तपशील देण्यात आल्यास निवडणूक आयोग, आयकर विभाग यांना वेगवेगळे कार्ड तयार करावे लागणार नाहीत. यासाठी वेगळी यंत्रणा उभारावी लागणार नाही, यासाठी करोडो रुपयांची व्यवस्था करावी लागणार नाही.

**सुनावणीचे मुद्दे :** सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात झालेली सुनावणी प्रामुख्याने दोन मुद्द्यांवर झाली. मतदारयादी तयार करण्याचा, या यादीची छाननी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार व मतदान करण्याचा सामान्य नागरिकाचा अधिकार. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाचा अधिकार मान्य केला पण, या प्रक्रियेत सामान्य मतदाराचा मतदान करण्याचा अधिकार हिरावून घेता काम नये अशी संतुलित भूमिका न्यायालयाने घेतली आहे. निवडणुकीच्या ऐन तोंडावर आयोगाने मतदारयादी जाहीर केली आणि त्यात एखाद्या पात्र मतदाराचे नाव नसेल तर त्याला आपला मताधिकार वापरण्याची संधी मिळाली पाहिजे. यासाठी निवडणुकीच्या ऐन तोंडावर मतदारयाद्या जाहीर न करता पुरेसा कालावधी असताना त्या घोषित केल्या पाहिजेत जेणेकरून अन्याय झालेल्यांना आयोगाकडे दाद मागता येईल व आपल्या नावाचा समावेश निवडणुकीपूर्वी मतदारयादीत करता येईल अशी सर्वोच्च न्यायालयाची भूमिका दिसून येते, जी योग्य अशीच आहे.

**वादग्रस्त आदेश :** सर्वोच्च न्यायालयाचा एक निर्णय मात्र वादग्रस्त ठरला. बेवारशी श्वानांना पकडून त्यांची रवानगी निवारागृहात करावी असा एक निर्णय न्यायालयाने दिला. याचे तीव्र पडसाद केवळ राजधानीतच नाही तर देशात अन्य ठिकाणी उमटले. देशभरात बेवारशी श्वानांची संख्या वाढत आहे. पण, सरसकट त्यांना पकडून अस्तित्वातच नसलेल्या निवारागृहात पाठविणे हा निर्णय क्रूर होता. बेवारशी श्वानांची नसबंदी करून त्यांची संख्या कमी करणे, त्यांचे लसीकरण करणे या बाबी मनपा-नपा यांनी करावयास हव्या होत्या. त्यांनी त्या केल्या नाहीत. अशा श्वानांची संख्या वाढली. मग, दोन चार घटनांचा दाखला देत सर्वोच्च न्यायालयाने वादग्रस्त निर्णय जारी केला.

**अविभाज्य भाग :** श्वान हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे, त्याला मानवी जीवनापासून वेगळे करून चालणार नाही याची नोंद घेण्यास सर्वोच्च न्यायालय विसरले. नोव्हेंबर महिन्यापासून राजधानीत थंडी सुरू होते. त्यापूर्वीच अनेक ठिकाणी लहान लहान झोपड्यांसारखे निवारे बांधलेले दिसू लागतात. श्वानांचा थंडीपासून बचाव व्हावा म्हणून सामान्य जनतेने हे बांधलेले असतात. त्यात श्वानांना ऊब मिळत राहावी म्हणून पुरेसे गवत ठेवलेले असते. कोणतीही सरकारी संस्था हे करीत नसते. तर सामान्य लोक करीत असतात. सर्वोच्च न्यायालयाने या साऱ्याचा विचार न करता असा एक आदेश पारित केला, ज्याची अंमलबजावणी करणे शक्य नव्हते. दिल्ली सरकारजवळ श्वानांसाठी निवारे नाहीत, ती हाताळण्यासाठी कर्मचारी वर्ग नाही, त्यासाठी पुरेसा पैसा नाही. प्रथम समस्या तयार होऊ द्यायची आणि नंतर खडबडून जागे होत अवास्तव उपाययोजना करावयाची हा आमच्या कार्यप्रणालीचा अविभाज्य भाग झाला आहे. यात सुधारणा केव्हा होणार?

## वेध

**अनिल फेकरीकर**

# गावकऱ्यांनी शोधला अरोलीत गुरू!

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्याचा अधिकार संबंधित विभागालाच असतो. तोच विभाग पवित्र पोर्टलच्या माध्यमाने शिक्षकांची नेमणूक करीत असतो. पण पवित्र पोर्टलची प्रणाली ‘सरकारी काम आणि बारा महिने थांब’ यानुसार चालते. अशावेळी मुलांनी त्या काळात करायचे काय? त्यांनी पवित्र पोर्टलसाठी लागणाऱ्या वेळेसाठी आपला अभ्यास बुडवायचा का, हा विचार करून नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात येणाऱ्या अरोली ग्रामपंचायतच्या सरपंच रोशनी प्रशांत भुरे यांनी पुढाकार घेत आपल्या अधिकारांचा वापर करीत पहिल्यांदा विद्यार्थ्यांसाठी गुरू शोधून दिला. हा प्रयोग संपूर्ण नागपूर जिल्ह्यासाठी आता खऱ्या अर्थाने गौरवपूर्ण ठरला आहे.

आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक नाही अशी ओरड करण्यापेक्षा आपणच मार्ग शोधायला हवा, असा विचार सरपंच रोशनी भुरे यांनी केला. त्यांनी विशेष ग्रामसभा आयोजित केली. या ग्रामसभेत शिक्षक नेमला जावा याकरिता ठराव पारित करण्यात आला. त्यानंतर सरपंचांच्या पुढाकाराने मुलांना गुरू मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला. मौदा तालुक्यातील अरोली गाव फार मोठे नाही. मात्र येथील गावकऱ्यांनी दाखविलेला मनाचा मोठेपणा नक्कीच मानावा लागेल. येथील सरपंच रोशनी भुरे यांनी गावातील जिल्हा परिषद शाळेत एका शिक्षकाची कमतरता असल्याचे पाहून आपणच काही तरी करावे म्हणून पुढाकार घेतला. आजच्या तारखेत स्वतःहून चांगल्या कार्यासाठी पुढाकार घेणारे दुर्मिळ झाले आहेत. याच दुर्मिळ लोकांपैकी एक ठरल्या आहेत सरपंच रोशनी भुरे. त्यांनी गावची प्रमुख या नात्याने आपल्या गावातील शाळेत शिकणाऱ्या मुलांची व्यथा समजून घेत होतकरू गुरूचा शोध सुरू केला. याकरिता त्यांनी ग्रामपंचायतीत ठराव पारित करून सर्व सदस्यांना विश्वासात घेतले. अरोली जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक संदीप दक्ष यांचेही सहकार्य मिळवले. यातूनच नवा प्रयोग उदयास आला. प्रथमतः गावातील प्रत्येकाला याची माहिती व्हावी याकरिता खास दवंडी देण्यात आली. त्यात जी व्यक्ती गावातील मुलांना शिकवायला तयार असेल त्यांनी आपली शैक्षणिक योग्यतेच्या कागदपत्रांसह अर्ज ग्रामपंचायतकडे सादर करावा, असे आवाहन केले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत ६ इच्छुक उमेदवारांनी पटापट गावाच्या भल्यासाठी अर्ज केले. त्या अर्जांची पडताळणी शाळा समितीने ग्रामपंचायतच्या मदतीने केली. सर्व प्रक्रिया नियमानुसार करून सरपंच रोशनी भुरे, मुख्याध्यापक संदीप दक्ष, ग्रामपंचायत सदस्यांनी मिळून संबंधितांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून उच्चशिक्षित रीता विनोद नान्हे या महिलेची निवड जिल्हा परिषद शाळेसाठी शिक्षिका म्हणून करण्यात आली. आता राहिला प्रश्न पगाराचा तर त्यावरही ग्रामपंचायतने तोडगा काढून मार्ग शोधला. सर्व पगार ग्रामपंचायत देणार असल्याचा ठराव सर्वसंमतीने पारित करण्यात आला. म्हणजेच काय तर समजा गावकऱ्यांनी विचार केला तर राव करणार नाही असे चमत्कारिक कार्य सहजतेने करू शकतात, हे सिद्ध केले. अरोली गावातील जिल्हा परिषद शाळेत १ ते ८ वर्ग आहेत. विशेष म्हणजे पूर्वी या शाळेत मुलांची संख्या केवळ ८० होती. पण आता ती वाढून ११८ झाली आहे. दुसऱ्या गावात विद्यार्थी घटत असताना आपल्या गावात संख्या वाढत असल्याचे पाहून सर्वांनाच सरपंच रोशनी भुरे यांचा निर्णय मनापासून पटला. आता प्रश्न असा पडतो की, इतर गावांतील लोकांनीही आपल्या येथील जिल्हा परिषद शाळा टिकविण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. सरकारी शाळा, सरकारी रुग्णालये, एसटी बस, सरकारी उपक्रम टिकले तरच सामान्य माणूस भविष्यात जगू शकतो. अन्यथा सामान्य माणसाला खाजगीकरणाच्या चक्रव्यूहात जगणे कठीण होईल. मरणाशिवाय त्याच्या समोर गत्यंतर राहणार नाही. हा दूरगामी धोका समजून घेत अरोलीतील गावकऱ्यांनी एकमत दाखविले. तसेच एकमत दाखवीत इतरांनीही राजकारण बाजूला सारीत मुलांसाठी पुढाकार घेतला तर महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेची एकही शाळा बंद पडणार नाही. शेवटी, कल्पकतेला कर्तृत्वाची जोड दिली तरच अद्भुत कार्ये जन्माला येतात. त्याकरिताच सामान्य माणूस जागृत झाला पाहिजे. त्याने राजकारणाचा चष्मा परिधान न करता प्रत्येक प्रश्नाला सोडविण्याकरिता डोळसपणे पाहण्याची गरज आहे. समस्या भलेही गंभीर असेल, पण तोडगा काढणारे सरपंच रोशनी भुरे यांच्यासारखे खंबीर नेतृत्व करणारे असतील तर ते नक्कीच गाव नंबर वन होईल. एकंदरीत पाहता जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी हेही यातून प्रत्ययास आले.



९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# गणपती बाप्पाकडून काय शिकावे?

पुराण काळापासून आतापर्यंत गणपती सर्व काळांमध्ये भक्तांची प्रिय देवता आहे. गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता संबोधले जाते. गणेशाला विघ्नहर्ता सुद्धा म्हटले जाते. कुठल्याही पूजेमध्ये पूजनाचा प्रथम मान भगवान गणेशाला दिला जातो. जनमानसामध्ये भगवान गणेशाची जी प्रतिमा आहे, भक्ती आहे, ती अनन्यसाधारण आहे आणि म्हणूनच आज २०२५ मध्ये सर्व आबालवृद्ध गणेशाच्या स्थापनेपासून तर त्याच्या विसर्जनापर्यंत सर्व गोष्टींमध्ये रममाण झालेले असतात. याच गणेश भक्तीचा उपयोग लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी समाज जागृतीकरिता केला होता. त्यांनी सुरू केलेल्या गणेश उत्सव व शिवजयंती उत्सव या दोन्ही उत्सवांना जनतेमध्ये मोठी मान्यता आहे व आजही ते सुरू आहेत.

गणपतीचे स्वरूप जर आपण आपल्या डोळ्यासमोर आणले तर भगवान गणेशाच्या डोक्यावर मुकुट असतो. मुकुट त्यांच्याच डोक्यावर असतो जे सामर्थ्यवान आहेत, शक्तिमान आहेत. मुकुट हे प्रतिष्ठेचे, वैभवाचे प्रतीकसुद्धा आहे. भगवान गणेशाच्या ललाटावर जे त्रिशूळचे चिन्ह आहे. ते त्रिशूळ म्हणजे सत्त्व, रज आणि तम यांच्यावर असलेले नियंत्रण दर्शविते. बघणाऱ्याला सुद्धा त्याच्यातील सत्त्व, रज आणि तम या गुणांची आठवण होऊ शकते.

गणेशाचे मस्तक हे एखाद्या बालकाचे नसून हत्तीचे आहे. त्यामागची कथा सर्वांना माहीत आहेच. एखाद्या अपघातात जर एखाद्याचा एखादा अवयव निकामी झाला, त्याला बदलावे लागले किंवा कापून वेगळे करावे लागले तर त्या व्यक्तीच्या मनात नेहमी त्याच्याजवळ ती गोष्ट नाही याचे किंवा माझ्या शरीराचा हा अवयव चांगला दिसत नाही याचे दुःख असते. तो माणूस नेहमी त्याच दुःखामध्ये असतो. परंतु भगवान गणेशांनी आपल्याला हे दाखवून दिलेले आहे की तुम्ही जर विद्वान व सामर्थ्यवान असाल, चांगले काम करणारे असाल तर लोक तुम्हाला तुमच्या आहे त्या स्वरूपात सुद्धा स्वीकारू शकतात. त्यामुळे जे नाही त्याच्याबद्दल शोक करीत बसण्यापेक्षा जे आहे त्याचा सर्वोच्च वापर कसा करता येईल याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. भगवान गणेशाचे मस्तक मोठे असले तरी ते विश्वातील सर्व विचार सामावून घेण्यासाठी मोठे आहे. बरेचदा अनेक लोक एकांगी विचारसरणीचे असतात. त्यांच्या डोक्यामध्ये इतरांचा पण काही दृष्टिकोन असू शकतो याचा त्यांना मागमूसही नसतो. गणेशाचे मोठे मस्तक पाहून आपल्याला व्यापक विचार, इतरांचा विचार व विविध विचार समजून घेण्याची पात्रता अंगी आली पाहिजे याची आठवण होणे आवश्यक आहे.



गणपतीचे डोळे बारीक आहेत, लहान आहेत. बारीक म्हणजे बारकाईने प्रत्येक गोष्ट बघणारे आहेत. डोळे तर सगळ्यांनाच असतात, तरीपण चालता चालता एखाद्या गोष्टीला धडक देणाऱ्याला आपण म्हणतो की डोळे नाहीत का? पण डोळे नसेल तर तो चालेल कसा? याचा अर्थ असा की डोळे असूनही अनेकांचे जिथे पाहिजे तिथे लक्ष नसते. विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष नसते, कर्मचाऱ्यांचे कामात लक्ष नसते, शिक्षकांचे शिकवण्यात लक्ष नसते, कामगारांचे श्रमात लक्ष नसते, राजकीय नेत्यांचे लोकसेवेकडे लक्ष नसते. गणपतीचे बारीक डोळे आपल्याला सांगतात की प्रत्येक गोष्टीचा बारकाईने विचार करा. एखादा माणूस एखाद्या कागदपत्रावर सही करतो नंतर जेव्हा तो त्याच्यामध्ये अडकतो त्यावेळेला त्याला कोणीतरी विचारते की, तुम्ही सही केलेली आहे तेव्हा वाचले नव्हते का? तर तो म्हणतो की वाचले होते पण बारकाईने वाचले नव्हते. त्यामुळे भगवान गणेशाचे डोळे आपल्याला बारकाईने काळजीपूर्वक सर्व गोष्टी बघण्याची आणि मग खात्री करण्याची शिकवण देतात.

भगवान गणेशाचे कान मोठे आहेत. मोठे कान आपल्याला सांगतात की भरपूर ऐका. जर तुम्ही समोरच्याचे ऐकत राहिला तर हळूहळू त्याच्या जवळचे बोलण्यासारखे जे आहे ते सगळं संपून जाईल व त्यानंतर त्याचे सगळे मुद्दे तुम्ही ऐकलेले असल्यामुळे त्याला कशा पद्धतीने उत्तर द्यायचे हे तुमच्या लक्षात येईल. मोठ्या कानांमुळे तुम्हाला तुमची प्रशंसाही ऐकू येईल आणि तुमच्यावरची टीकाही ऐकू येईल. प्रशंसेमुळे तुम्ही प्रोत्साहित व्हाल आणि टीकेमुळे स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी वाव मिळेल. गणेशाचे मोठे कान हा संदेश आपल्याला देत आहेत.

कान मोठे आहेत परंतु गणेशाचे तोंड लहान आहे. म्हणजे भरपूर ऐका, विचार करा आणि कमी शब्दात त्याचे उत्तर द्या. जितके तुम्ही अधिक बोलाल तेवढे तुम्ही एखाद्या गोष्टीमध्ये फसण्याची शक्यता अधिक असते. अनावश्यक बोलू नका हा संदेश भगवान गणेश आपल्याला देत आहेत.

गणेशाची सोंड लांब आहे. जे पाहिजे ते घेण्यासाठी पण सोंडेचा वापर आहे, जे नको ते दूर फेकण्यासाठी पण सोंडेचा वापर आहे. श्वास घेणे, पाणी पिणे, खाणे, शत्रूला सोंडेने धरून दूर फेकून देणे ही सगळीच कामे सोंड करते. सोंड आपल्याला सांगते की तुमच्या विरोधातील संकटांचा तुम्हाला दुरूनच वास आला पाहिजे. सोंड आपल्याला सांगते जो तुमच्या हिताचा आहे त्याला जवळ घ्या, जो अहित करणारा आहे त्याला उचलून दूर फेकून द्या.

भगवान गणेशाचे पोट मोठे आहे. मोठे पोट म्हणजे सर्व चांगल्या-वाईट गोष्टी साठवण्याची आणि पचवून टाकण्याची क्षमता या पोटामध्ये आहे. भगवान गणेश आपल्याला सांगतात की तुमचेही पोट मोठे असू द्या. म्हणजे शारीरिक अर्थाने नाही तर आई जशी आपल्या लेकरांचे अपराध पोटात घेते तसे काही लोकांचे अपराध तुम्हालाही पोटात घेता आले पाहिजेत. समाजामध्ये काम करताना अनेक प्रसंगी मान-अपमान होत असतात. ते पण तुम्हाला पचविता आले पाहिजेत.

तुटलेला सुळा भगवान गणेशाचा आपल्याला हे सांगतो की, कुठल्याही कारणाने का होईना तुमच्या शरीराला अपूर्णता मिळाली असेल तरी खचून जाऊ नका, शरीर सर्व काही नाही. मन, बुद्धी, वागणूक याही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मनुष्याची ओळख त्याच्यावरून सुद्धा होते. भगवान गणेशाला चार हात दाखविलेले आहे. त्यापैकी एका हातामध्ये अंकुश आहे. अंकुश आपल्याला सांगतो की तुम्ही तुमच्या इच्छा, आकांक्षा, वासना यावर अंकुश ठेवा. भगवंताच्या एका हातामध्ये पाश आहे. भगवान आपल्याला म्हणतात जो तुमच्या संपर्कात येईल त्याला तुम्ही आपल्या प्रेमपाशाने बांधा. भगवंताच्या एका हातामध्ये मोदक आहे. ते भक्ती, ज्ञान आणि कर्म यांचे फळ आहे. या जर गोष्टी तुमच्या चांगल्या असेल तर तुम्हाला मोदकासारखं गोड फळ मिळेल. भगवंताच्या एका हाताची आशीर्वादाची मुद्रा आहे. जो गणेशाचे स्तवन करेल, त्याची भक्ती करेल त्याला भगवंताचा नेहमीच आशीर्वाद राहील. भगवान गणेशाच्या दर्शनाने आपल्याला आता एक नवीन संदेश प्राप्त होऊ शकणार आहे. तो आपल्याला हितकारक असा आहे. भगवान गणेश आपल्या मार्गातील विघ्न दूर करो आणि आपल्याला आपल्या कर्तव्य मार्गावर चालत प्रगतीकडे जाण्यासाठी बुद्धी, ज्ञान, शक्ती प्रदान करो हीच गणरायाच्या चरणी प्रार्थना आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### डीजे, लेझर बीममुक्त उत्सव साजरे करूया

भारतीय समाजात सण, उत्सव, विवाह समारंभ व सर्वच सार्वजनिक कार्यक्रम मोठ्या धूमधडाक्यात व आनंदाने साजरे करण्याची परंपरा फार मोठी आहे. तथापि या चांगल्या परंपरेला सुद्धा आधुनिक तंत्रज्ञानाचा ब्रह्मराक्षस एका वेगळ्या वळणावर नेऊन अनिष्ट व घातक परिणाम घडवून आणतो आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सण, उत्सव व सर्वच सामाजिक कार्यक्रम साजरे झालेच पाहिजेत. आपली संस्कृती विविधतेने नटलेली असल्यामुळे सर्वच ठिकाणी काही ना काही हे उत्सव साजरे होतच असतात. तेव्हा त्याला आक्षेप घेण्याचे काही कारण नाही. पण ते साजरे करताना मानवी जीवितास घातक होत चाललेल्या डीजे वाद्याच्या घातक प्रथेला मात्र आता गांभीर्याने घेतले पाहिजे. कारण या डीजेमुळे ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, लहान मुले, गर्भवती स्त्रिया, इतकेच काय पण पशुपक्षी इत्यादी सर्वच जीवसृष्टीला त्रास होत आहे.

डीजेच्या कर्कश ध्वनीमुळे, हृदयाच्या ठोक्यावर, हृदयाच्या गतीवर, अनिष्ट परिणाम होऊन दरवर्षीच मिरवणुकीमध्ये अनेक तरुणांना हार्ट अटॅक येऊन आपला जीव गमवावा लागतो. तरीही आपण अजून सुधरत नाही. आणि त्यात जबाबदार शासकीय यंत्रणा व इतरही व्यवस्था जर मूग गिळून बसल्या तर मनुष्यमात्र किंवा अखिल जीवसृष्टी बरोबरच पर्यावरणाची सुद्धा मोठी हानी होणार हे निश्चित. यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ध्वनी प्रदूषणाबाबत काही निकष तयार केले आहेत. त्यानुसार रहिवासी विभागात दिवसा ५५ डेसिबलपर्यंत व रात्री ४५ डेसिबलपर्यंत ध्वनीची मर्यादा आहे. हीच मर्यादा औद्योगिक क्षेत्रासाठी ७५/७० डिसेबलपर्यंत आहे. तथापि जेथे केवळ एकच डीजे वाजवला जातो तेथे ही मर्यादा किमान १०० डेसिबलच्या वर १३० डेसिबलपर्यंत नेहमी आढळून येते. हे ध्वनी मर्यादेचे मोठे उल्लंघन आहे. यामुळे बहिरेपणा सोबतच स्वभावातील चिडचिडेपणा, उच्च रक्तदाब, मानसिक तणाव निर्माण होणे, स्मृतिभंश होणे, निद्रानाश, नैराश्य येणे, कानातील नसा मोठ्या प्रमाणावर कमकुवत होणे, मोठ्या आवाजामुळे हृदयाच्या धमन्या आकुंचन पावणे व त्यामुळे हृदयविकार जडणे, इत्यादी सारखे आजार उत्पन्न होण्याचे प्रमाण वाढले आहे. तेव्हा याच्यावर नियंत्रण आणणे किंवा यावर बंदी घालणे ही आता काळाची गरज झाली आहे. तेव्हा आगामी गणेशोत्सव, नवरात्री उत्सव आणि त्यानंतरच्या सुरू होणाऱ्या लग्नसराईत सुद्धा आपण सर्व जण मिळून डीजेमुक्त तसेच लेझर लाईटमुक्त उत्सव सण साजरे करूया.

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

### हुडकेश्वर रस्ता दुरुस्त करा हो!

नागपुरातील म्हाळगीनगर चौक ते पिपळा फाटापर्यंतचा सर्वांत जास्त रहदारी असलेला हुडकेश्वर मार्ग अवघ्या तीन वर्षांत जागोजागी उखडला आहे. म्हाळगीनगर चौकापासून पिपळाकडे जाताना चौकापासून शंभर मीटर अंतरापर्यंत मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. तसेच शाहू पेट्रोल पंपजवळील पुलाच्या दोन्ही बाजूने सुमारे शंभर मीटरपर्यंत इतके मोठमोठे खड्डे आहेत की कोणतेही वाहन चालविणे कठीण झाले आहे. दुचाकीस्वार या खड्ड्यातून वाहन चालवताना वाहनासह खाली पडतात आणि जखमी होतात. रस्ता इतका खराब झालेला आहे की वाहने तर सोडाच पायी चालणे सुद्धा कठीण झाले आहे. बऱ्याच ठिकाणी तब्बल अर्ध्या अर्ध्या फुटाचे खड्डे पडलेले आहेत. आता पावसाळ्याचे दिवस असताना या खड्ड्यांत पावसाचे पाणी साचून खड्डे नेमके कुठे आहेत हेच दिसत नाहीत. त्यामुळे वाहन चालवताना या खड्ड्यांत वाहने वेगाने आदळतात आणि अपघात होतात. भरीस भर शाहू पेट्रोल पंपजवळील पुलाच्या दोन्ही बाजूचे पथदिवे बंद आहेत. त्यामुळे पुलावर आणि पुलाच्या दोन्ही बाजूंनी जे खड्डे आहेत त्याठिकाणी रात्रीच्या वेळी दाट अंधार असतो. पण स्थानिक प्रशासनाचे याकडे अजिबात लक्ष नाही. कदाचित एखाद दुसऱ्याचा जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येईल.

सदर रस्त्यांचा दर्जा इतका सुमार आहे की पूर्वीचे डांबरी रस्ते परवडले पण हे सिमेंटचे रस्ते नकोत अशी नागरिकांची भावना झालेली आहे. डांबरी रस्ते लवकर खराब होतात म्हणून सिमेंटचे मजबूत रस्ते बांधण्यात आले होते. पण झाले नेमके उलटे. पूर्वीचे डांबरी रस्ते आताच्या सिमेंट रस्त्यांपेक्षा अधिक चांगले होते असे म्हणायची वेळ आलेली आहे. सिमेंटचे रस्ते डांबरी रस्त्यांसारखे एखाद दुसऱ्या ठिकाणी उखडून खड्डे पडत नाहीत. सिमेंट रस्त्यांचा वरचा सिमेंटचा थर सलगपणे दूरपर्यंत उखडत जातो आणि खालची टोकदार गिट्टी वर येऊन रस्त्यांची दुर्दशा होते. रस्ते बांधकामात प्रमाणशीर सिमेंट न वापरल्याने किंवा सिमेंट कमी आणि ऊर्जा प्रकल्पांमधून निघणारी राख जास्त प्रमाणात वापरल्याने रस्त्यांची मजबुती टिकत नाही. रस्त्यांवरील टोकदार गिट्टी वर आल्याने वाहनांचे टायर लवकर खराब होत आहेत. जनतेच्या रोषाला बळी पडण्याआधीच हुडकेश्वर रस्ता ताबडतोब दुरुस्त करण्यात यावा ही अपेक्षा.

**अतुल सोमेश्वर कावळे**/९७३०५३५१९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# खासदार सुप्रिया सुळे यांनी आपले वक्तव्य मागे घेऊन वारकरी संप्रदायाची माफी मागावी

## वारकरी पाईक संघाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ ऑगस्ट -**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी तात्काळ आपले वक्तव्य मागे घेऊन वारकरी संप्रदायाची माफी मागितली पाहिजे अशी मागणी वारकरी संप्रदाय पाईक संघाचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य रामकृष्ण महाराज वीर यांनी केली आहे.

या संदर्भात वारकरी पाईक संघाच्या वतीने सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याबाबत भूमिका स्पष्ट करताना प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । जेष्ठ लोक जसे आचरण करतात त्याचे अनुकरण समाज करत असतो. सुप्रियाताई देशातील जेष्ठ नेत्या आहेत. त्यांनी वक्तव्य करताना त्याच समाजावर काय परिणाम होईल याचे भान राखू नये याचे आश्चर्य वाटते व या बेताल वक्तव्याचा निषेधही करावा वाटतो. मी खरं बोलते कारण आहे मी रामकृष्ण हरि वाली आहे! मी माळ घातली नाही कारण माझा मांसाहाराचा मोह गेला नाही पण..माझ्या पांडुरंगाला ते चालतं ! याचा परिणाम म्हणून सगळे लोक पांडुरंगाला मांसाहार वर्ज्य नाही असा अर्थ काढू लागले तर...वारकरी संप्रदायाने आज वर लोकांना मद्य-मांस या विकृत आहारापासून दूर ठेवून विवेकपुर्ण व आचारसंपन्न बनवण्याचा जो शेकडो वर्षे प्रयत्न केला आहे त्याची सरळ सरळ थट्टा आहे. या बरोबरच छत्रपती शिवरायांनाही जगद्गुरु तुकोबारायांनी 'कंठी मिरवा तुळशी । व्रत करा एकादशी।।' असा उपदेश केला होता. हे रात्रंदिवस शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयजयकार करणाऱ्यांना लक्षात कसे येत नाही असा देखील सवाल उपस्थित करून सुप्रियाताईंनी तात्काळ आपले वक्तव्य मागे घेऊन वारकरी संप्रदायाची माफी मागितली पाहिजे अशी मागणी वारकरी संप्रदाय पाईक संघाचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य रामकृष्ण हनुमंत महाराज वीर यांनी केली आहे.

## महत्वाचे...

### शुगरच्या आजाराला कंटाळून १७ वर्षीय मुलाची आत्महत्या

**सोलापूर, दि.२४ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर गुंजेगाव येथे १७ वर्षाच्या एका युवकाने आजाराला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना बुधवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली. भीमराज तुकाराम भडकुंबे (वय १७, रा. गुंजेगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. मंद्रूप पोलिस ठाण्यात याची अकस्मात मयत म्हणून नोंद झाली आहे. याची माहिती अशी की, भीमराज यास लहानपणापासून शुगरचा त्रास होता. त्यामुळे त्यास रोज तीन वेळा इन्सुलिन इंजेक्शन चालु होते. तो या त्रासाला कंटाळून गेला होता. सतत घरात चिडचिड करत होता. गुंजेगाव येथील घरी तो कुटुंबासह राहत होता. सकाळी भीमराज याचे आई, वडील व भाऊ हे शेतातून घरी आले होते. तेव्हा वस्तीवर भीमराज हा एकटाच होता. त्यावेळी त्याने शेतातील पत्र्याचे शेडच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. साडेदहा वाजता त्याचा भाऊ आदित्य हा जेवणाचा डबा देण्यासाठी आला. शेतातील पत्र्याचे शेडच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. तेव्हा भीमराव याने गळफास घेतल्याचे पाहून आई-वडिलांना माहिती दिली. गळफास काढून त्यास मंद्रूपच्या ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. येथील डॉक्टरांनी तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. याची खबर वडील तुकाराम मारुती भडकुंबे राहणार गुंजेगाव यांनी मंद्रूप पोलिसात दिली. त्यानुसार अकस्मात मयत त्याची नोंद झाली आहे. अधिक तपास हवालदार नितेश गायकवाड करीत आहे.

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील गुंजेगाव येथील घटना**



### सावळगी परिवाराचे कार्य अभिनंदनीय : मल्लिनाथ मसरे

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

श्रावण महिन्यात ६८ लिंग पदयात्रा काढून जप उपासनेचा सावळगी परिवार राबवित असलेल्या उपक्रमाला ५० वर्षे पुर्ण झाल्याबद्दल श्रावण समाप्ती दिवशी वीरशैव सेवा संघाच्या वतीने शिवानंद सावळगी यांचा सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी श्रावण मास समाप्ती समिती अध्यक्ष मल्लिनाथ मसरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एखादा परिवार आपला व्यवसाय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडून चालविला जातो.पण निस्वार्थी पणे स्वखर्चाने करण्यात येणारे सामाजिक कार्य दुसऱ्या पिढीकडून चालविणे हे सहसा क्वचित घडते पण सावळगी परिवारात कै.उमाकांत सावळगी व बसवराज सावळगी यांनी ६८ लिंग पदयात्रेचा उपक्रम आज दुसऱ्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते श्री.शिवानंद सावळगी हे मागील ५ वर्षापासून अधिक मोठ्या प्रमाणात पार पाडत आहेत. त्यांच्या या कार्याचा वीरशैव सेवा संघाने दखल घेऊन श्री सिद्धेश्वर देवस्थान येथे सत्काराचा योग घडवून आणला. या कार्यक्रमास बाळासाहेब भोगडे,काशिनाथ दर्गोपाटील, श्री.कळके आप्पा, पशुपति माशाळ, प्रकाश बिराजदार, रतन रिक्के, सिद्धारुढ निंबाळे, सिद्धाराम कोनापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीने श्रावण महिन्यात रोज विविध उपक्रम राबविले. सर्व भक्तांना अन्नछत्र मधून महाप्रसाद दिला तसेच सर्व भक्तांना श्री सिद्धेश्वर मंदिरात सतत आल्हाददायक व भक्तिपूर्ण वातावरण राहण्यासाठी केलेल्या कामाचे वीरशैव सेवा संघाने अभिनंदन करुन समितीचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे यांचाही प्रातिनिधिक विशेष सत्कार करण्यात आला

### मंगळवारी हरितालिका पूजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२४ ऑगस्ट-**

भाद्रपद शुध्द तृतीयेला जय देवी हरतालिके, सखी पार्वती अंबिके.. असे म्हणत गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी घरोघरी महिला हरितालिका अर्थात पार्वती, शंकरपूजनाचे व्रत करतात. या पूजेसाठी लागणाऱ्या सखी आणि पार्वतीच्या शाडूच्या आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती शहरातील मधला मारूती, टिळक चौक परिसरात मोठ्या प्रमाणात विक्रीस आल्या आहेत. मंगळवारी हे व्रत घरोघरी महिला करणार आहेत. यानिमित्त घरोघरी पाटावर वाळूचे शिवलिंग तयार करून त्याचे पूजन केले जाते. त्यासाठी विविध प्रकारची फुले, बेल, विविध फुलझाडांच्या पत्री अर्पण केले जातात. मक्याचे कणीस, काकडी तसेच केळी व फळेही पूजेसाठी ठेवली जातात. यादिवशी कुमारिकेसह महिलांकडून शिवपूजन केले जाते. याशिवाय हरितालिकेच्या कहाणीचे वाचन केले जाते. महिला व कुमारिकांकडून उपवास केला जातो.

# देशाला काँग्रेसशिवाय पर्याय नाही

**नूतन पदाधिकाऱ्यांच्या सत्काराप्रसंगी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे प्रतिपादन**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

कठीण काळात पक्षाची धुरा आपल्या खांद्यावर आली असून रात्रंदिवस काम करण्याची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जवळ येत आहेत, त्यासाठी सज्ज व्हा. १९७८ मध्ये इंदिरा गांधींचा पराभव झाल्यानंतर अनेकांनी काँग्रेस सोडली होती. मात्र सामान्य कार्यकर्त्यांनी पहले रोटी खायेंगे, इंदिरा को लायेंगे या घोषणेवर ठाम राहून लढा दिला आणि काँग्रेस पुन्हा प्रचंड बहुमताने सत्तेवर आली. शेतकरी आणि सर्वसामान्य जनता अडचणीत आहे. केंद्र व राज्य सरकारकडून जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. जाती-धर्मात भांडणे लावून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. काँग्रेस पक्षाची विचारधारा अधोरेखित करत शिंदे म्हणाले की, काँग्रेसने सर्वधर्मसमभावाची, जनतेच्या प्रश्नासाठी लढण्याची भूमिका, कधीच सोडली नाही. त्यामुळे देशाला काँग्रेसशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यकारणी व शहर, जिल्हा कार्यकारणीत मध्ये नूतन पदाधिकारी झालेल्या प्रदेश पदाधिकाऱ्यांचा सत्कार देशाचे नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते शहर अध्यक्ष चेतन नरोटे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस भवन येथे करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमात माजी आमदार प्रकाश यलगुलवार, अलकाताई राठोड, विनोद भोसले, शाहीनताई शेख, ॲड. रविकिरण कोळेकर, सुरेश हावळे, राहूल वर्धा, श्रीशैल रणधिरे, भारत जाधव, सुशिल बंदपट्टे, सुबोध सुतकर, संतोष सोनवणे, अब्दुल खलीक मुल्ला यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी यावेळी श्री. शिंदे यांचे स्वागत केले.

### सोलापूर पुन्हा काँग्रेसचा बालेकिल्ला करण्यासाठी कटिबद्ध : सातलिंग शटगार

यावेळी जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार म्हणाले की, माझ्यासारख्या एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाला जिल्हाध्यक्षपदाची संधी दिल्याबद्दल माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब आणि खासदार प्रणितीताई शिंदे यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. या पदाला न्याय देण्यासाठी मी नक्कीच प्रयत्नशील राहीन. काँग्रेसची संघटना अधिक बळकट करण्यासाठी तसेच आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीसाठी मी जिल्हाभर दौरा सुरू केला आहे. कार्यकर्त्यांच्या जोरावर आणि जनतेच्या पाठिंब्याच्या बळावर सोलापूर जिल्हा पुन्हा एकदा काँग्रेसचा भक्कम बालेकिल्ला करण्यासाठी मी जीवाचे रान करणार आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांच्या निवडश्रेणीसाठी ज्येष्ठता यादी तयार करणार

**शिक्षणाधिकाऱ्यांची माहिती, निवृत्त शिक्षकांकडून आनंद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागातून १९६७ ते २०२५ या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना निवडश्रेणी देण्यासाठी सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात येईल, असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले.

सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्यावतीने जिल्ह्यातील १९६७ ते २०२५ या काळात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना शासनाच्या ४ एप्रिल १९९० च्या आदेशानुसार पात्र शिक्षकांना त्रिस्तरीय चटोपाध्याय वेतनश्रेणीमधील निवडश्रेणी देण्यासाठी वर्षाला पात्र शिक्षकांच्या २० प्रमाणात सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात यावी यासाठी सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्यावतीने शिक्षणाधिकारी कादर शेख यांना भेटून निवेदन दिले. यावेळी पुणे विभागीय अध्यक्ष सिध्देश्वर धसाडे, जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटना अध्यक्ष सुभाष फुलारी,



सरचिटणीस मल्लिकार्जुन जिल्हा कार्याध्यक्ष काळप्पा सुतार, उत्तर सोलापूर अध्यक्ष सिद्राम जिरगे, ज्येष्ठ मार्गदर्शक शिवशंकर विजापुरे, नितीन कुलकर्णी, मल्लिकार्जुन शेगाव शहापुरे आदी उपस्थित होते.

यापूर्वी काही ठराविक शिक्षकांनी प्रस्ताव दाखल केले आहेत त्यांनाच निवडश्रेणी देण्यात आली आहे. त्रिस्तरीय चटोपाध्याय निवडश्रेणी सन आहे. निवडश्रेणीस १९८६ पासून मंजूर पात्र शिक्षकांची सेवाजेष्ठता यादी तयार करून ३९ वर्षांचे अनुशेष भरून काढण्यात वावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सेवानिवृत्त शिक्षकांच्या निवड श्रेणीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आता त्यासाठी ज्येष्ठता यादी तयार केली जाणार आहे. या निर्णयामुळे निवृत्त झालेल्या अनेक शिक्षकांना त्यांच्या सेवाकाळात न मिळालेली निवड श्रेणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षण विभागाकडून यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित विभागांना दिल्या जाणार आहेत. या प्रक्रियेनुसार, संबंधित शिक्षकांची सेवा नोंद, पदोन्नतीचा कालावधी, पात्रता आणि उपलब्ध दस्तावेजांच्या आधारे ज्येष्ठता यादी तयार केली जाईल. यादी तयार झाल्यानंतर त्यानुसार निवड श्रेणीस मान्यता दिली जाईल. निवड श्रेणीचा लाभ सेवानिवृत्ती वेतन, निवृत्तिवेतन व इतर लाभांवर सकारात्मक परिणाम करणारा ठरणार आहे. निवड श्रेणीपासून वंचित राहिलेल्या शिक्षकांसाठी ही प्रक्रिया दिलासा देणारी ठरणार आहे. शिक्षक संघटनांनी वा निर्णयाचे स्वागत केले असून, प्रलंबित प्रकरणांवर निर्णय लवकरात लवकर व्हावा, अशी मागणी केली आहे. या निर्णयामुळे हजारो शिक्षक लाभार्थी ठरण्याची शक्यता आहे.

# गणेशभक्तांच्या प्रवासाला वाहतुकीची कोंडी आणि खड्ड्यांचे विघ्न

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम रखडलेलेच

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. २४ ऑगस्ट-**

महाराष्ट्रचे आराध्य दैवत आणि कोकणवासियांच्या लाडक्या बाप्पाच्या आगमणाला अवघे दोन दिवस उरले असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. मात्र कोकणात जाण्यासाठी सज्ज असलेल्याना गणेश भक्तांना यंदाही खड्याचे विघ्नाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या दीड दशकापासून प्रलंबित असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्यापही रखडलेले आहे. त्यामुळे प्रवाशांना वाहतुकीची कोंडी, रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांना सामोरे जात आणि त्याच्या हादऱ्याच्या कळा सोसतच आपले गाव गाठावे लागणार आहे.

यंदाच्या गणेशोत्सवाला २७ ऑगस्टपासून प्रारंभ होत आहे. त्यासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई,पालघर, जिल्ह्यातून यंदा सुमारे १० लाखावर कोकणवासिय रत्नागिरी सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील आपल्या गावी जाणार असल्याचे सांगितले जात आहे.शनिवारपासून तिकडे जाण्यासाठी गाड्याच्या रांगा लागल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेले मुंबई -गोवा महामार्गाच्या दुरुस्तीचे कामावर हजारो कोटी खर्च झाला आहे. मात्र अद्याप ७० टक्केही काम पूर्ण झालेले नाही. गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्याची अवस्था आणखी बिकट झाली असून मार्गांवरील खडड्याचे प्रमाण दुप्पटीने वाढले आहेत.

खड्डे आणि सुरू असलेले काम यामुळे या महामार्गावर यंदाही वाहनाची प्रचंड कोंडी होत आहे. या महामार्गावरील रस्ते दुरुस्तीसाठी स्टील स्लॅग या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. गुजरात आणि आंध्र प्रदेशमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर यशस्वीरित्या करण्यात आला असून या तंत्रज्ञानामुळे रस्ते अधिकचा भार सहन करण्यासाठी सक्षम होतात, ते अधिक टिकाऊ होतात आणि रस्त्यावरून वाहने घसरण्याचे प्रमाणही कमी होते असा दावा करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे खड्डे पडण्याची शक्यता कमी होते आणि त्यामुळे रस्त्याच्या देखभालीसाठीचा खर्चही कमी होतो असा दावा करण्यात आला आहे. मुंबई-गोवा महामार्ग ४६० किमी लांबीचा आहे, ज्यापैकी ८४ किमी लांबीचा भाग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो, तर उर्वरित भाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येतो.

यापूर्वी, चिपळूण येथील वशिष्ठी पुलावरील खड्ड्यांचा ड्रोन व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर रस्ते सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने तो पूल दुरुस्त करण्यात येत आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पनवेलच्या उप-प्रादेशिक परिवहन कार्यालयाने उत्सवादरम्यान १६ टनांपेक्षा जास्त वजनाच्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घातली आहे.

### २४ तास रेल्वे स्थानकावर ठिय्या

रस्त्यांवर खड्डे, वाहतूक कोंडी असताना रेल्वेने गावी जाण्यासाठी एक्सप्रेसला तुडुंब गर्दी होत आहे. रेल्वे पकडण्यासाठी तब्बल २४ तास गणेश भक्तांना रेल्वे स्थानकावर ठिय्या मांडावा लागत असल्याने त्यांचे मोठे हाल होत आहेत. ठाणे स्थानकावरुन कोकणात जाणाऱ्या प्रमुख रेल्वे गाड्यांमध्ये कोकण कन्या एक्सप्रेस, तुतारी एक्सप्रेस, कोकण विशेष एक्सप्रेस यांचा समावेश आहे. मात्र या गाड्यांना सध्या प्रचंड गर्दी झाली आहे. जनरल डब्यातून प्रवास करण्यासाठी २४ तास प्रतीक्षा करावी लागत आहे. यापूर्वीपर्यंत जनरल डब्याचं तिकीट घेऊन प्रवास करणं शक्य होते. परंतू आता जनरल डब्यातून प्रवास करण्यासाठी रांग लावण्यासाठी अनेक कुटुंब आपल्या मुला-बाळांसह २४ तास आधीच ठाणे स्थानकावर यावे लागत आहे. मात्र स्थानकावर काही सोई-सुविधा नसल्याने महिलांना अडचणीला सामोरे जावे लागत आहे. रेल्वेने जास्तीत जास्त जनरल डबे जोडावे,अशी मागणीही त्यांच्यातून केली आहे.


## ग्रामपंचायत कापसेगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत कापसेवाडी, ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहे

**लेखाशिष : १५ वा वित्त आयोग**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प. शाळा येथील स्वयंपाक घराची दुरुस्ती करणे | १,२५,०००/- | - | ५००/- | २ महिने | खुला |
| २ | जि.प. प्राथमिक शाळा येथील परिसर स्वच्छ करणे व सरझक भिंत बांधणे | २,३०,०००/- | | | | |
| ३ | ग्रा.प. कार्यालय दुरुस्ती करणे | १,००,०००/- | | | | |
| ४ | ग्रा.प. कार्यालय शौचालय दुरुस्ती करणे | ५०,०००/- | | | | |

**टीप :**
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दिः २५/०८/२०२५ सकाळी ११.०० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ३१/०८/२०२५ पर्यंत सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय कापसेवाडी
३) निविदा उघडणेचा दिनांक ०१/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता
४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील
५) निविदा मंजूर/ नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांना राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कापसेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

शिक्का

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कापसेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**



## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, सोलापूर

**श्री पंचमुखी हनुमान नागरी सही. पतसंस्था म. शेळगी, सोलापूर**

जा.क्र. झेड नोटीस/२०२५-२६

दिनांक १०/०७/२०२५

नमुना ''झेड'' (Z Notice)
म.स.म. अधिनियम १९६० नियम १९६१ मधील (नियम क्र.१०७ (११) (ड-१)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतचे नोटीस**

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन, विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर या पतसंस्थेचा खालील थकबाकीदारास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ खालील नियम अन्वये दिनांक ०८/०७/२०२४ रोजी मागणी नोटीशीद्वारे वसूली दाखल्याप्रमाणे रक्कम भरण्याबाबत कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येत आहे की, खालील निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११(ड-१)) अन्वये रितसर बोजा नोंद करून झेड नोटीसीद्वारे ताबा घेतलेला आहे.

विशेष करून थकबाकीदारांना आणि सर्व नागरीकांना याद्वारे सावध करण्यात येते की सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेळगी, सोलापूर यांच्या दिनांक १५/०१/२०२५ रोजी जप्ती आदेशातील बोजाची रक्कम रु. १६,७२,१९४/- व दिनांक २८/०१/२०२४ पासून रू. १४,२८,९६३/- वर १६ टक्केप्रमाणे खाते बार होईपर्यंतचे व्याज याला अधिन रहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराच्या विरुध्द उक्त प्रमाणपत्र घेण्यात आले असेल त्यांचे नाव | गावाचे नांव व तालुका | भूमापन क्रमांक व गट क्रमांक | क्षेत्र चौ. मी. | आकारणी | चतुःसिमा |
|---|---|---|---|---|---|---|
| 101/42/2024 ता. 21/06/2024 | श्री. शिवानंद नागनाथ स्वामी | गांव - देगांव (944167) ULPan 17016552444 | नगर भूमापन क्र. गट क्र. व उपविभाग १३/१/ब/१/अ/२/ब/१ | 0.9450 | 4.59 | पूर्वेस पश्चिमेस दक्षिणेस उत्तरेस |

ही ताबा नोटीस दिली असे : 10/07/2025

**सही/-**
**हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन,**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**सोलापूर जिल्हा सह. पत. फेड. मर्या, सोलापूर**

# कसोटीपटू चेतेश्वर पुजारा निवृत्त

## भारतीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्ती

◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

भारताच्या सर्वोत्तम कसोटी फलंदाजांपैकी एक असलेल्या चेतेश्वर पुजाराने रविवारी आपल्या शानदार कारकिर्दीला निवृत्ती जाहीर केली. ३७ वर्षीय पुजाराने २०२३ मध्ये १०३ कसोटींपैकी शेवटचा सामना खेळल्यानंतर समाजमाध्यमावर ही घोषणा केली.

राजकोट या छोट्या शहरातील एका लहान मुलाप्रमाणे, मी माझ्या पालकांसह स्टार क्रिकेटपटू होण्याचे ध्येय गाठण्यासाठी निघालो होतो; आणि भारतीय क्रिकेट संघाचा भाग होण्याचे स्वप्न पाहिले होते. तेव्हा मला कल्पनाही नव्हती की हा खेळ मला खूप काही देईल - अमूल्य संधी, अनुभव, उद्देश, प्रेम व सर्वात महत्त्वाचे म्हणजे माझ्या राज्याचे व या महान राष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी. भारतीय जर्सी परिधान करणे, राष्ट्रगीत गाणे व प्रत्येक वेळी मैदानावर पाऊल ठेवताना माझे सर्वोत्तम प्रयत्न करणे - त्याचा खरा अर्थ काय आहे हे शब्दात मांडणे अशक्य आहे. पण म्हणतात त्याप्रमाणे, सर्व चांगल्या गोष्टींचा अंत झाला पाहिजे आणि मी खूप कृतज्ञतेने



भारतीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे पुजाराने मनापासून लिहिले.

या वर्षाच्या सुरुवातीला इंग्लंड दौऱ्यापूर्वी संघातील इतर दोन दिग्गज खेळाडू- विराट कोहली व रोहित शर्माने कसोटी क्रिकेटला निरोप दिला होता, त्यामुळे निवृत्तीचा निर्णय पूर्णपणे आश्चर्यकारक नव्हता.

४३.६० च्या सरासरीने ७१९५ धावा करून, पुजारा भारतातील सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये आठव्या स्थानावर आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २१३०१ धावा सुद्धा केल्या आहेत.

भारतीय संघापासून दूर असताना, पुजारा समालोचनाकडे वळला आणि अलिकडेच इंग्लंडमध्ये झालेल्या भारत-इंग्लंड मालिकेसाठी प्रसारण संघाचा भाग होता. गत महिन्याप्रमाणेच तो आणखी एक वर्ष देशांतर्गत क्रिकेट खेळण्यासाठी वचनबद्ध दिसत होता व समालोचन करतानाही तो आपल्या तंदुरुस्तीसाठी दिनचर्येचे पालन करत होता.

२०१० ते २०२३ या कालावधीत पुजाराने १९ शतके आणि ३५ अर्धशतके झळकावली. राहुल द्रविडच्या निवृत्तीनंतर, तो विशेषतः परदेशातील परिस्थितीत भारतीय कसोटी संघाचा भिंत बनला. २०१८ आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या सलग दोन दौऱ्यांमध्ये त्याने ऑस्ट्रेलियात भारतीय संघाच्या सलग मालिका विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. *(वृत्तसंस्था)*

# ऐश्वर्य, एड्रियनने जिंकले सुवर्णपदक

## आशियाई नेमबाजी स्पर्धा

◆ **श्यामकेंट, २४ ऑगस्ट**

भारताच्या ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरने रविवारी कझाकस्तानमधील श्यामकेंट येथे सुरू असलेल्या १६ व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत रायफल/पिस्तूल/शॉटगनमध्ये पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक जिंकले.

या माजी ज्युनियर विश्वविजेत्या ऐश्वर्यचे खंडिय नेमबाजी स्पर्धेत कारकिर्दीतील हे दुसरे वैयक्तिक सुवर्णपदक होते. ऐश्वर्यने प्रत्येकी एक रौप्य व एक कांस्यपदक जिंकले. चीनच्या झाओन वेन्यूने रौप्य आणि जपानच्या नाओया ओकाडाने कांस्यपदक जिंकले. तसेच ज्युनियर पुरुषांमध्ये ३ पी सुवर्णपदक जिंकले असून या स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या एड्रियन कर्माकरने ४६३.८ चा आशियाई ज्युनियर विक्रम नोंदवला.

तत्पूर्वी, पुरुषांच्या ३ पी मध्ये



ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर

तीनही भारतीय स्पर्धकांनी अंतिम फेरीत प्रवेश केला. ऐश्वर्यने नीलिंग, प्रोन आणि स्टँडिंग पोझिशनमध्ये प्रत्येकी २० शॉट्सवर ५८४ गुणांसह तिसरे स्थान पटकावले.

अनुभवी चैन सिंग ५८२ गुणांसह पाचव्या स्थानावर होता तर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता अखिल शेओरनने ५८१ गुणांसह सातवे पात्रता स्थान पटकावले. चीनच्या तिन्ही नेमबाजांनीही पात्रता मिळवली, इतर दोन स्थाने अनुक्रमे जपान आणि कोरियाने जिंकली.

भारताचा सांघिक सुवर्णपदक तीन गुणांनी हुकला. भारतीय संघाचा १७४७ चा आकडा चीनच्या एकूण आकड्यांपेक्षा तीन गुणांनी कमी होता.

ऐश्वर्यने वैयक्तिक अंतिम फेरीत आघाडी घेतली व शेवटी झाओ ०.५ शॉटने मागे टाकत सुवर्णपदक जिंकले. जपानच्या नाओया ओकाडा (४४८.८) ने कांस्यपदक जिंकले, तर चेन (४३५.७) आणि अखिल (४२४.९) अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

ज्युनियर पुरुषांच्या ३ पी मध्ये वेदांत वाघमारेने पात्रता फेरीत ५८२ गुणांसह दुसरे स्थान पटकावले, तर एड्रियन कर्माकरने ५७६ गुणांसह आठवे आणि अंतिम पात्रता फेरी गाठली. वेदांत, एड्रियन आणि रोहित या त्रिकुटाने १७३३ गुणांसह सांघिक सुवर्णपदक जिंकले. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### सौरव गांगुली प्रिटोरिया कॅपिटल्सच्या प्रशिक्षकपदी

**नवी दिल्ली** : २०२६ हंगामासाठी प्रिटोरिया कॅपिटल्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाल्यानंतर भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने आपली पहिली प्रशिक्षक भूमिका स्वीकारली आहे. प्रिन्स कॅपिटल्स शिबिरात एक शाही लय आणण्यासाठी सज्ज आहे! सौरव गांगुली यांना आमचा नवीन मुख्य प्रशिक्षक म्हणून घोषित करताना आम्हाला आनंद होत आहे, असे फ्रॅन्चायझीने रविवारी इंस्टाग्रामवर लिहिले. २००८ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर गांगुली प्रशासकीय भूमिकांमध्ये गेले होते, विशेषतः बीसीसीआय अध्यक्ष म्हणून काम करत होते आणि सध्या ते क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालचे अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. फ्रॅन्चायझी क्रिकेट व्यवस्थापनात गांगुलीचा सहभाग केवळ आयपीएल आणि डब्ल्यूपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्ससाठी क्रिकेट संचालक म्हणून आहे. २०१९ मध्ये ते दिल्ली कॅपिटल्सचे मार्गदर्शक होते, परंतु लवकरच त्यांनी बीसीसीआय अध्यक्ष होण्यासाठी ते सोडले, परंतु तो कार्यकाळ संपल्यानंतर फ्रॅंचायझीमध्ये परत आले. गांगुली आता कोणत्याही व्यावसायिक क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षक म्हणून पहिल्यांदाच पूर्णवेळ भूमिकेत प्रवेश करणार आहे.

### जयपूर पिंक पँथर्सचे तिसऱ्या जेतेपदावर लक्ष

**जयपूर** : गत हंगामात प्लेऑफमध्ये पराभव पत्करल्यानंतर दोन वेळा प्रो-कबड्डी लीग (पीकेएल) विजेतेपद पटकावणाऱ्या जयपूर पिंक पँथर्स पुन्हा एकदा प्रतिष्ठित जेतेपद मिळवण्यास उत्सुक असतील. १२ व्या हंगामापूर्वी, पिंक पँथर्स संजीव बालियान यांच्यापासून वेगळे झाले. बालियान गत चार हंगामात त्यांचे मुख्य प्रशिक्षक होते आणि त्यांनी संघाला पीकेएल सीझन ९ च्या वैभवात मार्गदर्शन केले. पीकेएल ट्रॉफी पुन्हा मिळवण्याच्या उद्देशाने, पिंक पँथर्सने आगामी हंगामासाठी नरेंद्र रेडू यांची नवीन मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली. भारतीय कबड्डी सर्किटमधील सर्वात आशादायक तरुण प्रशिक्षकांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे रेडू यांनी पीकेएल सीझन ११ च्या अंतिम फेरीत तरुण पटना पायरेट्स संघाचे नेतृत्व केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, पायरेट्स पीकेएल सीझन १० च्या प्लेऑफमध्येही पोहोचले. बचावपटू रेझा मीरबाघेरी, रोनक सिंग, नितीन कुमार, अभिषेक केएस आणि रेडर सोमबीर आणि रितिक शर्मा यांना कायम ठेवल्यानंतर, पिंक पँथर्सने आपला संघ मजबूत करण्यासाठी खेळाडूंच्या लिलावात नऊ खेळाडू खरेदी केले. एकूण ४.९३ कोटी रुपये खर्च करून, पहिल्या पीकेएल विजेत्यांनी एक जबरदस्त संघ तयार केला आहे.

### गुकेश फिरोझाविरुद्ध, प्रज्ञानंद डुडाशी लढणार

**सेंट लुईस** : अमेरिकेच्या सेंट लुईस येथे सुरु असलेल्या सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत सहाव्या फेरीत विश्वविजेता डी. गुकेश फ्रान्सच्या अलिरेझा फिरोझाविरुद्ध खेळणार आहे, तर देशबांधव आर. प्रज्ञानंदाची पोलंडच्या डुडा जान-क्रिज्स्टोफशी गाठ पडेल. विश्रांतीच्या दिवसानंतर ताजेतवाने होऊन प्रज्ञानंद आणि गुकेश दोघेही पुन्हा विजयी घोडदौड कायम राखण्यास उत्सुक असतील. स्थानिक हिरो फॅबियानो कारुआना ३.५ गुणांसह आघाडीवर आहे, आतापर्यंत दोन विजय आणि तीन बरोबरीसह, आणि स्पर्धेच्या मध्यात तो १० सहभागींपैकी निवडला आहे. पहिल्या फेरीत गुकेशवर एकमेव विजय मिळवून प्रज्ञानंद तीन गुणांनी मागे आहे, त्यानंतर सलग चार बरोबरी झाली आहेत. आर्मेनियन-अमेरिकन लेव्हॉन ॲरोनियन दुसऱ्या स्थानावर आहे, तर पाच खेळाडूंचा समूह - वेस्ली सो आणि सॅम्युअल सेव्हियन ही अमेरिकन जोडी, फ्रान्सचा मॅक्सिम वाचियर-लाग्रेव्ह, फिरोजा आणि गुकेश - हे सर्व खेळाडू प्रत्येकी २.५ गुणांसह आश्चर्यकारक अंतरावर आहेत. अर्धा गुण मागे असलेला डुडा उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हपेक्षा पूर्ण गुणांनी आघाडीवर आहे.

### ऑस्ट्रेलियाचा दक्षिण आफ्रिकेवर सांत्वनपर विजय

**मॅके** : ट्रॅव्हिस हेड, मिशेल मार्शचे शतक आणि कॅमेरुन ग्रीनने अवघ्या ४७ चेंडूत झळकावलेले पहिले वन-डे शतक तसेच डावखुरा फिरकीपटू कूपर कॉनोलीच्या प्रभावी माऱ्याच्या बळावर ऑस्ट्रेलियाने मालिकेतील तिसऱ्या व अखेरच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर २७६ धावांनी शानदार विजय मिळविला. ऑस्ट्रेलियाने अखेरचा सामना जिंकला असला तरीही तीन सामन्यांची ही वन-डे मालिका दक्षिण आफ्रिकेने २-१ ने जिंकली. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत २ बाद ४३१ धावांचा डोंगर रचला. प्रत्युत्तर देताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ २४.५ षटकांत १५५ धावांतच गारद झाला. ऑस्ट्रेलियाची ही १९ वर्षांनंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धची ही दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक धावसंख्या ठरली. १९ वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ४ बाद ४३४ धावा केल्या होत्या. पण त्या सामन्याची पुनरावृत्ती झाली नाही, कारण दक्षिण आफ्रिकेचा संघ १५५ धावांवर गारद झाला. या सांत्वनात्मक विजयामुळे ऑस्ट्रेलियाचा घरच्या मैदानावर कधीही एकदिवसीय मालिकेत व्हाईटवॉश न होण्याचा विक्रम अबाधित राहिला.

# लक्ष्य सेन, सिंधूची कठीण परीक्षा

## बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन आजपासून



पी. व्ही. सिंधू



लक्ष्य सेन

◆ **पॅरिस, २४ ऑगस्ट**

सोमवारपासून येथे सुरू होणाऱ्या बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि पी.व्ही सिंधू यांची कठीण परीक्षा होणार आहे. लक्ष्य सेन अव्वल मानांकित शी यू क्यू विरुद्ध एक कठीण सलामीचा सामना करेल, तर माजी विश्वविजेती पी. व्ही. सिंधू वाईट कामगिरीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करेल.

भारताच्या आघाडीच्या खेळाडूंसाठी हे वर्ष कठीण होते, कारण दुखापती आणि विसंगत फॉर्म त्यांच्या तयारीत अडथळा आणत होता. २१ व्या क्रमांकावर असलेला सेन ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिल्यानंतर एका वर्षानंतर पॅरिसमध्ये परतत आहे. २०२१ च्या आवृत्तीत कांस्यपदक जिंकणारा अल्मोडा येथील २४ वर्षीय लक्ष्य सेन २०२४ मध्ये ऑल इंग्लंडमधील उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला होता आणि त्याचे २०२४ मधील सर्वोत्तम प्रदर्शन होते. ली शी फेंग, कोडाई नारोका व शी यांच्याविरुद्ध तो अनेकदा कठीण सामन्यांमध्ये अपयशी ठरला आहे.

महिला एकेरीत दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती व २०१९ ची विश्वविजेती सिंधूला चीन ओपनमध्ये सहकारी भारतीय उन्नती हुडाविरुद्ध झालेल्या धक्कादायक पराभवातून सावरावे लागेल. पाच जागतिक अजिंक्यपद पदकांसह सर्वात यशस्वी भारतीय, सिंधू आपल्या मोहिमेची सुरुवात बल्गेरियाच्या कालोयाना नालबंटोवाविरुद्ध करेल.

२०२३ च्या आवृत्तीत कांस्यपदक जिंकणारा प्रणॉय फिनलंडच्या जोआकिम ओल्डॉर्फविरुद्ध सुरुवात करेल, परंतु दुसऱ्या फेरीत त्याचा सामना द्वितीय विश्वमानांकित डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनसोबत सामना होण्याची शक्यता आहे.

पुरुष दुहेरीचे नेतृत्व करणारे सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व नवव्या मानांकित चिराग शेट्टी या जोडीला पहिल्या फेरीत बाय मिळाला आहे आणि ते दुसऱ्या फेरीत हरिहरन अम्साकारुनन आणि रुबेन कुमार किंवा चायनीज तैपेईचे लिऊ कुआंग हेंग आणि यांग पो हान यांच्याशी खेळतील. १६ च्या फेरीत चीनच्या लिआंग वेई केंग आणि वांग चांग यांच्याविरुद्ध एक कठीण सामना आहे. जर त्यांनी तो अडथळा पार केला तर आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेते मलेशियाच्या आरोन चिया आणि सोह वूई यिक यांच्याशी सामना करू शकतात.

मिश्र दुहेरीत १६ व्या मानांकित ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांना पहिल्या फेरीत बाय मिळाला, तर रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे मकाऊच्या लिओंग लोक चोंग आणि वेंग ची एनजी विरुद्ध सलामी करतील. महिला दुहेरीत, प्रिया कोंजेंगबम-श्रुती मिश्रा आणि पांडा भगिनी- ऋतुपर्णा आणि श्वेतापर्णा स्पर्धेत आहेत. *(वृत्तसंस्था)*

# पुजाराच्या धैर्य, दृढनिश्चयाचे कौतुक

◆ **नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

रविवारी चेतेश्वर पुजाराच्या निवृत्तीबद्दल भारतीय क्रिकेट जगतात कौतुकाचा वर्षाव झाला. संघातील माजी खेळाडू व प्रशिक्षकांनी त्याच्या कसोटी कारकिर्दीला परिभाषित करणाऱ्या त्याच्या धैर्य, दृढनिश्चय आणि निस्वार्थीपणाचे कौतुक केले.

**मैदानावरून निरोप देताना बघायला आवडले असते : जयदेव शाह**

मला त्याला मैदानावरून निरोप देताना पाहायला आवडले असते पण हा त्याचा निर्णय आहे आणि आम्ही त्याला शुभेच्छा देतो, असे सौराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष जयदेव शाह म्हणाले. पुजाराने शाहच्या नेतृत्वाखाली प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते.

पुजाराच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासून व शेवटपर्यंत खेळाप्रती त्याची समर्पण तशीच राहिली. मी त्याला अशाच प्रकारे लक्षात ठेवेन. तसेच, त्याच्या वडिलांना (अरविंद पुजारा) चेतेश्वरच्या क्रिकेट कारकिर्दीला आकार देण्यासाठी व त्याला सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक करण्यासाठी खूप खूप सलाम, असे शाह म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### वादळ आले तेव्हा तो उभा राहिला

वादळ आले तेव्हा तो उभा राहिला, आशा मावळत असताना तो लढला. अभिनंदन पुजारा, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी एक्स वर लिहिले. माजी अष्टपैलू युवराज सिंगने पुजाराच्या राष्ट्रीय संघातील वचनबद्धतेचे कौतुक केले.

माजी फलंदाज व्ही. व्ही. एस. लक्ष्मणने पुजाराच्या कारकिर्दीतील हा निर्णायक क्षण असल्याचे म्हटले आहे. त्याने २०२१ मध्ये गाबा येथे झालेल्या मालिकेतील विजयी कसोटीची आठवण करून दिली, पुजाराचे धाडस, धैर्य आणि दृढनिश्चय वेगळे होते, शाब्बास आणि तुला आनंदी दुसऱ्या डावासाठी शुभेच्छा, असे लक्ष्मणने म्हटले.

### पुजारा क्रिकेटचा खरा राजदूत

पुजाराच्या कारकिर्दीच्या काही काळात भारतीय संघाचे प्रशिक्षक असलेले अनिल कुंबळे यांनी त्याला क्रिकेटचा खरा राजदूत म्हणून प्रशंसा केली. क्रिकेटच्या मैदानावरील तुझ्या सर्व कामगिरीचा आम्हाला सर्वांना अभिमान आहे.

माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागाने पुजारासोबत ड्रेसिंग रूम शेअर केली होती, त्यानेही या चॅम्पियन फलंदाजाचे कौतुक केले. तुझी जिद्द, दृढनिश्चय आणि कठोर परिश्रम प्रेरणादायी आहे, असे सेहवाग म्हणाला.

### हॉल ऑफ फेम सोहळ्यात सेरेना विल्यम्सची उपस्थिती

**न्यू यॉर्क** : मारिया शारापोव्हाला आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात अमेरिकेची स्टार टेनिसपटू सेरेना विल्यम्सने हजेरी लावली. यावेळी हॉल ऑफ फेमर्स मार्टिना नवरातिलोवा, जिम कुरियर, स्टॅन स्मिथ आणि अँडी रॉडिक हे त्यांचे निळे हॉल ऑफ फेम ब्लेझर घालून उपस्थित होते. शारापोव्हा ही माझी माजी प्रतिस्पर्धी, माजी चाहती आणि कायमची मैत्रीण आहे. प्रत्येक वेळी जेव्हा आम्ही कोर्टवर उतरलो तेव्हा माझ्या कारकिर्दीत असे काही खेळाडू आहेत ज्यांनी मला सर्वोत्तम होण्याचे आव्हान दिले, मारिया शारापोव्हा (उजवीकडे) त्यापैकी एक होती, असे २३ वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती सेरेना म्हणाली.

# भारत अ संघाचा ऑस्ट्रेलिया अ संघाकडून ६ गड्यांनी पराभव

## महिलांचा अनधिकृत कसोटी सामना

◆ **ब्रिस्बेन, २४ ऑगस्ट**

ऑफ स्पिनर एमी एडगरने टिपलेले ५ बळी आणि अव्वल फळीतील फलंदाजांनी एकजुटीने केलेल्या जोरदार कामगिरीच्या बळावर ऑस्ट्रेलिया अ संघाने रविवारी एकमेव अनधिकृत कसोटी क्रिकेट सामन्यात शेवटच्या दिवशी भारत अ संघावर ६ गड्यांनी मात केली.

भारत अ महिला संघाने पहिल्या डावात २९९ धावा काढल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलिया अ संघाने ३०५ धावा काढून पहिल्या डावात ६ धावांची निसटती आघाडी मिळविली. भारत अ संघाने दुसऱ्या डावात २८६ धावा काढून ऑस्ट्रेलियासमोर २८१ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. ते त्यांनी ८५.३ षटकांत ४ बाद २८३ धावा काढून पूर्ण केले.

एडगरने ५७ धावांत ५ बळी टिपण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी करून भारत अ संघाला दुसऱ्या डावांत २८६ धावांत रोखले. ऑस्ट्रेलिया अ संघाचा विजय साकार करताना अनिका लिरॉयड (७२), राहेल ट्रेनामन (६४) आणि मॅडी ड्रेक (६८) यांच्या अर्धशतकांमुळे झाला. त्यांनी ८५.३ षटकांत लक्ष्य पूर्ण केले. सलामीवीर ट्रेनामन व कर्णधार ताहलिया विल्सनने (४६) यांनी यजमान संघाला शानदार सुरुवात दिली आणि ११७ धावांची वेगवान भागीदारी करून भारतीय आक्रमणावर मात केली. *(वृत्तसंस्था)*

# अनुष्का कुमारीसह भारताची हॅट्ट्रिक

## दक्षिण आशियाई १७ वर्षांखालील महिला फुटबॉल

## भूतानवर आठ गोलने विजय

◆ **थिम्पू, २४ ऑगस्ट**

अनुष्का कुमारीने शानदार हॅट्ट्रिक करत भारताच्या १७ वर्षांखालील महिला संघाने रविवारी येथील चांगलिमिथांग स्टेडियमवर झालेल्या वर्षांखालील महिला अजिंक्यपद २०२५ मध्ये यजमान भूतानचा ८-० असा पराभव करत आपली विजयी घोडदौड कायम राखली.

भारतीय महिला संघाचा हा स्पर्धेतील सलग तिसरा विजय होता. अनुष्का कुमारीच्या (५३, ६१, ७३) उत्कृष्ट कामगिरीशिवाय अभिस्ता बसनेटने (२३, ८९) दोन गोल केले, तर पर्ल



फर्नांडिस (७१), दिव्यानी लिंडा (७७) आणि व्हॅलिना जादा फर्नांडिसने (९०+२) प्रत्येकी एका गोलची भर घातली. मध्यंतरापर्यंत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे.

या प्रभावी निकालासह भारताच्या युवा महिला संघाने आता तीन सामन्यांमध्ये एकदाही न गमावता १७ गोल केले आहेत व गुणतालिकेत अव्वल स्थानावर आपली पकड मजबूत केली आहे.

भारताचे आता तीन सामन्यांत नऊ गुण आहेत, ते बांगलादेश आणि नेपाळ यांच्यापेक्षा पुढे आहे, ज्यांचे प्रत्येकी तीन गुण आहेत. भूतान संघाला अजूनही खाते उघडता आले नाही.

भारताने स्वतःला सिद्ध करण्यात वेळ वाया घालवला नाही. केवळ पाचव्या मिनिटाला डावीकडून श्वेता राणीचा कर्लिंग कॉर्नर जवळजवळ थेट गोलमध्ये गेला, परंतु भूतानचा सतर्क गोलरक्षक केलझांग वांगमोने तो सुरक्षितपणे रोखला. मात्र नंतर भारताने अथकपणे पुढे सरकताच गोल नोंदवण्याचा सपाटाला लावला. अनुष्का कुमारी, लोंगजाम आणि जुलान नोंगमाइथेम या तिघांनीही वांगमोची परीक्षा घेतली, तिने अनेक बचाव केले त्यामुळे घरच्या चाहत्यांकडून जोरदार जयजयकार झाला. *(वृत्तसंस्था)*

# अफगाणिस्तान संघाचे नेतृत्व रशीद खानकडे

## संघात फिरकी गोलंदाजांचा भरणा

◆ **काबुल, २४ ऑगस्ट**

आगामी ९ सप्टेंबरपासून संयुक्त अरब अमिरातमध्ये (युएई) सुरू होणाऱ्या आशिया चषकासाठी फिरकी गोलंदाजांचा भरणा असलेल्या अफगाणिस्तान संघाचे नेतृत्व रशीद खानकडे रविवारी सोपविण्यात आले.

गत वर्षी टी-२० विश्वचषकात अफगाणिस्तान संघाने उपांत्य फेरी गाठली होती.कर्णधाराशिवाय संघात नूर अहमद, मुजीब उर रहमान, एएम गझनफर आणि अनुभवी अष्टपैलू मोहम्मद नबीचा समावेश आहे.



झिम्बाब्वेविरुद्ध खेळणाऱ्या संघातून हजरतुल्लाह झझाई व झुबैद अकबरीला वगळण्यात आले आहे. रहमानउल्लाह गुरबाज व मोहम्मद इशाक हे दोन यष्टिरक्षक फलंदाज आहेत. वेगवान आक्रमणात नवीन-उल-हक, फजलहक फारुकी व फरीद मलिकचा समावेश आहे.

ब गटात अफगाणिस्तान, बांगलादेश, हाँगकाँग आणि श्रीलंका यांचा समावेश करण्यात आला आहे, तर भारत, ओमान, पाकिस्तान आणि यूएई या गट अ गटात आहेत.

राशिदच्या नेतृत्वाखालील संघ ९ सप्टेंबर रोजी हाँगकाँगविरुद्ध आशिया चषक मोहिमेची सुरुवात करेल.

**अफगाणिस्तान संघ**

रशीद खान (कर्णधार), रहमानुल्ला गुरबाज, इब्राहिम जद्रान, दरविश रसूली, सेदीकुल्ला अटल, अजमतुल्ला उमरझाई, करीम जनात, मोहम्मद नबी, गुलबदीन नायब, शराफुद्दीन अश्रफ, मोहम्मद इशाक, नूर अहमद, मुजीब उर रहमान, एएम गझनफर, फरीद मलिक, फरीद मलिक, फरीद मलिक, फरीद नवाब.

**राखीव खेळाडू** : वफिउल्लाह तरखिल, नांगेलिया खरोटे, अब्दुल्ला अहमदझाई. *(वृत्तसंस्था)*

# जागतिक युवा तिरंदाजी स्पर्धेत मिहीर अपारच्या संघाला सुवर्णपदक

◆ **बुलढाणा, २४ ऑगस्ट**

जागतिक युवा तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाला सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. कॅनडा येथे १५ ते २३ ऑगस्ट या कालावधीत पार पडलेल्या जर्मनी सोबत झालेल्या अंतिम सामन्यात अतिशय चुरशीच्या लढाईत भारतीय संघाने टाय शॉर्ट मध्ये डॉट मारून जर्मन संघाचा पराभव केला. भारतीय संघामध्ये बुलढाण्याचा मिहीर नितीन अपार, हरयाणाचा कुशल हलाल व आंध्र प्रदेशाचा गणेश मणिरत्नम यांचा समावेश होता.

मिहीर नितीन अपारने भारतीय संघाचे नेतृत्व करत अचूक लक्ष्य साधून संघाला सुवर्णपदक जिंकून दिले. गोल्डन बॉय मिहीरने या अगोदरही भारतीय संघाचे नेतृत्व करत पोलंड येथे भारतीय संघाला सुवर्णपदक व मागील महिन्यात सिंगापूर येथे रौप्यपदक प्राप्त करून दिले होते. मिहीर अपार मागील बारा वर्षापासून प्रशिक्षक चंद्रकांत इलग यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण घेत आहे. तो आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व प्रशिक्षकांना देतो. *(तभा वृत्तसेवा)*



युथ वर्ल्ड आर्चरी चॅम्पियन्स स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक जिंकलेला भारत संघ

# चिखली अर्बन विद्यानिकेतनचा खो-खो संघ राज्यात अजिंक्य

## सीबीएसईच्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करणार

◆ **चिखली, २४ ऑगस्ट**

येथील सीबीएसई. संलग्नित चिखली अर्बन विद्यानिकेतन शाळेच्या खो-खो संघाने मुंबई येथे सीबीएसईद्वारे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले. गुजरातमधील गांधीनगर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली असून, हा संघ महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

स्पर्धेचा साखळी गटातील अंतिम सामना २० ऑगस्ट रोजी खेळविण्यात आला. नांदुरा येथील श्रीमती तुलसीबाई रंगलालजी झांबड आणि दि. चिखली अर्बन विद्यानिकेतन या संघांमध्ये झाला. यात मोठ्या फरकाने म्हणजे १५ विरुद्ध २ गुणांनी चिखली अर्बन विद्यानिकेतनने नांदुराच्या संघावर मात केली. संघातील सर्वोत्तम खेळाडू



विजयी खो खो चमूसह संस्थेचे सचिव डॉ. आशुतोष गुप्ता, उपाध्यक्ष मनोहर खडके, संचालक मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व शिक्षक

म्हणून तेजस इंगळे, ऋषिकेश शिंदे आणि गणेश शिंदे यांना गौरविण्यात आले.

प्रशिक्षक राजेंद्र लोखंडे व परमानंद पवार यांचे मार्गदर्शन व सहकार्य या संघाला लाभले. या संघातील सर्वच खेळाडूंची राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल शाळेचे अध्यक्ष सतीश गुप्त, सचिव डॉ. आशुतोष गुप्त, शैक्षणिक संचालिका डॉ. पूजा गुप्ता, प्राचार्य गौरव शेटे यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले आहे.

**विजयी संघाचे जल्लोषात स्वागत**

विजयी खो-खो संघ शाळेत पोहोचल्यावर फटाके फोडून, पुष्पवृष्टी करून ढोल ताशांच्या निनादात खेळाडूंचे जोरदार स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. खो-खो पटू तेजस इंगळे, मयूर लथाड, गणेश शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षक राजेंद्र लोखंडे यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मनोहर खडके, सहसचिव पुरुषोत्तम दिवटे, पालक संचालिका ज्योत्स्ना गुप्ता, संचालक राजेंद्र शेटे, संजय भंगीरे, शैक्षणिक संचालिका डॉ. पूजा गुप्ता, चिखली अर्बन बँकेचे सरव्यवस्थापक शशांक पंधाडे, सुषमा शेटे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. *(तभा वृत्तसेवा)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



## मुंबईच्या मोर्चाला जाण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

**जुळे सोलापूर मराठा बांधवांची बैठक; एक घर... एक गाडी**

मराठा आरक्षणासाठी मुंबईमध्ये लाखोंच्या संख्येने मराठा बांधव उपस्थित रहावे असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. त्या अनुषंगाने जुळे सोलापुरातील मयूरवन मंगल कार्यालय येथे रविवारी मराठा बांधवांच्या वतीने बैठक घेण्यात आली. यामध्ये गुरुवार दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता गोविंद श्री मंगल कार्यालय या ठिकाणी प्रत्येक मराठा बांधवांनी मुंबईच्या मोर्चाला जाण्यासाठी मोठ्या संख्येने आपले चार चाकी वाहन घेऊन वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन या बैठकीत करण्यात आले. ज्या बांधवांच्या मराठा कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत त्यांनी दोन - तीन गाड्या घ्याव्या आणि ज्या मराठा बांधवांकडे चार चाकी वाहन नसेल त्यांनी आपले दोन चाकी वाहन घेऊन प्रचंड संख्येने गोविंद श्री मंगल कार्यालय जुळे सोलापूर येथे वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले. या बैठकीत अनेक मान्यवरांनी मुंबई मोर्चा संदर्भात नियोजन संदर्भात मत व्यक्त केले.यावेळी रवी मोहिते, पोपट भोसले, रवी भोपळे, महेश देवकर, महेश घाडगे, नामदेव पवार मोहन चोपडे, प्रशांत देशमुख, राजाभाऊ कुसेकर, अरुण कदम, कपिल आलाट, विकास कदम, प्रमोद शिंदे, सचिन गोडसे, मनीषा नलावडे, व असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

## सुटकेसमध्ये अज्ञात महिलेचा मृतदेह; तिरू नदीकाठी खळबळ

**चाकूर, दि.२४ ऑगस्ट-**

**चाकूर तालुक्यातील वाढवणा-चाकूर रोडवरील घटना**

**आठ महिन्यांत दुसऱ्यांदा मृतदेह सापडल्याने परिसरात भीतीचे वातावरण**

चाकूर तालुक्यातील वाढवणा-चाकूर रोडवरील शेळगाव शिवाराजवळील तिरू नदीच्या कडेला एका बॅगेत अज्ञात महिलेचा मृतदेह दि.२४ आगष्ट रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. हत्या करून मृतदेह बॅगेत टाकण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात असून मृतदेह नदीच्या काठावर असल्याने दुर्गंधी पसरल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. घटनास्थळाची माहिती मिळताच चाकूर पोलिसांसह वाढवणा पोलिस ठाण्याचे अधिकारी, एलसीबी पथक व मोबाईल व्हॅन पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे. मृतदेह कोणाचा आहे, खून कोणी केला आणि त्यामागील कारण काय याचा शोध घेतला जात आहे.

### आठ महिन्यांतील दुसरी घटना

या घटनेमुळे परिसरात मोठी भीती निर्माण झाली आहे. कारण, याच भागात आठ महिन्यांपूर्वी हणमंतवाडी शिवारातही एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. त्या प्रकरणातील तपास अद्याप लागलेला नाही. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा महिला मृतावस्थेत सापडल्याने नागरिकांमध्ये भीती व चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणामुळे वाढवणा-चाकूर परिसर पुन्हा एकदा हादरला असून पोलिस तपासानंतरच या हत्येचे गूढ उलगडणार आहे.

## निधन वृत्त...

### बाबुराव हंचाटे



**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

सोलापूर येथील अक्कलकोट रोडवरील मनी धारी एम्पायर येथे राहणारे भावसार क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष राजकुमार बाबुराव हंचाटे माजी नगरसेवक यांचे वडील, जिल्हा परिषद शाळेतून मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झालेले बाबुराव गणपतराव हंचाटे वय वर्षे ८५ यांचे आज दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले आहे.ते भावसार क्षत्रिय समाज जेष्ठ नागरिक संघटनेचे माजी अध्यक्ष होते. हंचाटे विद्यालयाचे मुख्याध्यापक भालचंद्र हंचाटे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, मुलगी,जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### शोभा (सोजर) पवार



**बार्शी, दि. २४ ऑगस्ट -**

कसबा पेठ, अण्णा भाऊ साठेनगर येथील जेष्ठ नागरिक सौ. शोभा ऊर्फ सोजर वसंतराव पवार (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने शनिवारी (दि. २३ ऑगस्ट) निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. त्या माजी उपजिल्हाधिकारी कै. वसंतराव पवार यांच्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे तसेच परतवंडे असा मोठा परिवार आहे. त्या बार्शीचे पत्रकार उमेश पवार यांच्या त्या मातोश्री होत.

### किशोर शिवपुरे



**बार्शी, दि. २४ ऑगस्ट -**

महिला राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णा शिवपुरे यांचे पती किशोर शांताराम शिवपुरे वय ६३ वर्ष, रा. मांगडे चाळ, बार्शी यांचे शनिवारी सकाळी हृदय विकाराने निधन झाले. किशोर शिवपुरे हे माजी नगरसेवक कै .दिलीप शिवपुरे यांचे बंधू होते. तसेच नगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी होते. त्यांना दवाखान्यात नेले होते. परंतु त्यापूर्वीच प्राणज्योत मावळली. त्यांच्या पश्चात पत्नी व इतर नातेवाईक आहेत.

# बाप्पाची मूर्ती आमची किंमत तुमची

## आधार प्रतिष्ठानचा दहा वर्षापासून उपक्रम; आलेली रक्कम पर्यावरण रक्षणासाठी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ ऑगस्ट-**

देव बाजारचा भाजीपाला नाही रे ....असे संत तुकडोजी महाराजांनी म्हटले असले तरी अनेकजण मूर्ती विकत घेताना मात्र भाजीपाल्यासम त्याची किंमत करतात. याला फाटा देत येथील आधार प्रतिष्ठानने 'मूर्ती आमची किंमत तुमची' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

बुधवारी दि.२७ ऑगस्टपासून गणेशोत्सवास सुरवात होत आहे. त्यानिमित्त घरोघरी गणेशमूर्तींचे आगमन होणार आहे. सध्या बाप्पांच्या मूर्तीची दुकाने सजली आहेत. आपली मनपसंद गणेशमूर्ती घेण्यासाठी गणेशभक्तांकडून सध्या बाजारात गर्दी होताना दिसत आहे. गेल्या काही वर्षापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती घेण्यावर अनेकांचा भर आहे. ज्या गणेशाचे आपण दहा दिवस मनोभावे पूजन करतो त्याची विसर्जनानंतर विटंबना



होऊ नये यासाठी अशा गणेशमूर्ती घेण्याकडे कल आहे. परंतू बऱ्याच वेळा पर्यावरणपूरक मूर्तींची किंमत अधिक असल्याने अनेकजण स्वस्तात मिळेल ती मूर्ती घेण्यातही धन्यता मानतात. अशा गणेशभक्तांना त्यापासून परावृत्त करण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी येथील आधार प्रतिष्ठानने एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या प्रतिष्ठानने पर्यावरणमूर्तीचेच प्रत्येक घराघरात आगमन व्हावे यासाठी 'मूर्ती आमची किंमत तुमची' असा उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे मूर्ती विकत घेताना दुकानदार व ग्राहक असा संबंध संपून देव अन् भक्त असा संबंध तयार होतो.

देव घ्या कुणी देव घ्या । आयता आला घर पुसोनी ।। या संतवचनानुसार गणेशभक्तांना ही विशेष पर्वणी आधार प्रतिष्ठानने दिली आहे.

**येथे मिळतील मूर्ती**
**मिलींद माईनकर मो. ७७४३८९२०५९ चंदन'' व्यंकटेश नगर, महिला हास्पीटलच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.**

गेल्या दहा वर्षापासून आम्ही पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि मूर्तीची विटंबना थांबावी म्हणून हा उपक्रम राबवितो. पहिल्या वर्षी २५, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी ५१, चौथ्या वर्षी १०० तर गेल्या वर्षी १५१ पर्यावरण पूरक शाडूच्या गणेश मूर्ती गणेश भक्तांनी नेल्या. येथे मूर्तीची किंमत सांगितली जात नाही तर भक्त स्वेच्छेने डब्यात रक्कम अर्पण करून मूर्ती घेऊन जातात. कोरोनाच्या काळात ७५ मूर्तीच ठेवल्या होत्या. या मूर्ती सोलापूरातील मूर्तीकारांकडून तयार करून घेतो. आठ इंच ते एक फूट उंचीच्या या मूर्ती विविध आकारातील व रंगातील असतात. हा उपक्रम निरंजन पाटील, कपील बायस, ऐश्वर्या कुलकर्णी, सायली मंत्री, अमोल जाधव, रसिका तुळजापूरकर, तृप्ती माईनकर यांच्या सहाय्याने सुरू आहे. गणेशभक्तांकडून जमा झालेल्या रकमेत काही रक्कम आम्ही जमा करून ती रक्कम पुढील वर्षीच्या मूर्ती खरेदीसाठी व पर्यारण रक्षण उपक्रमासाठी वापरतो.

**- मिलींद माईनकर, अध्यक्ष, आधार प्रतिष्ठान सोलापूर.**

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीनिमित्त जिव्हाळा मागासवर्गीय संस्थेच्यावतीने आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ऑगस्ट**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त, जिव्हाळा मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था व साई संजीवनी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम रविवार, दि २४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत पार पडला.



या शिबिरामध्ये ५३३ नागरिकांनी सहभाग घेत वैद्यकीय सेवा व औषधोपचाराचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन सचिन मांजरे पाटील व आरोग्य अधिकारी डॉ. शितल बोपलकर यांच्या हस्ते झाले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राहुल मांजरे पाटील, डॉ. सौरभ आंधळकर व त्यांची वैद्यकीय टीम, तसेच ग्रामीण रुग्णालयातील डॉ. पवन गुंड, डॉ. कुलकर्णी, व डॉ. वर्षा टोपे-जाधव हे उपस्थित होते. रक्त तपासणीसाठी पांडुरंग कांगणे व त्यांचे सहकारी यांनी सेवाभावाने सहभाग घेतला.

कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, तसेच जिव्हाळा संस्थेचे अध्यक्ष बब्रुवान धावारे, निलेश खुडे, राजू थोरात, बापू गायकवाड, युवराज वाघमारे, मोहन खुडे, श्याम शिंदे, राहुल कांबळे, श्यामलाल कसबे व संस्थेचे सल्लागार संतोष कसबे यांची उपस्थिती लाभली.

या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांसाठी आरोग्यसेवा सहज उपलब्ध करुन देण्याचा संस्थेचा उद्देश साध्य झाला असून उपस्थित सर्व नागरिकांनी या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.



### वीर गणपतीचे जल्लोषात स्वागत...



**जुना विडी घरकुल गोविंदराज नगर येथून निघालेल्या वीर गणपतीचे स्वागत केले तसेच पुजन, आरती करण्यात आली. यावेळी वीर गणपती ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, सदस्य बंधू, भक्तगणांची उपस्थिती होती.**

## क्रीडा

# माढा तालुका दुकानदार संघास विजेतेपद

**रेशन दुकानदार, अधिकाऱ्यांच्या क्रिकेट स्पर्धा : अधिकारी संघ उपविजेता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

माढा तालुका दुकानदार संघाने रेशन दुकानदार, अधिकाऱ्यांच्या क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी अधिकारी संघाचा पराभव करीत कै. अशोक कोंडीबा पेंटर ह्यांच्या स्मरणार्थ असलेली ट्रॉफी आणि ११ हजाराचे बक्षीस पटकावले.

येथील स्व. लिंगराज वल्याळ मैदानावर अंतिम फेरीत अधिकारी वर्ग विरुद्ध दक्षिण सोलापूर तसेच माढा संघ विरुद्ध ब झोन संघ अशी लढत झाली झाली. यामध्ये माढा तालुक्याच्या दुकानदार संघाने ६ ओव्हरमध्ये ६६ धावा ठोकून बाजी मारली. अधिकारी संघाने केवळ ६५ धावा काढून ६६ धावांचे



टार्गेट रेशन दुकानदार संघासमोर ठेवले होते. रेशन दुकानदार संघाने जोरदार फलंदाजी करून ६६ धावा ठोकल्या.

जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर व अन्न धान्य वितरण अधिकारी तसेच सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन विक्रेता असोसिएशन, यांच्या संयुक्त विद्यमानाने फक्त पुरवठा विभागाचे अधिकारी व दुकानदार यांचे क्रिकेट सामने आयोजित केले होते. याचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख व जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत मोहोळ, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, पुरवठा अधिकारी वर्ग, परिमंडळ अ, ब, क, ड असे चारही झोन मिळून १६ संघाने सहभाग नोंदविला होता. या सामन्यांसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर, परिमंडळ अधिकारी राजेश यमपुरे, प्रफुल नाईक, नंदकिशोर डोके, जिल्हा सचिव राजय्या कमटम, जिल्हा प्रमुख नितीन पेंटर, सर्व झोन अध्यक्ष व पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतलेले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि समालोचक मनीष काळे यांनी केले.

- **स्पर्धेतील प्रथम चार संघ :** माढा, अधिकारी वर्ग संघ, ब झोन संघ, दक्षिण सोलापूर संघ.
- **सर्वोत्कृष्ठ खेळाडू :** मालिकावीर :- विक्रांत कदम (माढा रेशन दुकानदार), फलंदाज : विक्रांत कदम (माढा रेशन दुकानदार), गोलंदाज : दिपक शिंदे (ऑपरेटर), यष्टीरक्षक : यल्लाप्पा वारगंटी (महसूल सहाय्यक), क्षेत्ररक्षक : राजेश यमपुरे (परिमंडळ अधिकारी ब विभाग)
- **स्पर्धेतील प्रथम चार पुरस्कर्ते :** कै.अशोक कोंडीबा पेंटर स्मृती, कै.बाबुराव आसादे काका पुढारी स्मृती, ताहेर हशमोदीन शेख मामू माजी जिल्हाध्यक्ष स्मृती, कै.म.शफी हुंडेकरी चाचा माजी जिल्हाध्यक्ष स्मृती. म्हमाणे परिवार ८१ वर्ष पूर्ती निमित्त (मालिकावीर व सामनावीर), गोलंदाज व यष्टीरक्षक (माजी महापौर कै. विश्वनाथप्पा सिद्रामप्पा बनशेट्टी स्मृती). स्व.ताहेर हशमोदीन शेख मामू स्मरणार्थ नातू आझम नवाज बद्दीऊज्जमा बिराजदार यांच्याकडून ११ हजार रोख.

## गणराज श्री शरीरसौष्ठव स्पर्धा 31 ऑगस्टला उमरग्यात

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा यांच्या सयुंकत विद्यमाने गणराज श्री २०२५ शरीरसौष्ठव स्पर्धा ३१ ऑगस्टला उमरगा येथे आयोजित केली आहे.

श्री गजानन गणेशोत्सव मंडळ उमरगा यांच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष बालाजी पाटील, उपाध्यक्ष गोपाल जाधव, लिम्रा जिमचे संचालक अझीम शेख यांच्या पुढाकाराने व इंडियन शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव डॉ. संजय मोरे, सोलापूर शरीर सौष्ठव संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. ही स्पर्धा उस्मानाबाद, सोलापूर, लातूर, उमरगा जिल्ह्यातील शरीरसौष्ठव खेळाडूंसाठी ६ वजनी गटात होईल. प्रत्येक गटात ३ बक्षीसे देण्यात येणार आहेत. रोख बक्षिस, सन्मान चिन्ह व सन्मान पत्र देवून विजयी खेळाडूंना गौरविण्यात येणार आहे. तसेच गणराज श्री २०२५ हा बहुमान मिळवणाऱ्या स्पर्धकाला ११ हजार, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र देवून गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकाना रात्रीचे जेवण व एका बाजूच्या प्रवास खर्च देण्यात येणार आहे. स्पर्धकांची वजन तपासणी सायंकाळी ४ ते ५ या वेळेत घेण्यात येणार आहे. उशिरा येणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धेत भाग घेता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. नोंदणीसाठी स्पर्धकांनी सचिव प्रमोद काटे (मो. ९४२२३८००३३) अथवा नजीर शेख (मो. ९३२५२३८६१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे असे आवाहन सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांनी करण्यात आले आहे.

## जिल्हाध्यक्षपदी प्रा.संतोष खेंडे, सुहास छंचुरे शहराध्यक्ष

### सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघ : परमेश्वर व्हसुरे व गंगाराम घोडके सचिव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा.संतोष खेंडे तर शहराध्यक्षपदी सुहास छंचुरे आणि जिल्हा सचिवपदी परमेश्वर व्हसुरे तर शहरसचिव पदी गंगाराम घोडके यांची निवड झाली.

श्री मल्लिकार्जुन हत्तुरे प्रशाला येथे सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाच्या वतीने पदाधिकारी निवडीची सभेत राज्य समन्वयक भारत इंगोले यांनी ही निवड जाहीर केली. अध्यक्षस्थानी श्री मल्लिकार्जुन प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते. यावेळी भु. म पूळ्ी जुनिअर कॉलेजचे



उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामुल, माजी जिल्हाध्यक्ष प्रा सचिन गायकवाड माजी सचिव गोकुळ यादव, राजाराम शितोळे, प्रा शरण वांगी, वसीम शेख, नावेद मुन्शी, प्रा.प्रसाद कर्रे, रविंद्र चव्हाण, प्रशांत कदम, श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोळीकर, धर्मराज कट्टीमनी, अब्दुल्ला चौधरी, संतोष पाटील, संपत दुस्सा, विठ्ठल सरवदे, संजय यादव, संजय बनसोडे, सागर जगझाप, सिताराम भांड, पांडुरंग गायकवाड, महावीर अंखाडे, अरुण खटकाळे, गणेश पवार, बापूराव बाबर रंगसिद्ध कोरे आदी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांचे राज्य क्रीडा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोतकर, सोलापूर बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद भोसले, सॉफ्ट फुटबॉल फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे, सॉफ्टबॉलचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, जिम्नॅस्टिकचे अध्यक्ष कार्तिक चव्हाण यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### श्री कालिका गणपती मंडळाकडून ६८ लिंग परिसराची स्वच्छता

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

श्री कालिका गणपती मंडळाकडून श्री सिद्धरामेश्वरांनी स्थापित केलेल्या ६८ लिंगांचा परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. श्रावणमास समाप्ती नंतर बिल्व पत्री, फुले, प्लॅस्टिक कॅरीबॅग्स व इतर निर्माल्य गोळा करण्यात आले. मोहिमेची सुरुवात श्रीसिद्धेश्वर मंदिरातील अमृतलिंग येथून सुरुवात करून बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिर येथे शेवट करण्यात आला. श्रावणातील शेवट शुक्रवारी आणि अमावास्या दिवशी हजारो भक्त ६८लिंग परिक्रमा करतात त्यावेळी शिवलिंगावर दूध,बेलपत्र,फुले, अक्षता वाहण्याची प्रथा आहे. पण नंतर हे निर्माल्य गोळा करण्यासाठी काही व्यवस्था नसल्याने ह्या लिंगा सभोवतालची जागेत अस्वच्छता निर्माण होते ही बाब कालिका गणपती मंडळाचे अध्यक्ष शशिकांत बिराजदार ह्यांनी लक्षात घेऊन रविवारी मंडळातील कार्यकर्त्यांसह ही स्वच्छता मोहिम पार पाडली. ह्यावेळी जवळपास१६० किलो निर्माल्य गोळा करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात आली. ह्या स्वच्छता मोहिमेत अध्यक्ष शशिकांत बिराजदार, नागेश वडणे, गिरीश करकंटी, सचिन लिगाडे, हेमंत हरकारे, लक्ष्मण कलागते,अभिजित धर्माधिकारी, अजित पाटील, सुनील हिरेमठ, पृथ्वीराज बिराजदार, गणेश कलागते, महेश पंडित, अजित कुलकर्णी, योगेश मलगोंडा आदी सहभागी झाले होते.



### ए.जी. पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बनविले स्वयंचलित वाटर लेव्हल इंडिकेटर

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

विजापूर रोडवरील सैफुल जवळील ए.जी.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील यश किशोर पांढरे, व्हनमारे महालसिद्ध अंबादास आणि बाळकृष्ण प्रकाश तेलसंग या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक प्रा. जी.आर.देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी ऑटोमेशन कसे गरजेचे आहे याविषयीचा प्रकल्प राबविला.हा प्रकल्प पाण्याच्या वापराचे अनुकूलन करण्यावर लक्ष केंद्रित आहे. पाण्याची नासाडी ही एक मोठी आणि जागतिक समस्या बनली आहे त्यामुळे पाण्याची बचत करणे अधिक महत्त्वाचे आहे. पाण्याची बचत करण्याची एक सामान्य पद्धत म्हणजे पाण्याची टाकी भरून ठेवणे हा प्रकल्प पाण्याची पातळी मोजून तो स्क्रीनवर दर्शवितो आणि पाण्याची टाकी भरून वाहून जाण्यापासून वाचवितो. हे सर्व Arduino Uno च्या मदतीने केले जाते. अल्ट्रासोनीक सेंसर टाकीत पाण्याची पातळी ओळखतात. जी Arduino Uno ला पाठविली जाते. एलसीडी स्क्रीनवर पाण्याची पातळी दर्शविली जाते टाकीतील पाण्याची पातळीनुसार सर्वो मोटर चालू किंवा बंद करतो त्यामुळे पाण्याची टाकी भरल्यावर पाण्याची सुरुवात थांबते अशाप्रकारे पाण्याच्या नियंत्रणाचे स्वयंचलित करून आपण ऊर्जा आणि नैसर्गिक संसाधनांची बचत करू शकतो. संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, कॅम्पस डायरेक्टर डॉ.एम. ए. चौगुले, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. एस.बी.गदवाल यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे ट्रस्टी शिवानंद पाटील व अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांनी याप्रसंगी सर्वांचे अभिनंदन केले.

### अपेक्षित जागा न मिळाल्यास निवडणूक स्वबळावर

**कुर्डुवाडी, दि. २४ ऑगस्ट-**

भाजपसोबत आपली युती आहे, पण भाजपकडून आपल्याला अपेक्षित जागा मिळाल्या नाहीत तर स्वबळावर लढण्यास माझी



परवानगी आहे. फक्त बौद्धांच्या मतांवर नव्हे, सर्व समाजाला सोबत घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त जागा निवडून आणण्याच्या दृष्टीने कामाला लागावे, असा आदेश रिपाइं (आ) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कार्यकर्त्यांना दिला. कुर्डुवाडी येथे आयोजित रिपाइं (आ) कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे हे होते. यावेळी राज्य उपाध्यक्ष बापूसाहेब जगताप, राज्य संघटक सुनील सर्वगोड, महाराष्ट्र कार्याध्यक्ष जितेंद्र बनसोडे, प.महाराष्ट्र सचिव चंद्रकांत वाघमारे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष अमरकुमार माने आदी व्यासपीठावर उपस्थित होते. रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी संभाव्य जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या आगामी भूमिका सांगितल्या. ते म्हणाले, भाजपसोबत युती असली तरी स्थानिक स्तरावर सन्मान मिळत नसल्याने स्थानिक निर्णय घेण्याचा अधिकार द्यावा. स्थानिक पातळीवर आघाड्या महत्वाच्या असतात. याठिकाणी पक्ष एकत्र येत नाहीत तर विचारधारा एकत्र येते. विचारधारा महत्वाची असून आघाड्यांमध्ये योगदान निर्णायक ठरते. कार्यक्रमाचे संयोजक बापूसाहेब जगताप म्हणाले, गेल्या तीस-पस्तीस वर्षात आम्ही इतर पक्षाचा एकही उमेदवार पाच ते सहा वार्डातून निवडून दिला नाही. सर्व जाती धर्माच्या लोकांना सामावून घेत प्रत्येक समाजाला आम्ही रिपाइंच्या माध्यमातून प्रतिनिधित्व दिले आहे. आम्ही शहरामध्ये दबाव गट निर्माण केला आहे. आपण आमच्या पाठीशी राहिलात तर संविधान बदलणाऱ्यांना टराटरा फाडा मी देशभरामध्ये मजबूत करु शकलो माझ्या भीमाचा वाडा. कारण माझ्या पाठीशी उभा राहिला बापूसाहेब जगताप यांचा माढा. आपल्या काळजावर बाबासाहेबांचे चित्र काढा. आणि संविधान बदलणाऱ्यांना टराटरा फाडा. साऱ्या देशामध्ये मी फिरवत आहे आरपीआयचा गाडा, अन्याय झाला तर करावा लागेल तुम्हाला राडा, अशा मिश्किल शैलीत राज्यमंत्री आठवले यांनी शेरेबाजी केली.

# कर्णकर्कश डॉल्बीमुक्त सोलापूर अभियानासाठी आज डॉक्टरांची रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

डीजेमुक्त सोलापूर अभियानासाठी आता शहरातील डॉक्टरांच्या विविध संघटना पुढे सरसावल्या आहेत. सोमवारी (२५ ऑगस्ट) सकाळी साडेदहा वाजता ऑफिसर क्लब ते पोलीस आयुक्तालय या मार्गावरून डॉक्टरांची रॅली निघणार आहे. त्यानंतर आयुक्तांना शाश्वत डीजे बंदीसाठी निवेदन देण्यात येणार आहे.

डीजेमुक्त सोलापूर कृती समितीच्या नेतृत्वाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, निमा (नॅशनल इंटिग्रेटेड मेडीकल असोसिएशन), हॉस्पिटल ओनर्स असोसिएशन, होमिओपॅथी असोसिएशन, इंडियन डेंटल असोसिएशन, इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपी या संघटना सहभागी होणार असल्याचे डीजेमुक्त सोलापूर कृती समितीचे



अध्यक्ष ॲड. धनंजय माने यांनी सांगितले. शहरात डीजे मूक्त सोलापूर कृती समितीच्या वतीने या गणेशोत्सवापासून डीजे कायमचा बंद करावा यासाठी आंदोलने सुरु झाली आहेत. सुरवातीला ज्येष्ठ नागरिक संघांनी मोर्चा काढला. त्यानंतर आता आयएमए संघटनेने या विरोधात आवाज उठवून डीजे आरोग्यास घातक असल्याची भूमिका मांडली.

निमाने त्यांच्या सदस्यांची डीजे विरोधात स्वाक्षरी मोहीम सुरु केली. आतापर्यंत २०४ डॉक्टरांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हॉस्पिटलमध्ये दाखल होणाऱ्या अत्यवस्थ रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना रस्त्यावरील डीजेचा त्रास असह्य होऊ लागला आहे. डीजेचा त्रासातून सोलापूर शहर मुक्त व्हावे अशी भूमिका घेऊन या संघटना पोलिस आयुक्तांकडे मागणी करणार आहेत. अधिकाधिक डॉक्टरांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन डीजेमुक्त सोलापूर कृती समितीचे अध्यक्ष ॲड. धनंजय माने, आयएमएच्या अध्यक्षा डॉ.मंजुषा शहा, निमाचे सोलापूर शाखा अध्यक्ष, डॉ. नागनाथ जिड्डीमनी, हॉस्पिटल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय मंठाळे व होमिओपॅथी डॉक्टर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील वरळे, इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. कौस्तुभ तांबेकर यांच्यासह विविध वैद्यकीय संघटनांनी केले आहे.

## अजित पवारांचा कृषीमंत्री दत्ता भरणे यांना चिमटा की इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २४ ऑगस्ट-**

कृषिमंत्र्यांबद्दल सारखे काही ना काही तरी निघत होते. मी ते सगळे बघत होतो. त्यामुळे यावेळी मी ठरवले की आता असा कृषिमंत्री शोधून काढतो की, ज्याच्याबद्दल काहीच निघाले नाही पाहिजे. यावेळी अजित





पवारांनी दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाहिले आणि त्यांना म्हणाले, आता मी तुझ्या साक्षीने सगळ्यांना सांगितले आहे. त्यामुळे तुझ्याबद्दल काहीच निघून देऊ नकोस, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषीमंत्री दत्ता भरणे यांना चिमटा काढला की थेट इशाराच दिल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली होती.

पुण्यातील वाकड येथे रविवारी महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघाचं ६५ वे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील या अधिवेशनाला उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.

## बीगसीचे प्राचार्य डॉ. देशमाने यांना सरकारकडून अधिकृत पेटंटची मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी अभियांत्रिकी संशोधन क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन केले आहे. त्यांचा अभिनव शोध "Machine Vibration and Noise Controlling Device'' याला भारत सरकारकडून अधिकृत पेटंट मान्यता प्राप्त झाली असून या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे.

उद्योगजगतात यंत्रसामग्रीतून होणारा कंपन आणि आवाज ही नेहमीच गंभीर समस्या राहिली आहे. यामुळे आवाज प्रदूषण वाढते, तसेच मशीनरीचे आयुष्य कमी होऊन



उत्पादनक्षमताही घटते. डॉ. देशमाने यांनी विकसित केलेले हे अत्याधुनिक उपकरण यंत्राच्या कार्यप्रणालीदरम्यान निर्माण होणारा अनावश्यक कंपन व आवाज प्रभावीपणे नियंत्रित करते. परिणामी औद्योगिक उत्पादनक्षमता वाढून पर्यावरणपूरक कार्यप्रणालीला चालना मिळणार आहे. महाविद्यालयाचे चेअरमन रवींद्रजी गायकवाड व सचिव अनामिका गायकवाड यांनी डॉ. देशमाने यांचे अभिनंदन करताना म्हटले की, ''ही कामगिरी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल व त्यांना नाविन्यपूर्ण संशोधनाकडे प्रवृत्त करेल.''

डॉ. देशमाने यांचा हा यशस्वी शोध शैक्षणिक क्षेत्रापुरता मर्यादित न राहता उद्योग, संशोधन व समाजासाठीही उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे, त्यांनी आजवर ९ अभियांत्रिकी विषयक ग्रंथ लिहिले असून अलीकडेच त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या विषयावर नवीन पुस्तक प्रकाशित केले आहे. या उपलब्धीबाबत मनोगत व्यक्त करताना डॉ. देशमाने म्हणाले, ''प्रत्येक प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी या यशातून प्रेरणा घेऊन संशोधनाला प्राधान्य द्यावे. ही अभूतपूर्व कामगिरी भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरणार आहे.

## मटन स्टॉलवर रांगा




**सोलापूर : श्रावण संपल्यानंतर मटन दुकानावर मटन घेण्यासाठी रांगा लागल्या आहेत. रामलाल चौक परिसरात टिपलेले छायाचित्र.**

## चायनीज सेंटरवर तीन ग्राहकांना मारहाण

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

जेवणाची ऑर्डर लवकर देऊनही जेवण लवकर का देत नाहीस म्हणून विचारणा केल्याने २०-२१ जणांनी मिळून तिघा ग्राहकांना लोखंडी सळई व काठीने मारहाण केल्याची घटना कोंडी येथील एका चायनीज सेंटर येथे शनिवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली. राघवेंद्र नागप्पा इटनळी (वय २५ वर्ष), नईम आलम पठाण (वय २५ वर्ष) आणि राजदीप सदा सावंत (वय २५ वर्षे, तिघे रा. बाळे ) अशी मारहाण झालेल्याची नावे आहेत . हे तिघे शनिवारी रात्री कोंडी येथील एस आर चायनीज सेंटरवर जेवण करता गेले होते. यावेळी जेवणाची ऑर्डर लवकर दिली असतानाही लवकर जेवण का देत नाही म्हणून दुकानदाराकडे विचारणा केली असता या तिघा ग्राहकांना सोमनाथ राऊत व इतर २० ते २१ जणांनी मिळून लोखंडी सळई व काठीने मारहाण करण्यात आली. सर्वांगास मार लागल्याने ते तिघे उपचार करिता येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री स्वतः दाखल झाले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## ऑर्किडच्या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्व. जयंत नारळीकरांच्या स्मृतींना दिला उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्व.जयंत नारळीकरांच्या स्मृतीना उजाळा दिला. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर प्रयोग करीत खगोलशास्त्रज्ञ स्व.नारळीकर यांना अनोख्या पद्धतीने आदरांजली वाहिली.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी भारतीय शास्त्रज्ञाची माहिती देणारे विविध भित्तीपत्रके, चंद्रयान, ए.आय.तंत्रज्ञान रोबोट, ड्रोन, लेजर होम सिक्युरिटी, मॅग्नेटीक कार, कार्बन गन, सोलार मोटार, सोलार सुनामी अलर्ट, ड्रेनेज सिस्टीम, सोलार सिग्नल, रेनवॉटर अलर्ट अशा विविध प्रयोगाची उपकरणे बनवून आपले कौशल्य सिद्ध केले. या प्रदर्शनास पालक वर्गानी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत विद्यार्थ्यांना शाबासकीची थाप दिली.



सोलापूर विज्ञान केंद्राचे प्रमुख राहुल दास यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षाताई विभुते, विश्वस्त नंदिनी करजगी, यशराज करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, मार्गदर्शिका मीना पारखे, सेंट जोसेफ स्कूल बार्शीचे प्राचार्य फादर वर्गीस, आर्या पब्लीक स्कूल माढाचे प्राचार्य सागर थोरात , संगमेश्वर पब्लीक स्कूलच्या प्राचार्या प्रियांका समुद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन मानसी मोरे हिने केले. विज्ञान प्रदर्शना सोबतच यावर्षी सी बी एस ई 'हब ऑफ लर्निंग' अंतर्गत विज्ञान प्रकल्प स्पर्धांचे आयोजन केले होते. मान्यवरांच्या हस्ते विजयी संघाना बक्षिस वितरण करण्यात आले. बक्षिस समारंभाचे सूत्रसंचालन तुलसाश्री चितारी यांनी केले.



## मेहता शाळेत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

कै.वि. मो. मेहता माध्यमिक शाळेमध्ये पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा प्रशालेची माजी विद्यार्थिनी मनाली नितीन जाधव, अनिशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. प्रशालेतील सुमारे १११ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला. गेली १४ वर्षे प्रशाला उत्तम पद्धतीने उपक्रम राबवित आहे. मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांचे प्रोत्साहन विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळते. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी कलाशिक्षिका मधुरा देशपांडे, मीनाक्षी भाटवडेकर आणि शिक्षक -शिक्षकेतर वृंद, शिल्पकार नितीन जाधव आणि अभिंजली जाधव यांनी परिश्रम घेतले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्वांचे कौतुक केले.

# सोलापूर-तुळजापूर स्थानकावर वाहतूक नियंत्रक नेमणूक करा

### प्रवाशी संघटनेची मागणी

### एस.टी. चालक-वाहक तामलवाडी थांबा घेत नाहीत!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या जलद आणि रातराणी बसेसना अनेक वर्षांपासून थांबा दिला असताना अनेक चालक-वाहक सोलापूर, धाराशिव आणि तुळजापूर स्थानकावरून प्रवाशांना तामलवाडी थांबा देत नसल्याने या दोन्ही स्थानकावर काही दिवस वाहतूक नियंत्रक नेमून या चालक-वाहकांना या थांब्याबाबत नीट सुचना कराव्यात आणि शिस्त लावावी, अशी मागणी तामलवाडी परिसर एस. टी. प्रवाशी संघटनेच्या वतीने एस. च्या सोलापूर, धाराशिव विभाग नियंत्रकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी गाव हे जवळपास १० हजार लोकसंख्येचे गाव आहे. या गावातील बसथांब्यावर तामलवाडी गावासह परिसरातील होनसळ, गंगेवाडी, गंजेवाडी, पिंपळा बु., देवकुरळी आदींसह इतर काही गावचे अनेक प्रवासी कायम उभे असतात. इतकेच नाहीतर या थांब्यावरून शेकडो विद्यार्थी-विद्यार्थीनी रोज ये-जा करतात. याचबरोबर या गावात मिनी एमआयडीसी असल्याने शेकडो कामगारही रोज ये-जा करतात. यामुळे या गावाला सर्व बसेस थांबवाव्यात यासाठी येथील प्रवासी संघटनेने सर्व विभागांना पाठपुरावा केला होता. यामुळे गेल्या काही वर्षांपूर्वी या गावाचा थांबा दिल्याचे पत्र एस. टी. च्या काही विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्राम स्थांना दिले आहे. याचबरोबर महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडेही सध्या या थांब्याबाबत पाठपुरावा केल्याची माहिती प्रवासी संघटना पदाधिकाऱ्यांनी दिली. यामुळे काही विभागांनी तामलवाडी बसथांबा देण्याच्या सुचना त्यांच्या वाहक-चालकांना दिल्या मात्र काही चालक-वाहक सोलापूर-धाराशिव-तुळजापूर बसस्थानकावरून तामलवाडी येथील प्रवासी, शालेय विद्यार्थ्यांना घेत नाहीत. यामुळे तामलवाडी ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी, सदस्य आणि प्रवाशी संघटनेच्या माध्यमातून शिवाजी भाऊसाहेब पाटील यांनी काही विभागप्रमुखांना दूरध्वनीद्वारे आणि पत्रव्यवहार करून तक्रारी केल्या. तरीही काही बसेसचे चालक-वाहक बसेस रिकाम्या धावतानाही प्रवाशांसह विद्यार्थ्यांना तामलवाडी थांब्यासाठी घेत नाहीत.



यामुळे सोलापूर-तुळजापूर-धाराशिव येथे काही काळासाठी विभाग नियंत्रकांची नेमणूक करून तामलवाडी थांब्याबाबत चालक-वाहकांना सुचना द्याव्यात आणि आपल्याही उत्पन्नात भरीव वाढ करावी, अशी अपेक्षा तामलवाडी परिसर एस. टी. प्रवाशी संघटनेच्या वतीने दोन्ही जिल्ह्याच्या विभाग नियंत्रकांकडे केली आहे.

### विद्यार्थी पासची तर अनेक वाहकांना ॲलर्जीच!

शालेय विद्यार्थी म्हणून आपणही केव्हातरी एसटीने प्रवास केला आहे; हे अनेक चालक-वाहक विसरतात. कारण विद्यार्थी बसजवळ येवून अहो... तामलवाडी थांबते का? असे विचारताच...सरक बाजूला पास आहेना तुझा...थांबत नाही...अशा निब्बर भाषेत सोलापूर-तुळजापूर बसस्थानकावरील काही वाहकांसह चालकही विद्यार्थ्यांना दरडावत असल्याची खंत काही विद्यार्थी-विद्यार्थीनींनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली. यामुळे शालेय विद्यार्थ्यांना कोणत्याही बसेसमध्ये प्रवास करण्याची मुभा विभाग नियंत्रकांनी द्यावी, अशी अपेक्षा शालेय विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**डॉग शो**
सोलापूर : केनेल फेडरेशन ऑफ सोलापूरच्या वतीने जगदीश श्री मंगल कार्यालयात डॉग शोचे आयोजन केले होते. त्यात सहभागी झालेले विविध प्रजातीचे श्वान.



**महत्वाचे...**

## मंगळवार पेठेत हाणामारी करणाऱ्या दोघांविरुध्द गुन्हा

सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
मंगळवार पेठेत तरुणास हामाणारी करणाऱ्या दोघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अनिल उमाकांत बुरांडे (वय ४७, रा. पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आनंद भिंगारे, धिरज भिंगारे (रा. पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी मंगळवार पेठेत आनंद भिंगारे याने भाड्याच्या जागेत इलेक्ट्रिक मिटरची वायर बदलून द्या असे अनिल बुरांडे यांना विचारले असता त्यांनी बुरांडे यांच्याशी हुज्जत घालून शिवीगाळ केली. त्यानंतर बुरांडे हे घरी झोपले असता त्यांचा मुलगा समर्थ बुरांडे यांना म्हणाला की, काय झाले बाप्पा असे विचारल्यानंतर अनिल बुरांडे यांनी त्यास ते जाऊ दे, सोड मी ठीक आहे, मी त्यांना बोलतो असे म्हणून अनिल बुरांडे बाथरूमला गेले. त्यावेळी समर्थ हा घरमालकाचे घरी जाऊन आनंद भिंगारे यास बोलत असताना धिरज भिंगारे याने समर्थ यास मुलास हाताफायाने मारहाण करून टेबलावरील काच उचलून मारण्याचा प्रयत्न केला. म्हणून दोघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

## वृध्दाची ८ लाखांची ऑनलाईन फसवणूक, गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
वृध्दाची ऑनलाईन ८ लाखांची फसवणूक करणाऱ्यांवर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महादेव रेवणसिध्द जम्मा (वय ६८, रा. शांताबाई किल्लेदार नगर, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोबाईल क्र. ८५४४३८०२०१, ७७४९९६७१९६ चा धारक आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जून २०२५ रोजी महादेव जम्मा हे त्यांच्या घरी असताना मोबाईल क्र. ८५४४३८०२०१, ७७४९९६७१९६ चा धारकाने त्यांना फोन करून पोलिस असल्याची बतावणी केली. गैरप्रकार तसेच मनी लॉडरींग आणि फौजदारी युक्त गुन्हा याबाबत जम्मा यांना धमकीची भाषा वापरून त्यातून सुटका करून घेण्यासाठी जम्मा यांच्याकडून ८ लाख रुपये ऑनलाईन घेतले. तसेच चुकीच्या पध्दतीने जम्मा यांना अटकाव करून, निवासस्थानी बंदीस्थ ठेवले, अनेकदा नोटीस खोटे देस्त तयार करून ते खरे असल्याचे भासवून जम्मा यांची फसवणूक केली. म्हणून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक गजा पुढील तपास करीत आहेत.

## जागा भाड्याने देण्याच्या वादातून तरुणास रॉड व कोयत्याने मारहाण

सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
जागा भाड्याने देण्याघेण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका तरुणाला लोखंडी रॉड ,कोयता व बांबूने मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना पश्चिम मंगळवार पेठ येथे शनिवारी सायंकाळी घडली. धीरज सुनील भिंगारे (वय ३३ व,र्ष राहणार पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर)असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे. तो शनिवारी सायंकाळी घरामध्ये असताना त्याला अनिल बुरांडे व समर्थ बुरांडे इतर चार जणांनी मिळून जागा भाड्याने देण्या घेण्याच्या कारणावरून वाद झाल्याने लोखंडी रॉड, कोयता, बांबूने व लाथा बुक्क्याने मारहाण केली. यात दोन्ही हात पायाला जखम व सर्व अंगास मुकामार लागल्याने तो उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी स्वतः दाखल झाला.

## तरुणाला चाकू व लाथा बुक्क्याने मारहाण

सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
घराजवळ पलंग टाकून रस्ता का आडवतात असे म्हणून एका तरुणाला चौघाजणांनी मिळून चाकूने व लाथाबुकाने मारहाण केल्याची घटना विजापूर रोडवरील हळीया नगर येथे शनिवारी रात्री घडली. रवी श्रीमंत व्हनमराठे (वय ३३ वर्ष, रा. हरियानगर, सोलापूर ) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो शनिवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास राहता घराजवळ असताना त्याला रामचंद्र काळे व इतर तीन जणांनी मिळून वाटेत पलंग टाकून रस्ता का अडवतो असे म्हणून त्याला चाकूने व लाथा बुक्क्याने मारहाण केली. यात हाताला जखम व सर्व अंगास मुकामार लागल्याने तो उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात आज रविवारी पहाटे स्वतः दाखल झाला.



सोलापूर : गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर साहित्याच्या खरेदीसाठी टिळक चौकात ग्राहकांनी केलेल्या गर्दीचे रविवारी टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

# ११४० मंडळांकडून गणरायाची प्रतिष्ठापना

## मंडपांचा वाहतुकीला अडथळा नको; गणेशोत्सवासाठी १५०० पोलिसांचा बंदोबस्त

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
सोलापूर शहरात ११४० तर ग्रामीणमध्ये तीन हजार १४ सार्वजनिक मंडळातर्फे गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार असून गणेशोत्सवा-पूर्वी सोलापूर शहरातील सात पोलिस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या हद्दीतील मंडळांची तयारी, मंडपाची पाहणी केली. सार्वजनिक वाहतुकीला कोणताही अडथळा होणार नाही, अशी मंडपाची रचना असावी, अशा सूचना पोलिस अधिकाऱ्यांनी सर्वांना केली आहे.

सोलापूर शहरात एक हजार १४० सार्वजनिक मंडळांकडून गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. त्या सर्व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकृतपणे वीज कनेक्शन घ्यावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील २३ शाखा कार्यालये व पाच उपविभागीय कार्यालयांमध्ये मंडळांना अर्ज करता येतील. त्यांना तातडीने गणेशोत्सव काळासाठी कनेक्शन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गणेशोत्सव काळात घरगुती दराप्रमाणे सर्वांना कनेक्शन मिळणार आहे.

सार्वजनिक मंडळांनी रस्त्यालगतच उभारलेले असतात. कोणाच्या मंडपामुळे वाहतुकीला अडथळा होतो का, याची पाहणी करण्याचे आदेश पोलिस आयुक्तांनी दिलेले असल्याने शहरातील सर्व पोलिस ठाण्यांमधील सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनी सोलापूर शहरातील रस्त्यांची पाहणी केली.

सर्व मंडळांनी सार्वजनिक रस्त्याचा दोन तृतीयांश भाग मोकळा सोडणे आवश्यक आहे. दरम्यान, मंडळांना परवाना देताना डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करणार असल्याचे पदाधिकाऱ्यांकडून लेखी घेतले जात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आवाजाची मर्यादा पालन करण्याचेही बंधन त्यांच्यावर राहणार आहे. सोलापूर शहरात आगमनाऐवजी विसर्जन मिरवणुका काढल्या जातात. गणेशोत्सवासाठी संपूर्ण शहरात बाराशे मदतीला सुमारे ३०० होमगार्ड देखील हजार पोलिसांचा असणार आहे. त्यांच्या असणार आहेत. सध्या प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संवेदनशील भागात प्रभारी अधिकाऱ्यांची रात्री आठ ते दहा या वेळेत पायी गस्त देखील सुरू आहे.

## जागा खरेदी करण्याच्या बहाण्याने महिलेची ७ लाखांची फसवणूक

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
जागा खरेदी करण्याच्या बहाण्याने महिलेची ७ लाख २० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनुराधा दिलीप फंड (वय ५३, रा. आवसे वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर) या म हिलेच्या फिर्यादीवरुन नागेश उर्फ आशा प्रभाकर मेणसंगे (रा. आवसे वस्ती, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुराधा फंड व नागेश मेणसंगे हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. १७ जानेवारी २०२४ रोजी नागेश मेणसंगे याने अनुराधा फंड यांना मला जागा खरेदी करावयाची आहे, तुमचे पैसे काही दिवसा मध्ये परत करतो, तुम्ही माझ्याकडे भिशी जमा करा, वेळेत तुम्हाला पैशाची मदत होईल, प्लॉट जागा विकत घेण्यासाठी पैसे कमी पडत आहे, मला पैशाची गरज आहे, पैसे कमी पडत आहेत, तुमचे पैसे लवकर जमा करतो असे म्हणून फंड यांचा विश्वास संपादन करून फंड व त्यांच्या परिसरात राहणाऱ्या विविध लोकांकडून वेळोवेळी ७ लाख २० हजार रुपये घेतले.

पैसे घेऊन बरेच दिवस झाल्यानंतर नागेश मेणसंगे पैसे देत नसल्याने फंड यांनी पैशाची मागणी केली. त्यावेळी आपली फसवणूक झाल्याचे दिसून आल्याने फंड यांनी पोलिस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पाटोळे पुढील तपास करीत आहेत.

## पैशांचा व्यवहार : तरुणाने केले फिनेल प्राशन

सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
पैशाच्या व्यवहारातून एका तरुणाने राहत्या घरी फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केल्याची घटना भैय्या चौक येथे शनिवारी सायंकाळी घडली. प्रभाकर यल्लाप्पा बंडी (वय ३० वर्ष, रा. वारदवाळ, भैय्या चौक सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याने शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास राहत्या घरात पैशाच्या व्यवहारातून फरशी पुसण्याचे फीनेल प्राशन केले. याचा त्रास होऊ लागल्याने त्याला उपचारकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ महेश याने रात्री दाखल केले.

## बनावट सही करून प्लॉटची बनावट नोटरी

### ५ लाखांच्या फसवणुकप्रकरणी गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
बनावट सही करून प्लॉटची बनावट नोटरी करून महापालिकेत मिळकत नोंदीसाठी दाखल करून ५ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रावळनाथ शिवराम तेंडोलकर (वय ९१, रा. आर्शिन अपार्टमेंट, मोदीखाना, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन गौरीशंकर रामचंद्र चौगुले (वय ३३, रा. सुभाष नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रावळनाथ तेंडोलकर यांनी सन २०११ मध्ये मजरेवाडी येथील सर्वे नं. २५३/१ब मधील नियोजित सत्य साई नगर गृहनिर्माण संस्थेमधील प्लॉट नं. २७४ आणि २८६ हे प्लॉट ५ लाख रुपयांना खरेदी केले होते.

गौरीशंकर चौगुले व त्याचा साथीदार यांनी रावळनाथ तेंडोलकर यांचे नाव टाकून व तेंडोलकर यांच्या जागी दुसराच व्यक्ती उभा करून त्यांची बनावट सही करून तेंडोलकर यांच्या मालकीचे दोन्ही प्लॉटची बनावट नोंटरी कब्जा पावती व करारपत्र केले. या कब्जा पावती व करारपत्राद्वारे महानगरपालिकेत मिळकत नोंदीसाठी दाखल केले. ही बाब निदर्शनास आल्यानंतर तेंडोलकर यांनी पोलिस ठाणे गाठून फसवणूक झाल्याबाबत गुन्हा दाखल केला. पोलिस उपनिरीक्षक वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

## अटक वॉरंट नोटीस पाठवून २१ लाखांची महिलेची फसवणूक

### पोलिस उपनिरीक्षक, सीबीआय ऑफिसरसह अनेक बँक खातेधारकांविरुध्द सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
तुमच्या विरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून तपासामध्ये तुमच्या बँक खात्यामध्ये आर्थिक उलाढाल झाल्याने तुमच्याविरुध्द अटक वॉरंट नोटीस निघाल्याचे सांगून ती नोटीस मोबाईलवर पाठवून महिलेची २१ लाख २५ हजार १६१ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक, सीबीआय ऑफिसरसह अनेक बँक खातेधारकांविरुध्द सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





याबाबत संगिता नागनाथ स्वामी (वय ४०, रा. शाहीर वस्ती, जागृती माता मंदीराजवळ, भवानी पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन विजय खन्ना (पोलिस सब इनस्पेक्टर कुलाबा पोलिस ठाणे), प्रविण सूद (सीबीआय ऑफिसर) तसेच वेगवेगळ्या बँकेचे बँक खोदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२८ जून २०२५ रोजी संगिता स्वामी यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर एका अनोळखी व्यक्तीने फोन केला. त्या व्यक्तीने स्वामी यांना तुमच्या विरुध्द मुंबईतील कुलाबा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल झाल्याचे सांगून स्वामी यांना त्यांची वैयक्तिक माहिती विचारली. २८ जून ते ५ ऑगस्ट या कालावधीत स्वामी यांना त्या अनोळखी व्यक्तीसह कुलाबा पोलिस ठाण्यातील पोलिस सबइन्स्पेक्टर विजय खन्ना, सीबीआय ऑफिसर प्रविण सूद यांनी वेळोवेळी मोबाईल कॉल करून स्वामी यांना त्यांचे आधारकार्ड व एटीएम कार्ड कुलाबा पोलिस ठाणे येथे दाखल असलेल्या मनी लॉडरिंगच्या गुन्ह्यातील आरोपी नरेश गोयल याच्या घरामध्ये सापडले आहे. नरेश गोयल यास मनी लॉडरिंग गुन्ह्यांमध्ये सीबीआयकडून अटक केली आहे व तपासामध्ये स्वामी यांच्या नावे असलेल्या कॅनरा बँक खात्यामध्ये मोठ्या प्रमाणात संशयास्पद आर्थिक उलाढाल झाली असून या प्रकरणातमध्ये तुमचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याची खोटी माहिती सांगितली. या प्रकरणात स्वामी यांच्या नावाने अँरेस्ट वॉरंट सुप्रीम कोर्टाची नोटीस व सर्व्हेलन्सची ३ पानी इंग्रजीमध्ये नियम असलेली नोटीस स्वामी यांना मोबाईलवरील वॉटसअँपवर पाठवून दिली.

या गुन्ह्यात स्वामी यांना अटक करण्याची भिती दाखवून त्यांनी स्वामी यांच्याकडून वेळोवेळी वेगवेगळ्या बँक खात्यामध्ये आरटीजीएसद्वारे तसेच फोन पे वरून २१ लाख २५ हजार १६१ रुपये पाठविण्यास भाग पाडले. आपली फसवणूक होत असल्याचे दिसून आल्यानंतर स्वामी यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेऊन याबाबत गुन्हा दाखल केला. पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा पुढील तपास करीत आहेत.

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ

सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पूजा प्रशांत कोरे (वय २८, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती प्रशांत, सासरे चंद्रकांत, सासू मल्लम्मा, दीर बसवराज (रा. तडवळ, ता. अक्कलकोट) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०१४ मध्ये पुजा व प्रशांत यांचा विवाह झाला असून लग्नानंतर पुजा ही प्रशांत सोबत सासरी नांदण्यास होती. त्यावेळी पती प्रशांत व त्याच्या घरातील लोकांनी पुजाच्या चारित्र्याचा संशय घेऊन पैसे मागणी करून तिस वारंवार अपमानिक करून शिवीगाळ केली व मारहाण केली. त्यामुळे याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.

# महामंडळ अध्यक्ष निवड रखडली

### महायुतीमधील कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल

### इच्छुकांमधून गॉडफादरकडे फिल्डींग

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-
महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विविध महामंडळांची घोषणा करून ते कार्यान्वित केले आहेत. परंतु निवडणुका संपून ९ महिने झाले तरी अद्याप एकाही महामंडळाच्या अध्यक्षाची निवड करण्यात आली नाही. त्यामुळे सर्व महामंडळांचा कारभार अध्यक्षांविनाच सुरू आहे. त्यामुळे अध्यक्षपदासाठी इच्छुक असणाऱ्या महायुतीतील नेत्यांमध्ये चलबिचल सुरु आहे.

इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच त्याअंतर्गत कार्यरत १३ उपकंपन्यांची स्थापना शासनाने केली आहे. उपकंपन्यांच्या माध्यमातुन प्रत्येक समाजासाठी विविध कर्जयोजनाही आणल्या आहेत. सत्तेत आल्याने आता सत्तेतील पदे मिळतील अशी कार्यकर्ते आशा बाळगून आहेत. जिल्हा नियोजन समिती, संजय गांधी निराधार योजना, दक्षता समिती यासह विविध समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती न झाल्याने इच्छुकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका निवडणूक न झाल्याने कार्यकर्त्यांत अस्वस्थता पसरली आहे. त्यातच विविध समित्या व महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवड रखडली असल्याने कार्यकर्त्यांमधून उघड नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

विधानसभा निवडणुकीत अनेक इच्छुक भावी आमदारांना महामंडळाचे गाजर दाखविण्यात आले. त्यातून बंडोबांना थंडोबा करण्यात आले . परंतु, अद्यापही महामंडळाचे अध्यक्ष आणि त्यातील सदस्य पदांवर कार्यकर्त्यांची वर्णी लागलेली नाही.

महामंडळाचे जिल्हास्तरावर सोलापूर येथे कामकाज सुरू करण्यात आले आहे. महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करावी लागते. महामंडळामार्फत सहा योजना राबविल्या जात असून त्यामध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, महिला स्वंयसिद्धी व्याज परतावा योजना या पूर्णतः ऑनलाइन स्वरूपाच्या आहेत. परंतु यातील अडचणी कुणाकडे मांडायच्या असा प्रश्न लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसमोर आहे. महात्मा बसवेश्वर महामंडळाचे कर्ज फक्त लिंगायत समाजातील इतर मागास लाभार्थ्यांनाच देण्यात येते. अध्यक्ष असल्यास त्याम ध्ये सुधारणा करून सर्व लिंगायत समाजासाठी विविध कर्ज योजना राबविण्यासाठी सहकार्य झाले असते. अनेक जाचक अटींवर चर्चा करण्यासाठी व लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी अध्यक्ष व पदाधिकारी असणे गरजेचे आहे.

**लाभार्थ्यांच्या अनेक अडचणी**

सरकारने सर्वच समाजिसाठी विविध महामंडळांची स्थापना करून समाजातील तरुणांना व्यवसाय सुरू करण्यासाठी व्याज परतावासह विविध कर्जयोजना सुरू केली आहेत. यामुळे तरुणांना फायदा होत आहे. मात्र म हामंडळाला अध्यक्ष नसल्याने लाभार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. लाभार्थ्यांना सुलभ कर्ज पुरवठा होण्यासाठी महामंडळाच्या अध्यक्षांची निवड त्वरित करावे.
-अप्पासाहेब पाटील, नेते, भाजपा दक्षिण सोलापूर

**वेब पोर्टलवर अर्ज करणे अनिवार्य**

महामंडळातील योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह वेब पोर्टलवर अर्ज करणे अनिवार्य आहे. २० टक्के बीजभांडवल योजना व थेट कर्ज योजना या ऑफलाईन स्वरूपाच्या असून, त्याचे अर्ज जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहेत. लाभार्थ्यांनी कार्यालयाशी संपर्क साधून विविध कर्ज योजनेचा लाभ घ्यावा.
- वृषाली लहारे, जिल्हा व्यवस्थापक, महामंडळ

## भजीचा मोह नडला अन् दुचाकीच्या डिग्गीतील अडीच लाखांची रोकड लंपास

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -
शहरातील सराफ कट्टा येथे भजी घेण्यासाठी गेलेल्या वृद्धाच्या दुचाकीच्या डिग्गीतून चोरट्याने २ लाख ५० हजार रुपये किंमतीची रोकडे लंपास केली. याबाबत शशिकांत सिद्रामप्पा बिराजदार (वय ७१, रा. उत्तर कसबा, मसरे गल्ली, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ ऑगस्ट रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास सराफ कट्टा येथील श्रीपाद ज्वेलर्ससमोर असलेल्या पवनकुर भेळ गाडी येथे शशिकांत बिराजदार यांनी त्यांची एम एच १३ सीएक्स ०८१० क्रमांकाची दुचाकी उभी करून भजी घेण्यासाठी भेळ गाडीजवळ गेले. त्यावेळी कोणीतरी चोरट्याने बिराजदार यांच्या दुचाकीच्या डिग्गीची चावी उघडून डिग्गीतील रोख अडीच लाख रुपये चोरून नेले. सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# श्रीमद्भागवत : भक्ती, ज्ञान व वैराग्याचा अमृतस्रोत : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

श्रीमद्भागवत हा १८,००० श्लोकांचा, १२ स्कंधांचा असा महान ग्रंथ आहे. पुराणसागरातील हा एक अद्वितीय रत्न आहे. या ग्रंथाचे निरुपण करताना श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी भागवत म्हणजे काय? पुराण म्हणजे काय? कथा म्हणजे काय? या मूलभूत प्रश्नांची सखोल उकल केली. शास्त्राने दिलेले अर्थ, तत्त्वज्ञानाने केलेले विवेचन, लौकिक व अलौकिक दृष्टिकोन, तसेच व्यवहारातील व प्रपंचातील उदाहरणे यांचा आधार घेऊन महाराजांनी भागवताचे अद्वितीय स्वरुप स्पष्ट केले. त्यामुळे हा ग्रंथ केवळ वाचनीय किंवा ऐकण्यास रमणीय असा नसून जीवन जगण्याची कला शिकवणारा, भक्ती व ज्ञान यांचा सुंदर संगम घडवणारा आणि वैराग्याचा मार्ग दाखवणारा दिव्य ग्रंथ आहे, याची प्रचीती सर्व श्रोत्यांना झाली. गेल्या तीस दिवसांच्या या प्रवचनमालेत महाराजांनी पहिल्या दोन स्कंधांवर आधारित सखोल निरुपण केले. खरं पाहता भागवत ही कथा नसून कथेतीलच जीवन, कथेतीलच तत्त्वज्ञान आहे. प्रत्येक संवाद नवे विषय उलगडतो. जसा भक्तीचा सखोल विचार येथे येतो, तसाच ज्ञानाचा गहन चिंतनही दिसते. या कथेतील प्रमुख पात्र राजा परीक्षित; जो लौकिकदृष्ट्या अर्जुनाचा नातू होता. प्रत्यक्षात एक जीवंत तत्त्व आहे. जीव आणि परमात्मा यांचा संबंध, जीवनातील शेवटच्या क्षणीसुद्धा परमेश्वराचे स्मरण कसे व्हावे, हे परीक्षिताच्या जीवनातून दिसते. महाराजांनी सांगितले की, श्रीमद्भागवत कथेचे मूळ म्हणजे परमात्म्याला पाहण्याची अंतर्दृष्टी प्राप्त होणे. परमार्थाचे स्वरुप हे बदलात्मक आहे. भक्ती, ज्ञान व वैराग्य या तिघांचा सुंदर समन्वय या ग्रंथामध्ये आहे. भागवताचा प्रत्येक संवाद म्हणजे भक्तीचेच मूळ तत्त्व आहे. डॉ.जयवंत महाराज श्रोत्यांना यावेळी मार्गदर्शन करतात की, आजच्या समाजात संवाद हरवत चालला आहे, त्याऐवजी विसंवाद वाढत आहे. अशा वेळी भागवताचा संदेश सांगतो की, 'सत्य संवाद हा जीवोद्धार करणारा असतो' आणि तोच खरा धन्य आहे. कर्म, ज्ञान, योग आणि भक्ती या सर्व अंगांचा समन्वय श्रीमद्भागवतात आहे. पण त्यातील सार, त्यातील दान हे भक्तीचे आहे. भक्तीचे अमूल्य दान देणारा हा दिव्य ग्रंथ प्रत्येक जीवाला आपले करतो, अज्ञानाचा अंधार दूर करून आत्मज्ञानाचा प्रकाश देतो. याच दिव्य विचारांनी डॉ. जयवंत महाराज यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतनाच्या अखेरच्या सत्रात सर्व श्रोत्यांचे हृदय भरुन टाकले.


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ३०

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २५ ऑगस्ट २०२५ | वराह जयंती |
| विक्रम संवत् २०८२ | श्री चक्रधरस्वामी जयंती |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीया (१२.३४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ. फाल्गुनी (२७.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्द (१२.०८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२५.१०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात पालक-शिक्षक सभा संपन्न

**पिलीव, दि. २४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात पालक-शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी संजय पाटील होते. सभेची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर अण्णा व लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. यावेळी विदयालयाचे मुख्याध्यापक बागल, पर्यवेक्षक किरगत उपस्थित होते. यावेळी अनिवासी गुरुकुल प्रकल्प तसेच रयत प्रज्ञशोध परीक्षा याविषयी पर्यवेक्षक किरगत, वाघमारे, रयत प्रज्ञशोध परीक्षेच्या विभागप्रमुख घोडके, आठरे तसेच संजय पाटील यांनी मार्गदर्शन केले. पालक प्रकाश जाधव, नागेश लेंगरे उपस्थिती होते.

# डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचा मध्यवर्तीच्या बैठकीत निर्धार

## मध्यवर्तीच्या अध्यक्षपदी बालाजी महालेंची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

होटगी रोड मध्यवर्ती मंडळाच्या अध्यक्षपदी बालाजी महाले तर कार्याध्यक्षपदी शुभम काशीद यांची निवड करण्यात आली. हद्दवाढ भागातील होडगी रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाची वार्षिक बैठक मंडळाचे संस्थापक नगरसेवक नागेश ताकमोगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. मंडळांनी पारंपारिक वाद्यावर भर द्यावा गणेशोत्सव हा डीजे मुक्त व्हावा असा निर्धार बैठकीत करण्यात आला. यावेळी मध्यवर्ती मंडळाचे ट्रस्टी शाम कदम, विशाल ताकमोगे, प्रतीक ताकमोगे, माजी उत्सव अध्यक्ष महेश माने, शैलेश असते, सचिन चौधरी, आनंद ताकमोगे, दिनेश वाघमारे, कृष्णा झिपरे, विश्वनाथ आमाने, राहुल लोभे यांच्या प्रमुख उपस्थिती होती.



**अन्य पदाधिकारी असे-**

उपाध्यक्षः अक्षय जाधव, कृष्णा झुंजारराव, माऊली चव्हाण, कार्याध्यक्ष : आकाश जाधव, शुभम काशीद, मिरवणूक प्रमुखः सागर सलगर, लखन दरीगो, सचिव : अभिषेक भेंडे, लेझीम प्रमुख : वैष्णव कोलते, मनोज लोखंडे, पूजाप्रमुख : विनायक सावंत, राकेश जाधव, वीरेश हुकेरी, सोशल मीडिया प्रमुख : राज पवार, अभी ताकमोगे खजिनदार : विजय भोसले.




# फीट इंडीया मिशन; सोलापूरकरांची सायकलोथॉन रॅली

## सुमारे १ हजार सायकलपटूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

फीट इंडिया मिशनअंतर्गत रविवारी सकाळी सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण पोलिसांच्यावतीने सायकलोथॉन रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये सुमारे १ हजार सायकलपटूंनी सहभाग नोंदविला.

भारत देशातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी क्रिडा मंत्रालय यांनी ''फीट इंडीया मिशन'' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये देशातील सर्व नागरिकांचा सहभाग राहावा यासाठी प्रशासकीय विभागातील सर्व घटकांना याबाबत वेगवेगळे उपक्रम राबविण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. पोलिस महासंचालक श्रीमती रश्मी शुक्ला यांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना भारत सरकारच्या उपक्रमांमध्ये सायकल रॅली घेण्याबाबत सूचित केले आहे.

त्यानुसार रविवारी सकाळी सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय, सोलापूर ग्रामीण पोलिस दल यांच्या संयुक्त विद्यमाने फीट इंडीया सायकल रॅली आयोजीत करण्यात आली होती. सदरची सायलक रॅली ही ५० किलो मीटर, २५ किलोमीटर आणि १० किलोमीटर या तीन टप्यामध्ये घेण्यात आली. शहरातील चार हुतात्मा पुतळ्यापासून या रॅलीस उपायुक्त श्रीमती आश्विनी पाटील, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीस सुरूवात करण्यात आली.

सदरची रॅली ही सात रस्ता चौक, विजापूर रोडने सोरेगाव व नांदणी पेट्रोल पंप येथे जावून तेथून परत सात रस्ता चौक, रंगभवन चौक मार्गे सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे समाप्त करण्यात आली. या रॅलीमध्ये पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी उपायुक्त विजय कबाडे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. तसेच सोलापूर शहर व ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासह सोलापूर शहरातील स्वामी विवेकानंद पब्लीस स्कूल येथील विद्यार्थी, सोलापूर सायकल लव्हर्स या ग्रुपसह सुमारे १००० सायकलपटूनी सहभाग नोंदविला. या रॅलीमधून नागरिकांना आपले आरोग्य चांगले व तंदुरूस्त राखण्याबाबतचा संदेश पोहचविण्यात आला.

पोलिस मुख्यालयात रॅलीच्या समारोपावेळी पोलिस आयुक्त एम. राजकुमार व पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस खात्यातील अधिकारी व अंमलदार यांना दैनंदिन कर्तव्य करताना अनेकदा तणावाचा सामाना करावा लागतो. अशा वेळी नियमीत व्यायाम व संतुलीत आहार घेतल्यास आपले आरोग्य चांगले राखता येते. तरी पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार यांच्यासह नागरिकांनी आरोग्य चांगले ठेवावे असा सल्ला दिला. यावेळी फिट इंडीया सायकल रॅलीमध्ये सहभागी सायकलपटू यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल (पदक) देवून सन्मानीत करण्यात आले.

सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलिस उपअधिक्षक शिरीष हुंबे, राखीव पोलिस निरीक्षक शरद बारवकर, राखीव पोलिस उपनिरीक्षक राकेशकुमार ढाकणे, पोलिस शिपाई प्रशांत म्हमाणे, महिला पोलिस कर्मचारी मोनिका एकबोटे यांनी परिश्रम घेतले.

# दुःखाचे प्रदर्शन करू नका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

जीवनात चढ उतार म्हणजेच दुःख दुःख आलेच. परंतु प्रत्येकाला असे वाटते की आपली कधी दुःखाची गाठ पडू नये. माणसाला दुःखाचे प्रदर्शन करायची सवय असते. छोटे असलेले दुःख मोठे करून सांगण्याची सवय माणसाला असते असे प्रतिपादन स्वाध्यायी तृप्ती रांका (बेंगलोर) यांनी केले. व्यक्तीच्या मानसिक पातळीवर दुःख ठाण मांडून बसलेले असते. दुःख मोठे नसते परंतु माणसाला आपले छोटे असलेले दुःख मोठे करून सांगण्याची सवय असते.भूतकाळ आणि भविष्यकाळाचा विचार न करता वर्तमानाकडे समभावाने,सम दृष्टीने पाहण्याची गरज असते.भूतकाळ आणि भविष्यकाळाचा विचार करून वर्तमान जगण्याचे राहून जाते.घरातील आई-वडील, ज्येष्ठ मंडळी यांचा सन्मान राखा.त्यांचे आशीर्वाद लाखमोलाचे असतात.आपण आज जे काही आहोत त्यामागे त्यांच्या आशीर्वादाची शक्ती असते. त्यांच्या अनुभवाचा फायदा घ्या. पेन्सिलीने केलेल्या चुका मिटवत रबर स्वतः झिजते त्याप्रमाणे आपल्या असंख्य चुका विसरून आपण मोठे व्हावे यासाठी आई-वडील झिजत असतात याची जाणीव हवी. उगाच अहंकार बाळगू नका. जीवनात कधी अपयश आले तर निराश हताश होऊन निष्क्रिय बनू नका.संकटांमुळे आत्मविश्वास दुणावतो म्हणून संकटांना घाबरू नका.परिस्थिती कितीही प्रतिकूल असू द्या प्रयत्न करत रहा.प्रयत्नाने परिस्थितीला अनुकूल बनवा.

नाम आणि मान या दोन गोष्टींपासून दूर राहा.अहंकाराचे पोषण करू नका. कौरव,रावण, कंस यांच्याकडे सर्व काही होते परंतु त्यांनी अहंकार सोडला नाही.आपण गेल्यानंतरही लोकांच्या स्मरणात राहू असे कार्य करा. मान आणि माया हे या दोन गोष्टींपासून दूर राहा.आपण जर व्यापारी असलो तर दिवसभरानंतर दुकान बंद करताना हिशोब चेक करतो. त्याच पद्धतीने आपल्या कर्माचेही अवलोकन करा. कर्म चेक करा. आज आपल्याकडून काही चुकले का याविषयी चिंतन करा. आत्मशुद्धीसाठी कर्मांचा हिशोब बाळगणे महत्त्वाचे आहे. इमानदार हा शब्द नुसता ऐकायला बरा वाटतो.व्यक्ती स्वतःशी इमानदार राहत नाही ती दुसऱ्यांशी कधी इमानदारीने राहणार हा प्रश्नच आहे.अंधारात छाया, वृद्धावस्थेत काया आणि आयुष्याच्या शेवटच्या क्षणी माया कधीच साथ देत नाही हे माहीत असूनही आज प्रत्येक जण पैशाच्या मागे धावतोय.


पर्युषण महापर्व विशेष

# विद्यार्थ्यांनी सर्व कला प्रकारात तरबेज व्हावे : डॉ. नभा काकडे

## स.हि.ने प्रशालेत यशस्वी विद्यार्थी गुणगौरव समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

शालेय जीवनात आपले ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्याभ्यासाबरोबर साहित्य वाचनाची अभिरुची वृद्धिंगत केली पाहिजे तसेच विविध कला प्रकार अवगत करून क्रीडा क्षेत्रात नावलौकिक केला पाहिजे तरच समाजात तो सर्व संपन्न विद्यार्थी म्हणून ओळखला जाईल, असे प्रतिपादन हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या सचिव डॉ नभा काकडे यांनी व्यक्त केले

श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित स.हि.ने. प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी पुरस्कार प्रदान सोहळ्यानंतर त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी होत्या. व्यासपीठावर सुधीर देव, सिंधुताई चंद्रगी, कोंडेवार, सुनंदा तांबोळकर, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर आदी उपस्थित होते. प्रारंभी संगीत विभागाचे शिक्षक संतोष कोथळीकर व विद्यार्थ्यांनी चला पाहुण्यांचे करू स्वागता गीत सादर केले

रेवती कुलकर्णी म्हणाल्या की जिद्द चिकाटी साहस अंगी बनविल्यास यश नक्की मिळते म्हणून ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माधुरी शेंडगे यांनी केले. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी विशाल प्रधान, मीनल देशपांडे, स्वरूपा नाईकनवरे, सौ भगत, सौ पोकळे, सौदी कुलकर्णी, गौरी मठपती, वीरेश अंगडी, घुले, बाळगे, गायकवाड, साबळे, शिंदे यांनी प्रयत्न केले.



### गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार

शालांत परीक्षा प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या सिद्धार्थ तुपेरे यास गौरव चिन्ह व प्रमाणपत्र पुरस्कार देण्यात आला विविध स्पर्धा मध्ये तसेच परीक्षेत नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले यावेळी स्वयंम भांडेकर याने मनोगत व्यक्त केले

# सोनामाता प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव तरुण मंडळ अध्यक्षपदी शाबादे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

विजापूर रोड येथील सोनामाता प्रतिष्ठान सोनामाता नगर गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी सचिन शाबादे यांची निवड झाली. संस्थापक वैभव जवळकोटे, आशिष मगर, अरविंद रणदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. **संस्थेचे अन्य पदाधिकारी याप्रमाणे :** उपाध्यक्ष - कृष्णा रजपूत, खजिनदार - विशाल कांबळे, मंडळप्रमुख - महेश टिळे, प्रतिक स्वामी, कार्याध्यक्ष - विकास लोंढे,संकेत पाटील, सचिव - नागेश जवळकोटे, तीर्थ राठोड, सहसचिव - गणेश दस्तापुरे, अभिषेक रणदिवे, मिरवणूक प्रमुख - अभिषेक राठोड, हरीश जवळकोटे



# लोकमान्य संयुक्त गणेशोत्सव महामंडळ संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

लोकमान्य संयुक्त गणेश उत्सव महामंडळाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पत्रा तालीमचे खलिफा पैलवान दत्तात्रय कोलारकर व पैलवान हुसेन यांच्या हस्ते पत्रा तालीम येथे फित कापून करण्यात आले. प्रारंभी प्रेरणास्थान स्व कै. मुरलीधर घाडगे यांच्या फोटोस पुष्पहार घालून अभिवादन केले.

या महामंडळांतर्गत अन्य मंडळांना प्रतिष्ठापनेसाठी व मिरवणुकांसाठी परवाना मिळत असतो. परवान्यासाठी कोणत्या मंडळांना अडचण असल्यास त्यांनी कार्यालयीन प्रमुख प्रवीण जाधव यांना ९७३०१०६००५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. या उद्घाटनाप्रसंगी श्रीकांत घाडगे, उत्तम कोलारकर अमर दुधाळ, उत्सव अध्यक्ष दत्ता भोसले, अंबादास शेळके, आदित्य घाडगे, नवनाथ बन्ने, राहुल बनसोडे, जलपेश घुले, किशोर गादेकर, बसवराज कोळी, कार्याध्यक्ष योगेश क्षीरसागर, सेक्रेटरी राजू हुंडेकरी, खजिनदार मारुती सावंत, प्रसिद्धी प्रमुख वैभव गंगणे, कार्यालयीन प्रमुख प्रवीण जाधव, सचिन स्वामी यांची उपस्थिती होती.

# राज्यातील शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारणार

## समूह साधन केंद्राचा शाळांवर वॉच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शासनाने केंद्रप्रमुख व्यवस्थेची पुनर्रचना केली आहे. शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित दहा प्राथमिक शाळांवर आता एक समूह साधन केंद्र शाळेचा वॉच राहणार आहे. त्यामुळे शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे.

शिक्षकांना प्रात्यक्षिक शिकवण्या, अध्ययन, अध्यापन साहित्याचे आदान-प्रदानाविषयी अडचणी सोडवून अध्यापन पद्धती सुधारणे, शाळेतील भौतिक सुविधेसह इतर गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने राज्यात चार हजार ८६० केंद्रीय शाळेस मान्यता दिली आहे. त्यामुळे दहा शाळांवर एक केंद्र शाळेचा वॉच राहणार असून, यामध्ये केंद्रप्रमुखांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे.

राज्यातील शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा घसरत असल्याची माहिती समोर आल्यानंतर शासनाने राज्यातील प्रत्येक दहा शाळांमागे एक केंद्रीय प्राथमिक शाळा आणि तेवढेच केंद्रप्रमुखांची पदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे येत्या कालावधी शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे. यातून प्रक्रियेचे अवलोकन करणे, गुणवत्ता तपासणे, गुणवत्ता सुधारण्यास मार्गदर्शन करणे, नवीन तंत्रज्ञानाची माहिती शिक्षकांना देणे, अशी कामे करणार आहेत.

### भविष्यात गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचाल

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने समूह साधन केंद्र शाळा हे अतिशय महत्वाचे एकक आहे. समूह साधन केंद्र शाळांच्या योजनेचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक समूह साधन केंद्र शाळेसाठी एक या प्रमाणे ४८६० समूह साधन केंद्रांच्या ठिकाणी समूह साधन केंद्र शाळा शिक्षण सल्लागार समित्यांची स्थापना करण्यास शासनाने मान्यता दिली आहे ही भविष्यातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीसाठी चांगली बाब आहे.

**- नीलेश देशमुख, राज्य सरचिटणीस, शिक्षक सहकार संघटना.**

# लम्पीने ७९ जनावरे दगावली


## २३३ जनावरांवर उपचार सुरू, जिल्हा पशुसंवर्धन विभागाची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

जिल्ह्यातील सर्व भागात खोंड, बैल व कालवड अशा गायवर्णीय पशुमध्ये लम्पी या आजाराने शिरकाव केल्याने सोलापूर जिल्ह्यात ६९ जनावरे दगावली असून २३३ जनावरांवर उपचार सुरु आहेत. लम्पीवर नियंत्रण मिळविण्यात पशूविभागाला यश आले आहे, अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्यावतीने देण्यात आली आहे.

लम्पी त्वचा रोग असून त्याला लम्पी आजार म्हणूनही ओळखले जाते. हा एक विषाणूजन्य आजार आहे. जो मुख्यतः गायवर्णीय बैल, गाय खोंड अशांना होतो. कॅप्रीपॉक्स नावाच्या विषाणूमुळे हा रोग पसरतो. बाधित जनावरांचे दुग्ध उत्पादन कमी होते, जनावर अशक्त होते आणि त्याचे वजन घटते. काही वेळा जनावरांचे पाय सुजतात आणि त्यांना चालण्यास त्रास होतो.

रोग प्राणघातक नसला तरी देखील यामुळे जनावरे खूप अशक्त होतात आणि त्यांच्या दुग्ध उत्पादनावर मोठा परिणाम होतो. ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. यावर कोणताही विशिष्ट उपचार नाही. लसीकरण हा या रोगापासून बचाव करण्याचा सर्वात प्रभावी उपाय आहे. सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण भागात २३३ जनावरांवर उपचार सुरु आहेत. गेल्या तीन महिन्यात २ हजार ४०३ जनावरांवर उपचार करण्यात आले आहे.



### अशी आहे जिल्ह्यातील बाधित जनावरे

अक्कलकोट १७, बार्शी १, करमाळा १८, माढा २६, माळशिरस ५३, मंगळवेढा २३, मोहोळ ९, पंढरपूर ४७, सांगोला १६, उत्तर सोलापूर ८, दक्षिण सोलापूरमध्ये १५.

# वसतिगृह प्रवेश अर्जासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बुधवारपर्यंत मुदत

## तीन सप्टेंबरला प्रवेश यादी जाहीर होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेत ऑनलाइन संकेतस्थळावर वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अर्जासाठी २७ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आला आहे.

पदवी आणि एमए, एमएस्सी या अभ्यासक्रमांच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश घेता येईल. https://hmas.mahait.org यासंकेतस्थळावर २७ ऑगस्टपर्यंत अर्ज नोंदणी करावी. छाननी २८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर यादरम्यान केली जाईल. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी २ वसतिगृहे आहेत. तेथे मुले व मुलींसाठी प्रत्येकी १०० जागा आहेत.

गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी ३ सप्टेंबर रोजी जाहीर होईल. पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत १२ सप्टेंबर आहे. रिक्त जागांवर दुसऱ्या प्रतीक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी १५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची अंतिम मुदत २३ सप्टेंबरपर्यंत राहील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### कोळी परिवारतर्फे ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**सोलापूर,दि.२४ ऑगस्ट-**

श्रावण महिन्यानिमित्त कुडलसंगम (ता. दक्षिण सोलापूर) येथील संयम क्लासेसच्या ४० विद्यार्थ्यांना कोळी परिवाराच्या वतीने मेघा कोळी यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात रेवणसिद्ध कोळी व समर्थ कोळी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्यातील सहभागाबद्दल उपस्थितांनी कौतुक केले. येथे खाजाप्पा सूर्यवंशी यांनी ''संयम क्लासेस'' च्या माध्यमातून मोफत शिकवणी वर्गांची सुरुवात केली आहे. स्पर्धा परीक्षा देत असतानाही, सूर्यवंशी यांनी स्वतःच्या अपयशातून हार न मानता इतरांसाठी यशाचा मार्ग निर्माण केला. गेल्या दोन वर्षांत संयम क्लासेसला चांगला प्रतिसाद मिळाला असून, सध्या ५५ ते ६५ विद्यार्थी येथे नियमित शिक्षण घेत आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय बुरकुले, रणजित जाधव आणि प्रेरणा हुसुकाळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



### बाळे शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी तात्यासाहेब काटकर

**अकलूज, दि.२४ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी माळशिरसचे संचालक तात्यासाहेब काटकर यांची तर व्हाइस चेअरमनपदी शिवाजी थिटे यांची एकमताने निवड करण्यात आली. बाळे (सोलापूर) येथील पतसंस्थेच्या कार्यलयात माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सर्व संचालक मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये ही निवड करण्यात आली. महाराष्ट्रील शिक्षकांच्या पतसंस्थेत आदर्श ठरलेली हि पतसंस्था माजी शिक्षक आमदार श्री. सावंत यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली पारदर्शक व्यवहार करीत आहे. १०० कोटींची उलाढाल असलेल्या पतसंस्थेने गेल्या महिन्यात सभासदांना नऊ टक्क्यांनी डिव्हिडंट वाटप केला आहे. वर्षातून दोन वेळा व्याज वाटप केले जाते. सभासदांच्या पाल्यांच्या लग्नकार्यात ११ हजारांची मदत देते तसेच सभासदांचे पाल्यांना १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेत ७५ टक्के, शिष्यवृत्ती, नवोदय, एन.एम.एस व राष्ट्रीय, राज्य खेळाडूंचा गौरव करून सत्कार केला जातो. अशा अनेक वैशिष्ट्याने पतसंस्था कमकाज करत आहे. पतसंस्था आता राज्यस्तरीय झाली आहे. बार्शी व पंढरपूर तसेच मुंबई येथे लवकरच शाखेचे उद्घाटन होणार आहे. तसेच सभासदांच्या मागणीप्रमाणे लवकरच कर्ज मर्यादा वाढविली जाणार आहे. कागद विरहीत पतसंस्था आहे.



### डॉ. प्रकाश बुरगुटे यांच्या वाढदिवसानिमित्त वखारिया विद्यालयात वह्यांचे वाटप

**बार्शी दि.२४ ऑगस्ट**

उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात डॉ.प्रकाश बुरगुटे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. बुरगुटे यांनी आपल्या सुविद्य पत्नी कै.डॉ.सौ. सुवर्णा बुरगुटे यांचे स्मरणार्थ संस्थेच्या विविध शाखेतील विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप करण्यात आले. या विद्यालयात ही मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांचे हस्ते ३० डझन वह्या गरीब, होतकरु, हुशार, अनाथ, एकल पालक अशा विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक शंकर शिंदे, रमेश लंकेश्वर, डी.डी. राऊत, शिरीष साळुंखे, पी.बी. काशीद, एन.एन महाले, अनिल वैद्य, मकरंद जगदाळे, आर.एस. दुलंगे, रोहिणी डोईफोडे, दादासाहेब धनके, सेवक वाघ मामा, सुरवसे मामा उपस्थित होते. चेअरमन शिवशक्ती बॅक बार्शी तथा या विद्यालयाचे स्कूल कमिटीचे अध्यक्ष असलेले डॉ. प्रकाश बुरगुटे यांचे विद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व मुख्याध्यापक यांनी आभार मानले.



### उबाठा शिवसेनेचे नूतन तालुकाप्रमुख मारुती आंबुरे यांचा सत्कार

**पिलीव, दि. २४ ऑगस्ट -**

माळशिरस तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या तालुकाप्रमुखपदी मारुती आंबुरे यांची निवड झाल्याबद्दल सोलापूर जिल्हा शिवसेना संघटक अशोकभाऊ घोंगडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी सेनेचे उपजिल्हा प्रमुख शयामदादा लेंगरे, पिलीवचे उपशाखा प्रमुख तुषार राऊत, पोपट काळे, संभाजी लोखंडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### मोडनिंब येथे आज मराठा समाजाची चावडी बैठक

**मोडनिंब, दि.२४ ऑगस्ट-**

मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या भव्य आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोडनिंब (ता. माढा) येथे सकल मराठा समाज बांधवांची चावडी बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी सायं. सात वाजता शहरातील जय भवानी चौक येथील श्री यमाई देवी मंदिरात पार पडणार आहे. या बैठकीत आंदोलनाबाबत चर्चा करून पुढील भूमिका निश्चित करण्यात येणार आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने समाजबांधवांनी आपल्या प्रत्येक हक्कासाठी, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मराठा आरक्षण मोर्चासाठी सांगोल्यातून हजार गाड्या जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२४ ऑगस्ट -**



संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मुंबई येथील मराठा आरक्षण मोर्चासाठी सांगोल्यातून एक हजार गाड्या जाणार असल्याची माहिती सकल मराठा समाज, सांगोला तालुका यांनी दिली.

अखंड मराठा समाज, सांगोला तालुका यांनी मुंबई महामोर्चाच्या पूर्वतयारीसाठी रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी सदानंद मल्टीपर्पज हॉल, मिरज रोड, सांगोला येथे नियोजन बैठक घेतली. तालुक्यातील प्रत्येक गावातून ७ ते ८ गाड्या अशा १०३ गावातून एक हजार गाड्या निघणार आहेत. दि.२७ ते ३० ऑगस्ट रोजी सर्व नोकरदार, व्यवसायिक हे मुंबईला जाणार आहेत. समाजातील दानशूर मंडळी गाड्या उपलब्ध व जेवणाची व्यवस्था करत आहेत. पाठीमागे राहणाऱ्या व्यक्तींची व्यवस्था करत आहेत. तसेच ॲम्बुलन्स, रुग्णसेवा उपलब्ध करत आहेत. यापसंगी मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर नियोजन बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, जय जिजाऊ जय शिवराय, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणेने परिसर दणाणून गेला होता.

## सांगोल्यात घरगुती गौरी-गणपती आरास-मखर व सजावट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२४ ऑगस्ट -**

सांगोला नगरपरिषद आणि महाराष्ट्र राज्य चित्रकार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत सर्व भगिनींना आपल्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गौरी-गणपती उत्सवाचा उत्साह वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे.
**-डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी, सांगोला नगर परिषद**

गौरी गणपती उत्सवाच्या पावन पर्वानिमित्त महाराष्ट्र राज्य चित्रकार संघटना व सांगोला नगरपरिषद यांच्या वतीने सांगोला शहरातील भगिनींसाठी घरगुती गौरी-गणपती आरास व सजावट स्पर्धा याचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक, सामाजिक संदेश देणारी आणि पारंपरिक संस्कृती दर्शवणारी सजावट या विषयावर सादर करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सहभागींनी आपल्या घरगुती गौरी-गणपती आरास-मखर व सजावटीचा जास्तीत जास्त तीन मिनिटांचा व्हिडीओ पाठवावा, यासोबत आपले पूर्ण नाव, संपर्क क्रमांक आणि पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. स्पर्धा सांगोला शहरातील महिला भगिनींपुरती मर्यादित आहे. पर्यावरणस्नेही सजावटी सोबत सामाजिक प्रबोधन पर सजावटीस प्राधान्य दिले जाईल. व्हिडिओ व्हाट्सअप नं.७७०९०९२२४१ या क्रमांकावर दि.३ सप्टेंबर पर्यंत पाठवावा, स्पर्धा निःशुल्क राहील, परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल, सजावट स्पर्धेकांची स्वत:ची असावी या स्पर्धेसाठी अटी आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकसाठी पैठणी साडी व सोन्याची नथ तसेच उत्तेजनार्थ प्रथम, द्वितीयसाठी पैठणी साडी व गणेशरूपी चांदीचे नाणे ही बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

## गणेशोत्सवात डीजे ऐवजी पारंपारिक वाद्यांचा वापर करा

■ उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२४ ऑगस्ट-**



आगामी गणेशोत्सवात मंडळांनी डीजे ऐवजी पारंपारिक वाद्यांचा गजर करावा असे आवाहन गणेशोत्सव मंडळांच्या बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांनी केले.

वेळापूर पोलीस स्टेशनतर्फे गणेश मंडळांचे पदाधिकारी, अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच मुस्लिम समाजाच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक शिवशंभो मंगल कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीस मोठ्या संख्येने पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी वाळके म्हणाले, गणेशोत्सव हा सांस्कृतिक व सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणारा सण आहे. त्यामुळे मिरवणुकांमध्ये डीजेचा वापर टाळून पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, झांज, हलगी आदी वाद्यांचा उपयोग करावा. ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांना, विशेषतः आजारी रुग्ण, लहान मुले व वृद्धांना मोठा त्रास होतो. म्हणूनच 'नो डीजे धोरणा'चा अवलंब करून उत्सव शांततेत साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले की, मिरवणुकीदरम्यान रस्ते मोकळे ठेवावेत, वाहतुकीत अडथळा निर्माण होऊ नये याकडे मंडळांनी लक्ष द्यावे. ठरवून दिलेल्या मार्गाचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. याचबरोबर गणेशोत्सवाच्या काळात धार्मिक सलोखा व सामाजिक बंधुभाव टिकवणे ही प्रत्येक मंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. रितसर पोलीस परवानगी घेऊनच गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. डीजे वाजवण्यास उच्च न्यायालयाने बंदी घातली असून या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा वाळके यांनी दिला. यावेळी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, उपनिरीक्षक आकाश शेळके, अमोल साठे, पोलीस पाटील, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान उत्सव काळातील पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था व शिस्तीबाबत सविस्तर चर्चा झाली.

### बार्शीत आज भगवान वराह जयंतीनिमित्त मिरवणूक

**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

आज सोमवार दि. २५ ऑगस्ट रोजी भगवान वराह जयंतीनिमित्त भव्य मिरवणूकीचे आयोजन विश्व हिंदु परिषद, ,बजरंग दल बार्शी द्वारा आयोजित करण्यात येणार असून सदर मिरवणूकीचे उद्घाटन ह.भ.प.हासन महाराज अत्तार यांच्या हस्ते होणार आहे. सदर मिरवणूक श्री भगवंत मंदिर मार्ग येथून निघणार आहे पुढे महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, भगवान पार्श्वनाथ मार्ग, पांडे चौक, सोमवार पेठ मार्गे शिव सृष्टी येथे समारोप होईल, असे विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांच्यातर्फे यात सामील होण्याचे आवाहन या दोन्ही संस्थेतर्फे करण्यात आले आहे.





### राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल विविध संघटनांतर्फे संजय पाटील यांचा सन्मान

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील माजी उपसरपंच तथा पत्रकार संजय पाटील यांना आळंदी येथील शिव प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध संघटनांतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष शिवराज पुकळे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे प्राचार्य बागल, नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, ॲड. किशोर काळे, राम गलांडे, रावसाहेब इंदलकर, भीवातात्या घूले ,मेजर जय गलांडे, जयंत गोरे, अनिल धायगुडे, देवा धायगुडे, सनी पुकळे, अण्णा ठेंगल, ठेकेदार उमेशभाऊ सरवदे, राजेंद्र जामदार, कल्याण जावळे,दत्तात्रय भैस, कुमार भैस,शिवराज पुकळे, यश चोरमले, सनी पुकळे,अण्णा ठेंगल, देवा धायगुडे, रावसाहेब इंदलकर, उमेश पडळकर, माजी सरपंच तुषार लवटे, शहाजी वाघ, देवा धायगुडे, अनिल धायगुडे, नितीन लेंगरे आदी उपस्थित होते.

## डॉ. प्रवीण मस्तुद यांच्या पुस्तकास राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ ऑगस्ट-**

डॉ. प्रविण मस्तुद लिखित मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकरिता इतिहास या पुस्तकास हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील शेवाळा येथील श्री. चक्रधर स्वामी राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे. लवकरच एका विशेष कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाणार असल्याचे पुरस्कार समितीचे अध्यक्ष अनिल कपाटे यांनी सांगितले.


या पुस्तकाला आतापर्यंतचा हा तिसरा पुरस्कार आहे. यावर्षी पुरस्कार प्राप्त प्रतिभावंतांमध्ये इतिहास संशोधन मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास (पुस्तक मार्केट पब्लिकेशन, पुणे) डॉ. प्रविण मस्तुद बार्शी, कादंबरी: गुंतवळ ( दिलीपराज प्रकाशन, पुणे) नागपूर, अलका मोकाशी कथासंग्रह दुभंग (उत्कर्ष प्रकाशन, पुणे) सर्वोत्तम सताळकर कलबुर्गी गुलबर्गा, ललितः कपाळ गोंदण (डिंपल पब्लिकेशन, मुंबई) निशा डांगे पुसद, आत्मचरित्र: जागरण (मांजरा प्रकाशन, लातुर) भारत सातपुते लातुर, अनुभव कथनः ब्युटी ऑफ लाईफ (न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस, पुणे) आशा नेगी- पुणे हे आहेत.

मराठी भाषेतला व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास एकत्रित रुपाने उपलब्ध नव्हता तो या पुस्तकातून वाचकांसाठी उपलब्ध झाला आहे. व्यंगचित्र पत्रकारिता क्षेत्रातील हे निराळे व अभ्यासपूर्ण पुस्तक आहे. या पुस्तकाला पुआहो सोलापूर विद्यापीठाचे पत्रकारिता विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र चिंचोलकर यांची प्रस्तावना तर मलपृष्ठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पत्रकारिता विभागाचे मा. प्रा. सुरेश पुरी यांचा शुभेच्छा संदेश आहे. शेवाळा येथील श्री चक्रधर स्वामी सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून मराठी वाङ्मय क्षेत्रामध्ये मानाचा असलेला राज्यस्तरीय श्री चक्रधर स्वामी वाङ्मय पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराचे हे २४ वे वर्ष आहे.पुरस्कार समितीचे संयोजक अध्यक्ष अनिल मनोहर कपाटे शेवाळकर, गोविंद आराध्ये, यशवंत जामोदकर, सागर कपाटे यांनी ही घोषणा केली.

## मुलांच्या भविष्यासाठी चांगले वातावरण निर्माण करणे पालकांची जबाबदारी : इंद्रजीत देशमुख

■ महर्षी संकुलच्यावतीने पालक मेळाव्यासह व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज, दि.२४ ऑगस्ट-**





बाप हाच मुलाचा पहिला गुरु असतो. तर आईचा स्पर्श जगातील सर्वात ताकदवान चार्जर आहे. पालकांनी आपल्या मुलांना भविष्यात जगण्यासाठी चांगले वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. समाजात जगताना शब्दांचा वापर हा आपले संस्कार दर्शवितो. त्यामुळे ज्या व्यक्ती, कुटुंब आणि समाजातील जीवन मुल्य ऊच्चप्रतीची तेवढा तो व्यक्ती, कुटुंब आणि समाज सुखी असल्याचे प्रतिपादन कोल्हापुरचे निवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी केले.

शंकरनगर येथील महर्षी संकुलातील, महर्षी प्रशाला, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला व प्राथमिक विभाग यांचे वतीने झालेल्या पालक मेळाव्यात श्री. देशमुख यांचे डिजीटल युगात मुलांचे संगोपन या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका कु.स्वरुपाराणी मोहिते पाटील, महर्षी प्रशालेचे सभापती ॲड .नितीनराव खराडे पाटील, ज्ञानाई गुरुकुलचे ह.भ.प.सुरेश सुळ महाराज, अनिल जाधव, मुख्याध्यापक संजय गळीतकर, शिवाजी पारसे, अनिता पवार यांचेसह स्थानिक प्रशाला समिती सदस्य व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, डिजीटल युगात मुलांची मानसिक प्रतिकार शक्ती वाढविण्याची गरज आहे. मुलांचे फक्त गुण वाढविणे हाच उद्देश न ठेवता मुले आयुष्यभर सुखी राहण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. मुलांचा मानसिक, शारीरीक आणि भानवनिक समतोल जोपासने गरजेचे आहे.



### राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्षपदी कुणाल सरतापे

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२४ ऑगस्ट-**

अकलूज शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सामाजिक न्याय विभागाचे शहराध्यक्ष म्हणून कुणाल सरतापे यांची निवड जाहीर करण्यात आली.

आमदार उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत निवडीचे पत्र सरतापे यांना देण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय साठे, जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ तोरणे, वेळापूर ग्रामपंचायत सरपंच व सामाजिक न्याय विभाग माळशिरस तालुका अध्यक्ष रजनीश बनसोडे, डॉ. बी. बी. ओहाळ, तालुका कार्याध्यक्ष आकाश लोखंडे, प्रदीप सरवदे, धिरज जावळे, भैय्यासाहेब देशमुख आदी यापसंगी उपस्थित होते.

शहराध्यक्ष कुणाल सरतापे यांनी सर्वांचे आभार मानले. मला दिलेल्या या विश्वासाला पात्र ठरवत सामाजिक न्याय विभागाचे कार्य अकलूज शहरात वेगाने व प्रभावीपणे पुढे नेईन, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## सकळेश्वरची यात्रा उत्साहात संपन्न

■ मंद्रुपमधून सवाद्य पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**



मंद्रूप गावचे ग्रामदैवत श्री सकळेश्वर देवस्थानची पारंपरिक यात्रा यावर्षी उत्साहात पार पडली. श्रावण मास संपल्यानंतरच्या शेवटच्या अमावास्येच्या दिवशी सकळेश्वरची यात्रा पार पडते.

शनिवार २३ ऑगस्ट रोजी रात्रभर भजन-कीर्तन व विणा पकडण्याचे कार्यक्रम झाला. यावेळी रात्रभर ओम नम शिवायचा जागर करण्यात आला. २४ ऑगस्ट रोजी पहाटे काशिनाथ जेऊरकर, अप्पासाहेब जेऊरकर, सकळेश्वर पुजारी व सतीश मेंडगुदले यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. सकाळी ९ वाजता श्री सकळेश्वर मूर्तीची पालखी गावभर मिरवणुक काढण्यात आली. मेंडगुदले गल्लीपासून मुख्य रस्ता, कुंभार गल्ली, माळी गल्ली मार्गे मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. पालखी मिरवणूक दुपारी एक वाजता आल्यानंतर भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे व माजी सरपंच पिरप्पा म्हेत्रे यांच्या हस्ते महापूजा व आरती संपन्न झाली . यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवानंद हिरेमठ, संगमनाथ हिरेमठ, ग्रामपंचायत सदस्य सुरेश मेंडगुदले, सुरेश टेळे, बसप्पा घाटे, भाजपाचे गौरीशंकर मेंडगुदले, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, तुकाराम जेऊरकर, रामचंद्र वाडकर, अशोक वाडकर, गंगाधर हिरेमठ, सुरेश जोडमोटे, नागनाथ मेंडगुदले, विठ्ठल जोडमोटे, सुमित मेंडगुदले, नागनाथ घाटे, रेवणसिध्द मेंडगुदले, सोमनिंग शिंगाडे, महादेव शिंगाडे, महादेव जकुणे, कुमार मेंडगुदले, दयानंद देवमाने, दयानंद घाटे, महेश मेंडगुदले, सागर धनाळे, नागनाथ धनाळे, ओम मुंजे, अप्पू हसापूरे, रवीकुमार मेंडगुदले, संतोष बरूरे, समर्थ तोडकरी, म्हाळप्पा घाले, भिमाशंकर मेंडगुदले, मरूळाराध्य हिरेमठ, श्रीशैल हिरेमठ, शिवानंद जोडमोटे, गिरीष मेंडगुदले, शिवानंद मोकाशी, अभिजित मेंडगुदले, केदार होनराव आदी उपस्थित होते.

#### पालखी भेट सोहळा

मुख्य रस्त्यावरून सकळेश्वर पालखी मिरवणूक सुरू असताना शास्त्री दवाखान्याजवळ मल्लिकार्जून , मळसिध्द, मलकारसिध्द यासह इतर तीन देवांच्या पालखी भेटीचा सोहळा पार पडला. यावेळी सकळेश्वर व ओम नम शिवायचा जयघोष करण्यात आला. यावेळी शेकडो भाविकांनी नयनरम्य भेटीचा सोहळा अनुभवला.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री कामेश्वर लिंगाची अक्की पूजनाने श्रावण समाप्ती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापुर,दि.२४ ऑगस्ट-**

श्रावण समाप्तीचे औचित्य साधून श्री कामेश्वर भक्त मंडळ व एस एस साबळे वीरशैव ट्रस्ट बनशेट्टी प्रतिष्ठानच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदा ग्रामदैवत सिद्धरामेश्वर स्थापित ६८ लिंगापैकी एक असलेल्या श्री कामेश्वर लिंगास साडेतीनशे किलो तांदळाचा (अक्की) वापर करुन साडेसहा फुटांचा थर रचुन शिवलिंगाचे स्वरुप करण्यात आले. गेल्या कित्येक वर्षापासुन हे काम निलप्पा वाले हे श्रध्देने करतात. पहाटेपासूनच रुद्राभिषेक, सहस्त्र बिल्वार्चन, रुद्रपठण झाले. सकाळी अकरा वाजता महाआरतीनंतर महाप्रसाद देण्यात आला. आमदार देवेंद्र कोठे, एस एस साबळे, सिध्दाराम साबळे उपस्थित होते. सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांनीही सायंकाळी कामेश्वर लिंगाचे दर्शन घेतले. यावेळी शांतकुमार बामणे, बाळासाहेब कनकी, उमाकांत बेलुरे, मनोहर महिद्रकर, रामचंद्र कबाडे, सागर हलकुडे, अशोक याळगी, बसवराज पाटील, कल्याणी चडचण, बाळासाहेब आळसंदे, गंगाधर बिराजदार, गणेश चिंचोळी, अशोक कलशेट्टी, बिपीन पाटील व असंख्य सदभक्तांची उपस्थिती होती.





### महत्त्वाचे



## बार्शी रेडक्रॉस सोसायटीतर्फे मुखेड तालुक्यातील रावणगाव येथील पूरग्रस्तांना मदत

**बार्शी, दि.२४ ऑगस्ट**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील रावणगाव (भा) येथील गावास पुराचा जबरदस्त फटका बसला या गावातील २७१ नागरिकांना गावातून सुमारे तीन किलोमीटर पाण्यातून रेस्क्यू करण्यात आले. पूरग्रस्त नागरिकांना तात्पुरते निवारा शेड उभारुन ठेवण्यात आले आहे. या कॅम्पमधील कुंटबियाना बार्शी तहसीलदार एफ.आर. शेख व रेडक्रॉस सेक्रेटरी अजित कुंकूलोळ, उपाध्यक्ष व संचालक मंडळाने मदत करण्याचे ठरविले. त्यानुसार रविवारी सकाळी तहसीलदार एफ. आर.शेख, रेडक्रॉस सदस्य पत्रकार संतोष सुर्यवंशी, प्रशांत बुडूख, उमेश देशमाने व राहूल कुंभार यांनी कुटुंबीयांना बार्शी इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने संसार उपयोगी साहित्य किचन सेट, चटई, बेडशीट, साडी, जर्किन, बादली, रस्सी, हॅन्ड वॉश, मेणबत्ती पाकीटे व गोडेतेल पाकीट वाटप कॅम्पमध्ये जाऊन केले.



## विचारविश्व पुस्तक जीवन जगण्याची कला देणारे

**श्रीपूर, दि. २४ ऑगस्ट**

शिक्षिकी पेशा प्रामाणिकपणे पार पाडत असताना डोळे सरांनी समाजात घडत असणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टींचे आकलन करून त्यातून समाजाला आपल्या लिखाणातून सकारात्मक दृष्टी देण्याचे आपल्या विचारविश्व या पुस्तकातून केले असल्याचे प्रतिपादन सोलापूर कृषी उत्पन्न समितीचे माजी सभापती संजय भास्करराव पाटील यांनी केले. सध्या वास्तव्यास असलेले जि. प. शाळा बावडा येथिल शिक्षक अतुल शामराज डोळे यांनी लिहिलेल्या विचारविश्व पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निरनिमगाव येथिल आनंदराव पवार शिक्षण संस्थेचे संस्थापक दत्ताजीराव घोणरे होते. या प्रसंगी व्यासपिठावर निरानर सिंगपूरचे सरपंच श्रीकांत दंडवते, राजेश बादले महाराज, कवि इंद्रजित घुले, बारामतीचे अरविंद मोकाशे, राजेश कुबेर पवार, श्रीपूर येथिल प्रा. अशोक पंडीत, प्रा. नागनाथ वाघमारे, भाऊसाहेब कुलकर्णी, तुकाराम कांबळे, माधव साठे, जयकुमार घाडगे, विठ्ठल देवडकर आदी उपस्थित होते. प्रथम उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक राजेश पवार यांनी केले. या प्रसंगी राजेश बादले महाराज यांनी आपल्या मनोगता मध्ये सध्या इलेक्ट्रॉनिक व शोशल मिडीया मुळे वाचन संस्कृती लोप पावते की काय अशी परिस्थिती असताना डोळे सरांनी विचारविश्व पुस्तक प्रकाशित केले आहे हे धाडसाचे आहे. कारण पुस्तक प्रकाशित करणे खर्चाचे तसेच फार कठीण काम आहे. परंतु या पुस्तकाच्या माध्यमातून वाचन संस्कृतीतीला चालना मिळून समाजामध्ये संकारात्मकता निर्माण होईल असा आशावाद व्यक्त केला. अतुल डोळे यांनी समाजातील घडत असलेल्या प्रसंगानुरूप मी लिहीत गेलो सहकारांनी प्रोत्साहन दिल्याने त्याचे आज पुस्तक रूपाने प्रकाशन झाले हा प्रसंग माझ्या साठी आनंद देणारा आहे असे सांगितले.या वेळी इंद्रजित घुले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. संतोष रमाकांत जोशी, आशितोष डोळे, काशिनाथ जोशी, दादा थिटे कार्यक्रमाचे सुत्रसंचालन यांनी केले तर आभार आरती डोळे यांनी मानले.

## पांडव पुराण समाप्ती सोहळा संपन्न

**अक्कलकोट, दि २४ ऑगष्ठ**

येथे श्री संत वीरशैव कक्कया समाज महादेव मंदिर ट्रस्ट यांचा वतीने श्रावण मास व पांडव पुराण समाप्ती निमित्ताने महाप्रसाद कार्यक्रम संपन्न झाला . यावेळी तरुण युवक महिला पुरुष यांच्यावतीने भारुड फुगडी असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या प्रसंगी बोलताना माजी नगराध्यक्ष डॉक्टर सुवर्णताई मलगोंडा यानी १२ व्या शतकातील महानुभव मंडप व वीरशैव कक्कया यांच्या माहिती सांगितलीले अक्कलकोट नगरीचे माजी उपनगराध्यक्ष यशवंत तात्या धोंगडे यांनी वीरशैव कक्कया माहिती व साठ वर्षाची पुरातन महादेव मंदिर सविस्तर माहिती सांगितले तसेच काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी वीरशैव समाज तरुण युवक भारुड कीर्तन झालेले पाहून आपले तरुण संस्कृती जोपासना करत आहेत असे गौवोद्गार काढले. महाप्रसादाची पूजन वीरशैव कक्कया ढोर समाज अध्यक्ष माजी नगरसेवक केरबा होटकर माजी नगरसेवक मिलन दादा कल्याण शेट्टी अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोल राजे भोसले माजी उपनगराध्यक्ष यशवंत तात्या धोंडे माजी नगराध्यक्ष डॉक्टर सुवर्णाताई मलगोंडा माजी नगराध्यक्ष बसलीगप्पा खेडगी अक्कलकोट तालुक्याचे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील आरपी (आठवले गट) तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर कृष्णा होटकर संजय इंगळे रवींद्र होटकर मारुती होटकर भीमराव होंटकर गिरीश होटकर संदीप कटकधोंड भीमराव धडके सर पत्रकार सैदाप्पा इंगळे विशाल होटकर देवेंद्र शिंदे जितेंद्र शिंदे शिरवळ चे नागनाथ होटकर उडगीचे गणपती नारायणकर उत्तम इंगळे अश्विनी होटकर कुमार होटकर बजरंग होटकर समर्थ होटकर अक्कलकोट तालुक्यातील बहुसंख्य समाज बांधव माता बाल गोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात ‘विश्वारंभ’ समारंभ उत्साहात

### अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांच्या हस्ते थाटात झाला शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात ‘विश्वारंभ’ हा यावर्षी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, संचालक राघवेंद्र एम. चाटे, अधिष्ठाता, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथम शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विद्यापीठाची शैक्षणिक परंपरा, मूल्यव्यवस्था आणि भविष्यातील संधींविषयी मार्गदशन करण्यात आले. यावेळी सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्रा. कराड-चाटे म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक युगात आधुनिक



तंत्रज्ञान आणि व्यवसायिक यशावर भर देणाऱ्या शिक्षणामध्ये नैतिक मूल्यांची पायाभरणी आणि सामाजिक जाणीवेची दिशा आवश्यक आहे. तरच आपण संतुलित आणि शाश्वत विकास साधू शकतो. यासाठी एमआयटी विश्वप्रयाग मध्ये विद्यार्थ्यांना सजग आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडविताना त्यांना आत्म केंद्रित नव्हे, तर समाजकेंद्रित विचार करण्यासाठी प्रेरित केले जाते. आजच्या या ‘विश्वारंभ’ मधून सर्व विद्यार्थी याच प्रेरणादायी शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणार आहेत.

कुलगुरू प्रा. जोशी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना विद्यापीठाची तत्वे, मूल्यव्यवस्था, शैक्षणिक दृष्टीकोन तसेच उपलब्ध संधीविषयी मार्गदर्शन केले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवादात्मक कार्यशाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाले. यावेळी पालकांसाठी आयोजित ‘उच्च शिक्षणातील पालकत्व’ या चर्चासत्रात डॉ. स्मिता त्रिगुण कुलकर्णी - निवृत्त उपजिल्हाधिकारी तसेच मानसतज्ञ व समुपदेशक यांनी मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी पालकांनीही विद्यापीठाबरोबर हातात हात घालून काम करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. यानंतर प्रख्यात कलाकार प्रत्यक्ष राजभट्ट यांच्या थरारक ‘रावणा’ सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांच्या ‘बहुमुखी’ विकासाठी विद्यापीठाची बांधिलकी अधोरेखित करणारा हा स्वागत समारंभ विद्यार्थी आणि पालकांच्या उत्स्फूर्त सहभागाने अविस्मरणीय ठरला.

## विवाह सोहळ्यात डामडौल नको; साधेपणा हवा



मेळाव्यास आलेल्या वधू वर यांच्या बायोडाटाचे वाचन अंजली जाधव, संजीवनी मुळे, प्रज्ञा भोसले, लता ढेरे.यांनी केले. तर नोंदणीसाठी वैभवी पवार, श्रावणी माने, राजू व्यवहारे, सागर रेवडकर, मेजर मोहिते, कारंडे, प्रभाकर शिंदे यांचे सहकार्य लाभवले.

### मराठा वधू-वर मेळाव्यात निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

आई-वडिलांनी आपल्या पाल्यांचा विवाह करताना विवाह सोहळ्याचा डामडौल न करता साधेपणाने सोहळा करावा असा सूर उपस्थित मान्यवरांनी मराठा वधू-वर मेळाव्यात व्यक्त केला. मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित मराठा वधू-वर परिचय मेळाव्यात सोलापूर शहर जिल्ह्यातील वधू-वर आणि पालकांनी मोठा प्रतिसाद दिला. तब्बल चारशे वधू-वरांची उपस्थिती मेळाव्यास होती.

रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी आरटीओ ऑफिस जवळ असलेल्या आदित्य नगर सांस्कृतिक भवन येथे मराठा समाजाचा ३१ वा वधू-वर परिचय मेळावा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून मराठा नागरि पतसंस्थेचे चेअरमन तथा शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिजाऊ ब्रिगेडच्या उज्वलाताई साळुंखे, जिल्हाध्यक्ष डॉ.जी. के. देशमुख, शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ मातांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. गोवर्धन गुंड यांनी जिजाऊ वंदना सादर केली. मराठा सेवा संघाचे उपाध्यक्ष सदाशिव पवार यांनी वधू-वर परिचय मेळावा घेण्यामागची भूमिका आपल्या प्रास्ताविक भाषणातून विशद केली.

पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठा समाजामध्ये नव्हे तर इतर समाजामध्ये देखील मुलींची संख्या कमी होत असल्याची बाब चिंताजनक आहे. पालकांनी आपल्या मुलाचा अथवा मुलीचा विवाह ठरवताना संपत्ती अथवा पॅकेज कडे न पाहता स्वकर्तृत्व पाहून विवाह करावेत. पत्रिकेवर अवलंबून राहू नये असे मार्गदर्शन केले.

अमोल शिंदे यांनी विवाह सोहळे करताना पालकांनी कोणताही डामडौल न करता साधेपणाने विवाह सोहळे साजरे करावेत. मुलगी देताना मुलांचे कर्तुत्व पाहावे तरच समाजाच्या वतीने घेण्यात येणार्या वधू-वर परिचय मेळाव्याचा उद्देश सफल होईल असे सांगितले.यावेळी विचारपीठावर संभाजी ब्रिगेडचे सोमनाथ राऊत, प्रकाश ननवरे, दिनकर देशमुख, दत्ता जाधव, राजू व्यवहारे, राम माने, हनुमंत पवार, आर. पी. पाटील, तानाजी चटके, नागनाथ पवार, सुशील गवळी, अंबादास सपकाळे, लिंबराज जाधव, परशुराम पवार, शिरीष भोसले, पांडुरंग झांबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## चांगल्या कर्माचे बीजारोपण करा जीवनात यशाचा सुगंध दरवळेल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ ऑगस्ट -**

अक्कलकोट : आपण आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत. पण मनुष्य जीवन त्याच्या कुटुंबाला, समाजाला तसेच देशाला घडवते. आपले सुसंस्कारी जीवन उत्तम संस्कृतीला जन्म देऊ शकेल. देशाचे उज्ज्वल भविष्य आपल्या सर्वांच्या हातात आहे. चला तर मग आपल्या श्रेष्ठ कर्मांचे बीजारोपण करून सुंदर संस्कारांनी उत्तम संस्कृतीची बाग फुलवूया. ह्या बागेमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला गुणांचा सुवास, उत्साहाचा झोपाळा, प्रेमाची सावली लाभेल जेणेकरून त्याचे जीवन सुगंधी बनेल.असे आवाहन शिवाचार्यरत्न श्री ष.ब्र.डॉ जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजीं यांनी केले.



## स्वातंत्र्यदिनानिमित्त छत्रपती फाऊंडेशनकडून न्यूयॉर्क येथे शिवजयंतीची मिरवणुक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने यावर्षी न्यूयॉर्कमध्ये छत्रपती फाऊंडेशनच्यावतीने इंडीया डे परेड चे आयोजन करण्यात आले होते. या परेडमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा किर्तीरथाचा देखावा करून मिरवणुक काढली.

या परेड ग्रँड मार्शल चा मान अभिनेत्री रश्मीका मंदाना व अभिनेता विजय देवेरकोंडा यांना देण्यात आला होता. मिशीगन राज्याचे हाऊस ऑफ रेप्रेसेंटेटीव्ह (खासदार) ठाणेदार यांनी पूर्णवेळ कीर्तीरथावर विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. त्यांनी रथावरून रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या प्रचंड जनसमुदायाला अभिवादन केले तसेच परेड स्टेजवरून परेडचे निरीक्षण केले.

न्यूयॉर्क शहराचे महापौर एरिक आडम्स यांनी परेडची सुरुवात केली. यावेळी भारताचे न्यूयॉर्क येथील राजदूत बिनया प्रधान उपस्थित होते. यावेळी रथावर शिवाजी महाराज, जिजाऊ, बाल शिवबा व मावळ्यांची भूमिका सादर करण्यात आली होती. यावेळी बालक, महिला व युवकांनी दिमाखदार अभिनय व आकर्षक पोशाखाद्वारे ऐतिहासिक क्षण जिवंत केले.

किर्तीरथासोबत जल्लोश ढोल ताशा पथकाच्या ५० हुन अधिक वादकांनी न्यूयॉर्क शहर दुमदुमून टाकले. आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या बॉलीवूड नाट्य दिग्दर्शक संदेश रेड्डी ह्यांच्या रुद्र डान्स अकॅडमीच्या लहान मुलींनी लेझीमसह विविध नृत्य सादर केले. १०० हुन अधिक लोकांनी महाराष्ट्राचा इतिहास व संस्कृतीचे भव्य प्रदर्शन सातासमुद्रापार केले. महाराष्ट्रातील लोककलेचा आगळावेगळा अनुभव अमेरिकेतल्या लोकांना दिला. अमेरिकेत वास्तव्यास असलेले सर्व प्रांतातील भारतीय लोक या परेड मधे मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाबरोबर अन्य महामंडळाच्या माध्यमातून अडीच हजार नवउद्योजकांना कर्ज योजनेचे वाटप : मनीष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २४ ऑगस्ट-**

विविध आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन लघु उद्योजकांच्या हाताला रोजगार मिळवून देण्याबरोबर सुशिक्षित बेरोजगारांना देखील करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून देत आहे. राज्य शासन स्वयंरोजगार निर्मिती बरोबर विविध कर्ज योजनांच्या माध्यमातून अर्थसाह्यीत मदत करून स्वतःच्या पायावर उभे करत आहे.लोकमंगल बँक आणि लोकमंगल पतसंस्थेच्या माध्यमातून आमदार सुभाषबापू देशमुख यांनी जिल्हाभरातील अडीच हजार नव उद्योजकांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून २०० कोटीच्या कर्ज योजनांसह अन्य कर्ज योजनांचा



लाभ देऊन युवकांचे आर्थिक जीवन मान म्हणून उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. असे प्रतिपादन लोकमंगल उद्योग समूहाचे संचालक तथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष(भैय्या) देशमुख यांनी मोहोळ येथे केले.

येथील सोलापूर जनता बँकेच्या शाखेसमोर डोंगरे मेडीमार्ट या औषधांच्या अद्ययावत दालनाचे उदघाटन मनीष(भैया) देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी लोकमंगल पत संचालक अध्यक्षस्थानी युवराज (नाना) गायकवाड हे होते. विशाल डोंगरे हे प्रयत्नामध्ये सातत्य ठेवणारे नव उद्योजक असून त्यांनी औषध क्षेत्रात घेतलेली मेहनत आज फळाला आली आहे. डोंगरे मेडीमार्डच्या माध्यमातून त्यांनी रुग्णांची अविरतपणे सेवा यापुढेही करत रहावी असे आवाहन ही यावेळी देशमुख यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर डोंगरे मेडीमार्टचे विशाल डोंगरे, सोमनाथ अवताडे, मोहोळचे प्रथम व माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर, सोमेश क्षीरसागर, सुशीलभैय्या क्षीरसागर, भाजप उत्तर मंडळाचे तालुकाध्यक्ष सतीश काळे, मोहोळ तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश सोवनी पत्रकार महेश माने, सत्यजित सुरवसे, महेश देवकर, राजुशेठ बलदवा नीरज वेलानी, शिवरत्न गायकवाड, दीपक जमादार, अंकुश आवताडे, साहेबराव उघाडे, सुरेश राऊत, मुजीब मुजावर,गणेश झाडे, गुरुराज तागडे, नवनाथ चव्हाण, मातोश्री लतिका डोंगरे,वर्षा डोंगरे इत्यादी सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.